
विलेपार्ले
विलेपारल्यातील बलुतेदार
भाग १
VILE PARLE
लेखक : अरुण फडके

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# विलेपारल्यातील बलुतेदार

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# विलेपारल्यातील बलुतेदार

## भाग-१

लेखक

अरुण फडके

# विलेपारल्यातील बलुतेदार : भाग-१

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
sheroophadke@gmail.com
मुखपृष्ठ: श्री शैलेश तेंडोलकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604


**प्रकाशन : १६ नोव्हेंबर २०२० (दिवाळी पाडवा)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड
करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी-
 घेणे आवश्यकआहे.

णे आवश्यके◌आहे.

# अरुण फडके



अरुण फडके हे एक अभ्यासू लेखक म्हणून सुपरिचित आहेत. फ्रीमेसनरी या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य व संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित आहे. ते विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार याचे अभ्यासक असून ६० लेखांची लेखमाला तरुण भारत मधे प्रकाशित झाली आहे.

त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय आहे सिंबॉल-सिंबॉलिझम-ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र – प्रतीकशास्त्र -- चिन्ह – चिन्हसंकेत - चिन्हार्थ. याही विषयावर दैनिक मुंबई तरुण भारतमधे ६० लेखांची लेखमाला प्रकाशित झाली. चिह्न निमित्त – निमित्त चिह्न हे पुस्तक लवकरच येत आहे. विलेपारल्यातील बलुतेदार ही मासिक २४ लेखांची लेखमाला अभूतपूर्व या मासिकात प्रकाशित. सध्या लोकमान्य सेवा संघाच्या शताब्दी इतिहास खंडाचे लेखन सुरू. बालनाट्य चळवळ, प्रायोगिक-व्यवसायिक नाट्य चळवळींचा इतिहास व विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.

अनेक नामवंत संस्थांच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो. लोकमान्य सेवा संघ, पारले. गॉसिप ग्रुप ही प्रायोगिक रंगभूमीवरील संस्था, नाट्यसंपदा प्रतिष्ठान, कै मो ग रांगणेकर जन्मशताब्दी महोत्सव, जागतिक चित्पावन महासंमेलन, म ल डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना आदींचे ते आघाडीचे कार्यकर्ते विश्वस्त आहेत. तसेच ते मोठ्या उत्सवी कार्यक्रमांचे अनुभवी संघटक (Event designer) व Heritage Structure Rehabilitation & Restoration या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचे विशेषज्ञ आहेत.

# लेखकाचे मनोगत

**अरुण फडके**

या पुस्तकातील सर्वच गोष्टी तेंव्हाच्या आहेत, जेंव्हा इथले रस्ते लाल मातीचे होते. हिरव्यागार निसर्गाने वेढलेल्या गावाच्या कोपऱ्या कोपऱ्यात टुमदार घरांची वस्ती सजली होती मात्र या रहात्या घरांत नागरिकांची वस्ती विरळ होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच सन १९०६ मधे नुकतेच विलेपारले रेल्वे स्टेशन बांधले गेले होते आणि आता बाहेरच्या जगाशी या चिमुकल्या गावाचा संपर्क सहज झाला होता.

हे वर्णन आहे  साधारण शंभर वर्षांपूर्वीच्या आपल्या विलेपारल्याचे. आपलं विलेपारले म्हणजे  आज मैलोंमैल आडव्या-उभ्या पसरलेल्या मुंबैनगरीतील एक महत्वाचे उपनगर, जणू या महाकाय शहराच्या हृदयावरचा कौस्तुभ मणी. मुंबईच्या जुहू समुद्रकिनाऱ्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या एकेकाळच्या या छोट्याशा गावाचा, विलेपारले रेल्वे स्टेशनच्या निर्मिती नंतर साधारण शंभर – एकशे दहा वर्षांत संपूर्ण कायापालट झालेला दिसतो. विलेपारल्यात, अलीकडच्या २०-२५ वर्षांत स्थायिक झालेल्या नागरिकांना सुद्धा हे पटकन जाणवते इतक्या वेगाने हे बदल होत आहेत.

आमचे कुटुंब सुमारे शंभर वर्षांपुर्वी पारल्यात आले आणि इथलेच झाले. माझी आत्या श्रीमती सीताबाई गांगल, १९२३ साली लग्न होऊन पारल्यात रहायला आली. माझ्या वडिलांचा जन्म १९२३ या वर्षी बडोद्यात झाला. वडिलांच्या वयाच्या ५ व्या वर्षी त्यांच्या आईचा मृत्यू झाला, ते सर्व भावंडात धाकटे. त्यामुळे, त्यावेळी, सौ सीताबाई गांगल या वडिलांच्या मोठ्या बहिणीने, वर्ष १९२८ मधे त्यांना पारल्यात आपल्या घरी आणले आणि मुलासारखा सांभाळ केला. पुलं आणि माझे वडील तसे समवयस्कच. त्यामुळे पुलंच्या पुस्तकातील पारले माझे वडील जगले आहेत. १९५० च्या दशाकात माझा जन्म झाला तेव्हापासून पारले हेच माझे जग आणि जगणे झाले.

वर्ष १९७० मध्ये अकरावीचि परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालायात प्रवेश घेतला तेंव्हाच, आपल्यातला प्रत्येकजण या मुंबईच्या उपनगरात तसा उपरांच आहे याची जाणीव मला झाली होती. आगरी आणि कोळी असे इथले मूळ रहिवासी जागा विकून अन्यत्र स्थायिक झाले असावे. नेमक्या याच काळात, मुंबईतील आम्ही स्थानिक मराठी म्हणून बाकी सगळे अन्य भाषिक उपरे आहेत, आशी राजकीय भूमिका काही नेत्यांनी घेतली होती. **आम्ही मराठी म्हणून स्थानिक – तुम्ही अमराठी म्हणून उपरे**, असे भाषिक विभाजन जाणीवपूर्वक केले गेले होते. स्वस्थ आणि

सोशीक समाजात विनाकारण तणाव निर्माण केला गेला होता त्याचे परिणाम आपण आजपर्यंत भोगतो आहोत. त्या तरुण वयातही ही भूमिका नक्कीच पटलेली नव्हती. त्याला कारणेही तशीच होती. माझ्या या भूमिकेशी मी कायमच धृढ राहिलो आहे आणि नेमक्या याच धोरणाने, विलेपारल्यातील DNA चे घटक असलेल्या अमराठी बलूतेदारांचा योग्य परिचय व्हावा, हा या वर्ष २०१९ मधील लेखमालेचा प्राथमिक हेतू आहे.

उद्यमशीलता – व्यवसाय चातुर्य याला दोन प्रमाणे आहेत. या निसर्गदत्त क्षमता आणि गुणवत्ता (natural attributes) आहेत हे आपण सुरुवातीला लक्षात घ्यायला हवे. त्याची जाणीव झाल्यानंतर अनुभव आणि सरावाने प्राप्त झालेल्या (acquired skills) व्यवसाय चातुर्य क्षमता आहेत. प्रत्येक व्यवसायिकाला नंतर मिळालेले अपयश अथवा यश या वरच अवलंबून असते.

याच विलेपारल्यात माझा जन्म झाला, इथल्याच शाळा आणि महाविद्यालयात माझे शिक्षण झाले. यातील प्रत्येक बलूतेदाराला मी जवळून पाहिले आहे. त्यांची मेहनत आणि प्रगती याचा मी साक्षीदार आहे. या लेखमालेतील प्रत्येक बलूतेदाराच्या अशाच सर्व क्षमतांचा परीचय करून देताना, तत्कालीन विलेपारल्याचे

समाज जीवनाचे वास्तव वर्णन आणि येथील समाजाच्या मानसिकतेचा परिचय, म्हणूनच मला करून देता आला आहे.

जानेवारी ते डिसेंबर २०१९ मध्ये, विलेपारल्याच्या अभूतपूर्व या मासिकात हे लेख नियमित प्रकाशित झाले होते. अभूतपूर्वचे मालक आणि संपादक, माझे स्नेही श्री अनिल हर्डीकर, यांनी हे लेख या ई पुस्तकात समाविष्ट करण्यास संमती दिली. त्यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

डॉ अनिल बांदिवडेकर हे नाव, प्रतिथयश नाट्यलेखक – नाट्य दिग्दर्शक आणि अनुभवी रंगकर्मी म्हणून तुम्हाला नक्कीच परिचयाचे आहे. शाळेतील दिवसांपासून स्नेह असलेले आम्ही दोघे अस्सल पारलेकर आहोत. वर्ष १९८३ मधील **कैलासवासी पारले** ही त्यांची अनेक पुरस्कार प्राप्त एकांकिका खूपच गाजली होती. डॉ अनिल बांदिवाडेकर यांनीच या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

अभूतपूर्व मासिकाचे डिझाईन करणाऱ्या श्री शैलेश तेंडोलकर यांनी या पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ बनवले आहे. त्यानाही मनःपूर्वक धन्यवाद.

ई साहित्य प्रतिष्ठान यांनी अगत्याने, या लेखमालेला ईपुस्तक स्वरूपात प्रकाशित केले आहे. संचालक श्री सुनील सामंत आणि सर्व सहकारी यांना मनःपूर्वक धन्यवाद.

एका महत्वाच्या उपनगराचा आणि तेथील बलूतेदारांचा असा परिचय तुम्हाला निश्चितच आवडेल याची मला खात्रीच आहे.

लिहू आनंदे – वाचू आनंदे...!

अरुण फडके,

विजयादशमी, २५ ऑक्टोबर, २०२०.

विलेपारले, पूर्व, मुंबई. M: ७४००१७३६३७

# चार शब्द

**अनिल हर्डीकर**

**अभूतपूर्व पार्ले** या नावात पूर्व पार्ले असा स्पष्ट संकेत असलेलं मासिक सुरु करून अकरा वर्षे झाली होती.जवळ जवळ हजार हून अधिक वर्गणीदारांनी या मासिकावरचे प्रेम आणि आपुलकी व्यक्त केली होती. अंक मिळण्यास चार दिवस लागले तरी **अजून अंक आला नाही?** असा प्रश्न किंवा **अजून अंक आला नाही** अशी तक्रार मला वर्गणीदारांना अंकाबद्दल असलेली उत्सुकता आणि लोकप्रियता सुखवत होती. मात्र त्याचबरोबर वाचकांना आवडतील असे लेख, अशी माहिती देणं ही माझी जबाबदारी माझ्या मनावरचा ताण वाढवणारी होती.

साल २०१८ .डिसेंबर महिना. अरुण फडके यांचा फोन आला. त्यांनी **अभूतपूर्व पार्ले** या मासिकात पूर्व विलेपारल्यातील व्यावसायिकांविषयी लिहिण्याची इच्छा, तयारी दर्शवली. अरुणशी माझा जुना परिचय. अरुण हा कुशल संघटक. कोणत्याही गोष्टीशी भिडायचं कसं ते अरुणकडून शिकावं. एवढं असताना अकरा वर्षात अभूतपूर्व साठी तो काही लिहू शकेल असं माझ्या डोक्यात

न येण्याचं कारण मला माहीत नाही. काही गोष्टी आपण करत नाही. त्या होतात कारण त्या व्हायच्याच असतात. आपण असतो निमित्तमात्र. ज्या क्षणी अरुण फडके यांनी हा प्रस्ताव मांडला त्याच क्षणी मी होकार दिला. माझ्या होकारानंतर मात्र ज्यावेळी अरुण फडके म्हणाले की ते अमराठी व्यावसायिकांबद्दल लिहू इच्छीतात त्यावेळी मी विचारात पडलो.

कितीही नाही म्हटलं तरी पूर्व पारल्यात मराठी माणसे अधिक. माझ्या अभूतपूर्व चे वाचक मराठी. वाचकांना हा प्रकार कितपत रुचेल याविषयी मी साशंक होतो. मी तसं अरुणला बोलून दाखवलं. मात्र त्यानंतर जेव्हा आमच्यात चर्चा झाली त्यावेळी अरुणने त्याची भूमिका मांडली आणि मग मात्र संपादक म्हणून माझ्या सर्व शंका दूर झाल्या. २०१९ या वर्षात १२ महिन्यात १२ अमराठी व्यावसायिकांबद्दल सविस्तर लिहिण्यासाठी मी अरुणला हिरवा कंदील दाखवला. पहिला लेखच नव्हे तर १२ च्या १२ लेख ठरलेल्या तारखेला अरुणने मला मेल केले हे मला इथे आवर्जून सांगितले पाहिजे.

माताधीन हलवाईचा पहिला लेख प्रकाशित झाला आणि वाचकांनाही यापुढे असे छान माहितीपूर्ण लेख वाचायला मिळणार अशी गोड चाहूल वाचकांना लागली. अरुणच्या सर्व लेखांचं वैशिष्ट्य असं की ही माणसं ज्यावेळी आपल्या व्यवसायाचा जम बसवत होती त्यावेळी पारल्यात सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक जडण घडण कशी होती, याचे प्रत्येक लेखात त्याने केलेलं अचूक वर्णने. आपले रहाते घर सोडून इतक्या दूरवरच्या अनोळखी भागात आलेल्या त्या बलुतेदारांचे कौतुक करावे तेवढे थोड़े. व्यवहार चातुर्य, मेहनत आणि दूरदृष्टी यासोबतच इथल्या माणसांना समजून घेत त्यांनी जी घोड़दौड़ केली ती वाचकांना प्रेरणादायी वाटली. मुख्य म्हणजे ही मंडळी त्यांच्या रोजच्या भेटण्यातली – ओळखीची. या लेखांच्या माध्यमातून त्यांचा इतिहास उलगडला गेला.

हे सर्व लेख ई-पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यासमोर येत आहेत ही आनंददायी बाब आहे. यापूर्वी श्री प्रदीप भिड़े आणि श्री नविन काळे याच्या **अभूतपूर्व पार्लेमधील** लेखांची पुस्तके प्रकाशित झाली असून त्या यादीत अरूण फडके यांचे नाव सामिल होते आहे. अरुण चे अभिनंदन..!

हे पुस्तक वाचकांना आवडेल अशी मला खात्री आहे,ज्यांनी हे सर्व लेख एकदा वाचले आहेत त्यांना एकत्रितपणे सर्व लेख वाचण्याचा आनंद मिळेल. एका उपनगराच्या जडण घदनीतील या इतिहास सदृश बारा लेखांना ई पुस्तक स्वरूपात सादर करावे, या निर्णयासाठी, ई-साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनिल सामंत आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन ...!

अनिल परशराम हर्डीकर

४ नोव्हेंबर, २०२०

विलेपारले, मुंबई.

## प्रस्तावना

### डॉ अनिल बांदिवडेकर

अरुण फडके आणि माझा शाळेपासून परिचय. त्यांची **विलेपारल्याचे बलुतेदार** हि लेखमाला आमच्या विलेपारल्याच्या अनिल हर्डीकर यांच्या अभूतपूर्व मासिकात दर महिन्याला प्रकाशित होत असते. या लेखमालेचे ई पुस्तक डीजीटल माध्यमातून ईसाहित्य प्रतिष्ठानतफे प्रकाशित होते आहे. या ई पुस्तकाची प्रस्तावना मी लिहावी असा विनंतीवजा आदेश आल्यामुळे मी तात्काळ होकार दिला.

विलेपारल्याचा इतिहास इथली माणसं घडवतात. पारल्याच्या जडणघडणीत अनेक मराठी कुटूंबांचे योगदान आहे. परांजपे, साठ्ये, पारधी, गानू, चेंबुरकर, भिडे ही वानगी दाखल काही नावे. मात्र मराठी माणसांबरोबर अमराठी माणसांनीही पारल्याच्या उत्कर्षाला हातभार लावला आणि स्व:ताची आणि पारल्याची ही प्रगती घडवून आणली ही वस्तुस्थिती आहे.

पूर्वीच्या काळी, पंचक्रोशीतील गावकरी आणि शेतकर्यांच्या नित्याच्या गरजा भागविणारे ते बलुतेदार, आणि नैमित्तिक गरजा भागवितात ते गाव कामगार म्हणजे अलुतेदार अशी श्रमविभागणी

होती. एक प्रकारे ही बारा ट्रेडसची, गावाची सर्व्हंट सिस्टिम होती. पारल्याचा गाडा १९३०-४० पासून ज्या लोकांनी चालवला, त्यांचा परिचय - लेखाजोखा  या पुस्तकांत अरुण फडक्यांनी मांडलाय. मुळात त्यांना पारल्याविषयी आत्मीयता असल्यामूळे सर्व लेख आटोपशीर झाले आहेत.

माताधीन हलवाई, पानबिडीवाले नारूशेठ, प्रायमस आणि छत्रीचा डॉक्टर मुसाभाई, कलिंगड - आंबेवाला गोविंद तेली, गोहिल ब्रदर्स केमिस्ट ॲंड ड्रगीस्ट, वर्मा टेलर्स, गोपाळ स्वीट मार्ट - शर्मा भेळपुरी, शिवसहायसिंग बघेल, नारायण स्टोअर्स, सुका मेव्याचे व्यापारी प्रेमजी लालजी व्होरा, सोनिग्रा आणि किराणा व्यवसायिक जेठालाल शाह यांचा परिचय, या लेखमालेत करून दिला आहे. सत्तर-ऐंशी वर्षांपासून विलेपारल्याच्या संस्कृतीचे हेच सगळे DNA घटक आहेत, हे फडक्यांचे विधान नक्कीच पटण्यासारखे आहे.

रेल्वेमुळे विलेपारल्याचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग झाले आहेत. पूर्वेत मराठीचे प्राबल्य तर पश्चिम हा गुजराती बहुभाषिक. पारल्याच्या दक्षिणेला सांताक्रुज, उत्तरेला अंधेरी, पूर्वेला सहार गांव तर पश्चिमेला जुहू अशी गांवे होती. ब्रिटीशांच्या काळी **इरले** आणि **पारले** अशी दोन गांवे होती त्याचे पुढे विलेपारले झाले.

इस्कॉन मंदिरासमोर असलेले मुक्तेश्वर महादेव मंदिर हे तत्कालीन पारल्यातील सर्वात जुने देवालय. रघुनाथ राणे यांचा उल्लेख इतिहासात आढळतो. जुहू म्युनसिपालटी १९१९ साली स्थापन झाली. १९२८ साली जुहू फ्लाईंग क्लब स्थापन झाल्यावर विलेपारल्यात वेगाने बदल घडून आले. स्वातंत्र्यानंतर १९४७ साली सांताक्रुज एअरपोर्ट भारत सरकारच्या ताब्यात आल्यावर, विलेपारले जागतिक नकाशावर आलं.

विलेपारले हे चळवळया मंडळींचे गाव म्हणून सर्वदूर परिचित आहे. सहकारी गृहनिर्माण चळवळ, ग्राहक सहकार चळवळ, प्रायोगिक नाटकं, स्वच्छ पार्ले अभियान अशा अनेक चळवळींचे माहेरघर. अश्या पारल्याच्या जडणघडणीत ज्या अमराठी बलुतेदारानी वाटा उचलला त्यांच यथायोग्य चित्रण अरूण फडक्यांनी केल आहे ते करताना त्यांनी पारल्याच्या धावत्या इतिहासाचाही मागोवा घेतला आहे. हे सर्व शक्य होण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे मार्केट मध्येच असलेले वास्तव्य, त्यांचे कुतूहल, डोळस वृती आणि आत्मियता, ममत्व. त्यांची निरक्षण शक्ती चांगलीच आहे. ह्या बलुतेदारांच्या यशाचं वर्णन करताना त्यांच्या उद्यमशीलतेचा, परिश्रमांच्या तयारीचा, वक्तशीरपणा, चाणाक्ष नजर नियमितता या गुणांचा नेमका उल्लेख केला आहे. खरतर जीवनात यशस्वी कसे व्हावे यांचे हे केस स्टडीचं आहेत.

बलुतेदारांच्या प्रगतीचा इतिहास खरं म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील उद्दमशीलतेचा इतिहास आहे. अरूण यांनी इतिहास टिपताना भवतालावर ही सूक्ष्म भाष्य केले आहे. कुटूंब आणि समाजव्यवस्थेत झालेला सुक्ष्मबदल, विलेपारले उपनगराची घडी त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक शिस्तीच्या धाग्यांमुळे व्यवस्थित बसली होती इत्यादी वाक्ये त्यांच्या निरीक्षण शक्तीची प्रचिती देतात.

पार्लेकर असल्यामुळे यातील काही जणांच्या सेवेचा उपभोग मी घेतला आहे, पण आज त्यांचा खरा परिचय झाल्याचं समाधान मिळालं. मोरबंगला अस्तित्वात असल्यापासून पार्लेजी फॅक्टरी अस्तंगत होईपर्यंतचा काळ, मी स्वतः अनुभवला असल्याने यातील सर्वच व्यक्तिरेखाटने अस्सल उतरली आहेत. मुंबई सारख्या मेट्रो शहरात विलेपारल्या सारखं गांव विरघळून न जाता (मेल्टिंग पॉट) आपलं अस्तित्वं टिकवून आहे याच कारण म्हणजे पारल्यातील संस्था, पार्लेकर नागरिक आणि पारल्याच्या जडणघडणीत सामील असलेले हे बलुतेदार. अरूण फडके यांनी अमराठी बलूतेदारांवर जसं लिहील तसचं मराठी बलूतेदारांवरील ई पुस्तक ते लवकरच लिहून प्रकाशित करातील अशी अपेक्षा आहे.

विलेपारल्यातीलच नव्हे तर पारल्याबाहेरील रसिक वाचक या पुस्तकाच भरभरून स्वागत करतील अशा अपेक्षेसह माझ्या त्यांना शुभेच्छा..

कारण म्हटलंच आहे

**पारले आमचे, पारले आमचे**

**पारले ....आमचे गांव .**

**राहतात तिथं माणसं**

**माणसं म्हणजे काय....?**

या प्रश्नांचं उत्तर जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचलंच पाहिजे...!!

**डॉ.अनिल अनंत बांदिवडेकर**

कोजागिरी पौर्णिमा.

३० ऑक्टोबर, २०२०.

## अर्पण पत्रिका

**माझ्या या लेखमालेतील बहुतांशी घटनांचे उल्लेख, विलेपारल्यातील माझ्या बालपणातील जीवनकाळात स्मृतीबद्ध झालेले आहेत. माझे रम्य बालपण स्मृतीसमृध्द करणारी माझी बहिण, सौ शीला शरदचंद्र पटवर्धन हिच्या सन्मानार्थ हे ई पुस्तक तिला अर्पण केले आहे...!**

अरुण फडके,

# विलेपारल्यातील बलुतेदार भाग १

## अनुक्रमणिका

**१... माताधीन हलवाई.**

**२... पान-विडीवाले नारू शेठ.**

**३... प्रायमस आणि छत्रीचा डॉक्टर मुसाभाई.**

**४... कलिंगड - आंबेवाला गोविंद तेली.**

**५... गोहिल ब्रदर्स, केमिस्ट अ‍ॅन्ड ड्रगीस्ट.**

**६... वर्मा क्लॉथ स्टोर्स – टेलर्स.**

**७... गोपाळ स्वीट आणि शर्मा भेळपुरी हाऊस.**

**८... शिवसहायसिंग बघेल: विलेपारल्यातिल पहिला मंडप डेकोरेटर.**

**९... नारायण स्टोर्सचे नारायणभाई.**

**१०... प्रेमजी लालजी व्होरा - पी एल पार्ला - सुका मेव्याचे व्यापारी.**

**११... शिलाई यंत्रांचे व्यापारी सोनिग्रा.**

**१२... जेठालाल लालजी शाह किराणामालाचे दुकान.**

विलेपारल्यातील बलुत १ / १

# माताधीन हलवाई.

ही गोष्ट तेंव्हाची आहे, जेंव्हा इथले रस्ते लाल मातीचे होते. हरव्यागार निसर्गाने वेढलेल्या गावाच्या कोपऱ्या कोपऱ्यात टुमदार घरांची वस्ती सजली होती मात्र या रहात्या घरांत नागरिकांची वस्ती विरळ होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच सन १९०६ मधे नुकतेच विलेपार्ले रेल्वे स्टेशन बांधले गेले होते आणि आता बाहेरच्या जगाशी या चिमुकल्या गावाचा संपर्क सहज झाला होता.

हे वर्णन आहे साधारण शंभर वर्षांपूर्वीच्या आपल्या विलेपारल्याचे. आपलं पारले म्हणजे आज मैलोंमैल आडव्या-उभ्या पसरलेल्या मुंबैनगरीतील एक महत्वाचे उपनगर, जणू या महाकाय शहराच्या हृदयावरचा कौस्तुभ मणी. मुंबईच्या जुहू समुद्रकिनाऱ्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या एकेकाळच्या या छोट्याशा गावाचा, विलेपारले रेल्वे स्टेशनच्या निर्मिती नंतर साधारण शंभर – एकशे दहा वर्षांत संपूर्ण कायापालट झालेला दिसतो. विलेपारल्यात, अलीकडच्या २०-२५ वर्षांत

स्थायिक झालेल्या नागरिकांना सुद्धा हे पटकन जाणवते इतक्या वेगाने हे बदल होत आहेत.

मी विलेपारल्यात जन्माला आलो...इथल्याच पारले टिळक विद्यालय आणि म ल डहाणूकर या वाणिज्य महाविद्यालयात माझे शिक्षण पूर्ण झाले. नंतरच्या काळात, इमारत दुरुस्ती आणि इंटिरियर सजावट या व्यवसायात कंत्राटदार म्हणून याच उपनगरात भरपूर व्यावसायिक कामे केली. माझ्या या गावातील संस्थांच्या -- वास्तूंच्या – घटनांच्या आणि पावलापावलावर भेटलेल्या नागरिकांच्या – व्यापाऱ्यांच्या – दुकानदारांच्या, लहानपणा पासून स्मृतीबद्ध झालेल्या नोंदी आणि आठवणी कायम ताज्या राहिल्या आहेत.

अगदी अलीकडे गप्पांच्या ओघात विलेपारल्याच्या या प्राथमिक जडणघडणीचा आणि इथे रुजलेल्या एका खास संस्कृतीचा विषय निघाला. त्यावेळी विलेपारल्याच्या संस्कृतीचे DNA घटक असे संबोधन कोणीतरी वापरले आणि या लेखमालेचा तो ट्रिगर पॉईन्ट ठरला.

गेल्या शतकांत आपल्या विलेपारल्याची घातली गेलेली सुरुवातीची घट्ट वीण म्हणजेच ही परिसरातील समाजाला जाणिवपूर्वक मार्गदर्शन करून प्रगतीशील – उद्यमी - सौजन्यशील बनवणारी संस्कृती. यात शिक्षण – समाजकारण – राजकारण – संगीत – नाटक – वाचन अशा मुख्य धारेतील अनेक क्षेत्रातील विलेपारल्याचे स्थान अनन्यसाधारण आहेच. आज या संस्कृतीच्या सर्वांना परिचित तरीही पडद्याआड लपलेल्या अनोख्या DNA घटकांचा परिचय करून देणारी **विलेपारल्यातील बलुतं** ही ताजी लेखमाला, वर्ष २०२० मध्ये **ईसाहित्य प्रतिष्ठानच्या** वाचकांसमोर ठेवतांना आनंद होतो आहे.

नोकरी-उद्योगानिमित्ताने आज जगभारत कुठेही स्थायिक झालेल्या प्रत्येकाला आपल्या विलेपारले या अनोख्या जन्मस्थानाचा यथार्थ अभिमान आसतो. मात्र एक लक्षात घ्यायला हवे की **आम्ही पारल्याचे मूळ निवासी, आमचा जन्म विलेपारल्याचा** असे आज अभिमानाने सांगणाऱ्या इथल्या प्रत्यक नागरीकाचे पालक किंवा आधीची पिढी साधारण

एकोणीसाव्या शतकाच्या अखेर पासून विलेपारल्यात विविध उद्देशाने स्थायिक झाली होती.

ज्यांच्या पोटी जन्म घेतला ते पालक किंवा आधीची पिढी असा दुहेरी उल्लेख करण्यामागे तसेच खास कारण आहे. साधारण सन १८९० ते सन १९३० या साधारण चाळीस वर्षांच्या काळात इथे येऊन स्थायिक झालेली बहुतांशी चाकरमानी मराठी कुटुंब, काही सन्मान्य अपवाद वगळता, कोंकण आणि त्यापलीकडील गोवा – सिंधुदुर्ग - मालवण या प्रदेशातून आलेली होती. पुढच्या शिक्षणासाठी किंवा चरितार्थासाठी, मुंबईला रहाणाऱ्या मामाकडे – काकांकडे – मावशीकडे – आत्याकडे - मोठ्या भावाकडे अथवा मोठ्या बहिणीकडे जायचे अशा जिवलग नात्यातून, या कुटुंबांच्या मागोमाग त्यांचे अन्य सगे-सोयरे विलेपारल्यात आले होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळांत प्रचलित झालेली ती आपुलकीची – मायेची – वात्सल्याची - विश्वासाची ही विशिष्ट संस्कृती, प्रत्येक कुटुंबामधे वस्तीला आलेल्या तत्कालीन तरुणांकडून आजही जपली जाते. त्या काळात नातलगांच्या आश्रयाला आलेले असे अनेक तरुण आज त्यांच्या वयाची नव्वदी पार करताना समाधानाने या संस्कृतीचा उल्लेख करतात.

मात्र इथे आलेल्या सर्वांनाच आपल्या सग्यांचा आश्रय उपलब्ध झालेला नव्हता. त्यातले काही निसर्गदत्त उर्जा आणि प्रेरणेने, मुंबई मायानगरीतील या उपनगराच्या आश्रयाला आले होते. अनेकविध व्यक्तिमत्वाच्या या तरुणाईच्या गुणवत्तेतील फक्त तीन पैलू समान होते. पहिली गोष्ट, बारा-पंधरा ते वीस वयोगटातील हे सर्व तरुण अमराठी होते, इथे येईपर्यंत यातल्या कोणालाही मराठी भाषेचा साधा परिचयही झालेला नव्हता. दुसरी गोष्ट उत्तर प्रदेश – बिहार – कर्नाटक – गुजरात - राजस्थान अशा राज्यातून आलेल्या या तरुणांना अगदी थोड्या प्रमाणात त्यांच्या कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायाचा जुजबी परिचय झालेला होता आणि त्यातला प्रत्येक तरुण उद्यमी होता. या सर्वांच्या तिसऱ्या समान पैलूचा परिचय मात्र, यांच्या कारकीर्द आणि कर्तृत्वाचा लेखाजोखा मांडताना आज मागे वळून पाहिल्यावर होतो. अभ्यासाने आज लक्षात येते ती गोष्ट अशी की ऐंशी - नव्वद वर्षांनंतर या सर्वांच्या तिसऱ्या – चवथ्या पिढीतील तरुणांनी त्यांचा  व्यवसाय वृद्धींगत केला आहे.

माताधीन मंगली हलवाई हा असाच सतरा-अठरा वर्षांचा एक तरुण साधारण १९२७-२८ सालांत विलेपारल्यात दाखल झाला होता. उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात बबेरू हे अगदी छोटेसे गाव

आहे. चित्रकुट या सुपरिचित स्थानांच्या जवळचे एक गाव इतकाच या गावाचा परिचय. माताधीन यांचे हे जन्मस्थान. शेतावर मजुरी करून राबणारे आई - वडील आणि त्यांचा कुटुंब काबीला यांची गुजराण रोज मिळणाऱ्या तुटपुंज्या मजुरीच्या पैशातूनच होत असावी. गावातले कोणीतरी मुंबईला जातात आणि तत्कालीन मुंबईच्या परिस्थीतीचा परिचय माताधीनला त्यांच्या टपालातून आलेल्या चिठीतून होतो. आई-वडिलांना आधार म्हणून मोलमजुरीच्या अपेक्षेने माताधीन १९२६ सालात मुंबईतील अंधेरी तालुक्यात आपल्या गावाकडील परिचिताला येऊन भेटतो. निसर्गदत्त उर्जा, अंग मेहनत करायची तयारी, अंगभूत उद्यमी वृत्ती आणि धाडसी माताधीन, वर्षभराने सगळे अनुभव घेत विलेपार्ल्यात येतो. बळकट शरीराचा धिप्पाड दिसला तरी मातादिन सज्जन, सत्शील आणि नम्र वृत्तीचा होता.

संध्याकाळी सात वाजता कुलाब्याहून येणाऱ्या ट्रेनने चाकरमानी रहिवासी विलेपारल्यात स्टेशनवर उतरले की मुळातच विरळ वस्ती असलेल्या गावांतील रस्त्यांवर सुनसान होत असे. रेल्वे स्टेशन झाले असले तरी त्याकाळात रस्त्यांवर रॉकेलचे दिवे लावलेले असत. रॉकेल संपले की या दिवट्या विझून जात आणि

सारा गाव अंधारात गुडूप होऊन जाई. मुंबईतील वर्षभराच्या अशाच अनुभवाने समृध्द झालेला या तरुण माताधीनने विलेपारले रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या मंडई जवळची जागा हेरतो आणि तिथला उंचवटा त्याला सोयीचा वाटतो. चार काठ्यांवर एक कपडा बांधून एक दिवस माताधीन आपला विडे-पानाचा ठेला सुरु करतो.

आज गावडे हॉस्पिटल ज्या जागेवर उभे आहे त्या जागी त्याकाळात एक सुबक मंडई बांधलेली होती. मंडईत शिरल्यावर उजव्या – डाव्या बाजूला दुकाने आणि थोडेसे आत बंदिस्त जागेवर बांधलेल्या ओट्यावर भाजी-फळे-फुलांचे ठेले अशी ती रचना होती. याच मंडईच्या बाहेर उजव्या हाताला लागून असलेला उंचवटा म्हणजे माताधीनचा विडे-पानाचा ठेला. दिवस सरेपर्यंत मंडईत लोकांची ये-जा असे त्यामुळे माताधीनला उत्तम व्यवसाय करता येत असे. मंडईच्या समोरच गोखले कुटुंबाचा रुबाबदार बंगला होता. मूळ आयुर्वेदाचार्य असलेल्या गोखले कुटुंबात साधारण वर्ष १८७५ पासून पुढच्या पिढीतील अनेक तरुण डॉक्टर झाले आणि आजही कुटुंबाचा हा वसा पुढील पिढ्यांनी स्वीकारला आहे. या श्रद्धाळू गोखले कुटुंबाचे श्रीराम हे आराध्य दैवत होते. याच श्रद्धेने या कुटुंबाने १९१३ साली श्रीरामाचे देऊळ बांधले.

पार्लेकारांचे श्रद्धास्थान असलेले विलेपारल्याच्या भर बाजारपेठेत डौलाने उभे असलेले हेच ते देऊळ. लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेच्या ईमारतील पहिल्या मजल्यावरील गोखले सभागृह हे याच गोखले कुटुंबाच्या देणगीतून बांधले गेले आहे.

उंच – धिप्पाड अशा वरकरणी राकट दिसणाऱ्या तरीही सत्शील आणि सज्जन माताधीनचा याच गोखले यांच्याशी परिचय होऊन कालांतराने त्याचे रुपांतर स्नेह आणि विश्वासात झाले. आपल्यालाही आधार वाटेल याच स्नेहभावनेतून गोखल्यांनी आपल्या बंगल्याच्या आवारात माताधीनसाठी खोली बांधून दिली आणि आता माताधीनच्या रहाण्याची व्यवस्था झाली.

चार काठ्यांवर कापड बांधून, सन १९२७ मधे आपला विडे-पानाचा व्यवसाय उभा करणाऱ्या माताधीनचा, कालांतराने माताधीन शेठ बनला त्याची ही वास्तव कहाणी आहे. आधी कच्च्या शेड मधे विस्तारलेल्या दुकानात हळूहळू स्टेशनरी साहित्याची विक्री सुरु झाली. कालांतराने मोठा मुलगा जुगलकिशोर वडिलांच्या मदतीला आला. आता दुकानात खेळणी – भेटवस्तू – सजावटीचे साहित्य – खेळाचे सामान – मणी आणि रंगीत दोरे अशा अनेक वस्तू वाढत गेल्या. यथावकाश धाकटा

मुलगा ब्रिजकिशोर मोठ्या भावाच्या मदतीला आला आणि त्याच्या मदतीने १९८० सालात पक्क्या स्वरूपाचे बांधकाम होऊन दुकानाचे स्वरूप देखणे झाले. आज गावडे हॉस्पिटलच्या उजव्या बाजूला असलेल्या **सेन्ट्रल जनरल स्टोर्स** हे माताधीन शेठच्या कारकिर्दीतील त्यांच्या अखंड परिश्रमाचे फलित आहे. विडे-पानाच्या ठेल्याचे यथावकाश अन्य व्यवसायात रुपांतर होत गेले. मोठा मुलगा जुगलकिशोर अल्पायुषी ठरले. आज त्यांचा एक मुलगा ब्रिजकिशोरसह भरभराटीला आलेल्या दुकानाचा व्यवहार सांभाळतो आहे.

आज बाजारात चमकदार भेटवस्तूंची रेलचेल झालेली दिसते. तरीही सेन्ट्रल जनरल स्टोअर्स मधे मात्र मुलांच्या पसंतीला उतरणाऱ्या, सर्वसामन्यांच्या खिशाला परवडणाऱ्या भेटवस्तू खच्चून भरलेल्या दिसतील. सत्तर वर्षांहून अधिक काळ विलेपारल्याचे DNA घडवणारा, सर्वमान्य तरीही थोडासा अपरिचित हा आपला पहिला बलुतेदार. उत्तरप्रदेशातून आलेले आणि या भर बाजारातील दुकानासह परिसरातील मोक्यावरील ईमारतींचे मालक, माताधीन शेठ.

--oo--

विलेपारल्यातील बलुत १ / २

# पान-विडीवाले नारू शेठ.

अकरावीचि परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालायात प्रवेश घेतला तेंव्हाच, आपल्यातला प्रत्येकजण या मुंबईच्या उपनगरात तसा उपरांच आहे याची जाणीव मला झाली होती. आगरी आणि कोळी असे इथले मूळ रहिवासी जागा विकून अन्यत्र स्थायिक झाले असावे. नेमक्या याच काळात, मुंबईतील मराठी नागरिक सोडून, आम्ही स्थानिक मराठी – तुम्ही अमराठी म्हणून सगळे उपरे आहेत आशी राजकीय भूमिका काही नेत्यांनी घेतली होती. त्या तरुण वयातही ही भूमिका नक्कीच पटलेली नव्हती. त्याला कारणेही तशीच होती. या भूमिकेशी मी कायमच धृढ राहिलो आहे आणि नेमक्या याच धोरणाने, विलेपारल्यातील DNA चे घटक असलेल्या अमराठी बलूतेदारांचा परिचय हा या वर्ष २०१९ मधील लेखमालेचा प्राथमिक हेतू आहे.

१९७० सालांतील दोन घटनांमुळे पुढील काळातील आपले अवकाश खूप व्यापक होणार आहे याची अनुभूती मात्र झाली नव्हती. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर महाविद्यालयात घेतलेला

प्रवेश आणि विलेपारल्यातील प्रायोगिक नाट्य चळवळीशी झालेला परिचय, या वरकरणी सामान्य अशा दोन घटना. कुमारवयातील शालेय शिस्तीतून बाहेर पडून तारुण्यात प्रवेश करणाऱ्या कुठल्याही तरूण-तरुणीचा अनुभव, साधारण असाच असतो.

साधारण सव्वाशे-दीडशे वर्षांपूर्वी,१८५०-१८६० सालांत असे अनेक उपरे या निसर्गरम्य विलेपारल्याच्या प्रेमात पडले असावे. उपरे अशासाठी म्हणावे, कारण इथला मूलनिवासी किंवा स्थानिक रहिवासी उरला नव्हता. आपल्या मोठ्या जमिनी धनिकांना विकून असे मुलनिवासी नागरिक, मच्छिमारीच्या आपल्या पारंपरिक व्यवसायात व्यस्त झाले होते.

मुंबई महानगरीच्या हृदयावरील कौस्तुभमणी म्हणजे आपलं विलेपारले. खरं म्हणजे अशा उपऱ्यानी वसवलेल उपनगर असे म्हणायला हरकत नाही. मात्र असे इथले उपरे रहिवासी फार धोरणी होते. नंतरच्या काळात स्थानांतर करून विलेपारल्यात आलेल्या प्रत्येकाच्या साधारण चार प्रमुख गरजांचा विचार सुरुवातीला इथे स्थायिक झालेल्या या चतुर – धोरणी मंडळीनी केला होता.

निवारा+अन्न+शिक्षण+समाज सहजीवन या प्राथमिक सुविधा, या उपनगरात विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच निर्माण झाल्या होत्या. शिक्षण हे भविष्यातील प्रगतीचे प्रमुख साधन आहे याची निश्चित कल्पना असल्याने नेमस्त – सत्वशील मराठी आणि तमिळी - उद्यमी मारवाडी आणि गुजराती अशा समाजातील विविध स्तरातून आलेल्या सुजाण नागरिकांनी, दूरदृष्टीने विलेपारल्याच्या शिक्षण संस्थांचा पाया रचला होता. पारले टिळक विद्यालय, हिंदी भाषिकांची रुईया हायस्कूल, तमिळ बांधवानी स्थापन केलेली ग्रेटर मुंबई एज्युकेशन सोसायटीची शाळा, महिला संघ शाळा आणि साठ्ये महाविद्यालय, डहाणूकर महाविद्यालय या विलेपारल्याच्या पूर्वेकडील शिक्षण संस्था. विलेपारल्याच्या पश्चिमेला असलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांची सेंट झेवियर शाळा, गुजराती बांधवांची गोकलीबाई शाळा, चतुर्भुज नरसी शाळा आणि केळवणी मंडळाची अनेक महाविद्यालये, अशा सर्व शिक्षण संस्था आज विलेपारल्याची शान आहेत.  शंभरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पारले टिळक विद्यालयात किंवा पन्नाशी पार केलेल्या महिला संघाच्या शाळेत आपल्या मुलांना प्रवेश मिळावा अशी प्रत्येक मराठी कुटुंबातील पालाकांची अपेक्षा असते.

कन्नड मातृभाषा असलेल्या रवी सुवर्णाला मात्र त्याच्या वडिलांनी विलेपारले पश्चिमेकडील इंग्लिश माध्यमाच्या सेंट झेवियर शाळेत दाखल केले होते. शाळेत असल्यापासून रवी सुवर्णाचा आणि माझा परिचय होता. शाळेत जाताना आणि घरी परत येताना, कधीतरी वडिलांच्या बरोबर पान-विडीच्या दुकानात बसलेला रवी मला दिसत असे. लष्करात भारती व्हावे अशी इच्छा असल्याने सातवी इयत्तेनंतर रवीने, पुण्यातील शिवाजीनगर मधील शिवाजी प्रीपरेटरी मिल्ट्री स्कूलमधे प्रवेश घेतला होता. रवी लष्कराची स्वप्ने पहात होता मात्र त्याआधीच, त्याच्या वडिलांनी त्यांच्या भविष्यासाठी यशाचा मार्ग बनवला होता.

खरं म्हणजे ही गोष्ट आहे विलेपारल्यातील आपल्या दुसऱ्या बलुतेदाराची, रवीचे वडील नारायण के सुवर्णा यांची. कर्नाटकातील मंगलोर आणि उडिपी हे दोन जिल्हे, मेहनती आणि धाडसी हॉटेल व्यवसायातील उद्योजकांसाठी ख्यातनाम आहे. इथल्या प्रत्येक उद्यमशील शेट्टी आणि पुजारी कुटुंबातील तरुणाने भारतीय, विशेषकरून दक्षिण भारतीय रसना संस्कृतीचा परिचय स्वदेशातिल आणि जगभरातिल रसिक खवय्यांना करून दिला आहे. खाद्यसंस्कृती – हॉटेल – रेस्टॉरंट व्यवसाय म्हणजे शेट्टी असे

समीकरण जगन्मान्य झाले आहे. शिरवा मंचकाल या उडिपी जिल्ह्यातील छोट्या गावात, एका सधन कुटुंबात, १९१७ सालांत जन्म झालेल्या नारायणने, १९३७ मधेच वयाच्या विसाव्या वर्षी मुंबई गाठली होती. त्यांच्या आमदानीत, खूप तरुण वयातच मिळालेल्या व्यवसायातील यशामुळे, नारुशेठ असे आदरार्थी संबोधन नारायण सुवार्णा याना प्राप्त झाले होते. धाकटा भाऊ शंकर सुवर्णा यांना व्यवसायातील अशाच यशासाठी, चक्कुशेठ या आदरार्थी संबोधनाने संबोधित केले गेले होते.

नारायण १९३७ सालांत मुंबईत आल्यावर प्रथम त्याने विलेपारले पश्चिमेला स्टेशनसमोरच्या तत्कालीन रामअंजनेय या हॉटेलात वेटरची नोकरी स्वीकारली. टेबल पुसणारा – टेबलावरची रिकामी भांडी उचलणारा किंवा वेटर, अशीच सर्व कामे सुरुवातीला करून प्रत्येक शेट्टी बांधव, हॉटेल व्यवसायात यशस्वी होत असावा. नारायण सुद्धा याला अपवाद नव्हता. रामअंजनेय हॉटेलात वेटर म्हणून आणि हॉटेल बाहेरच्या पान-विडीच्या दुकानात विडे आणि विड्या बनविण्याचा अडीच वर्षे अनुभव घेऊन धाडसी नारायणने वयाच्या तेविसाव्या वर्षीच आपल्या पहिल्या उद्योगाची सुरुवात केली. विलेपारले पूर्वेला स्टेशन

समोरचा मोंघीबाई रस्ता आता भाजीपाला-फळांची मोठी बाजारपेठ बनला आहे. स्टेशनवरून जरा पुढे चालत आले की श्रद्धानंद रस्त्याच्या कोपऱ्यावर, गोपाळ फरसाण मार्टच्या समोर सेठिया निवास ही इमारत आहे. याच इमारतीच्या तळमजल्यावरील मोक्याच्या कोपऱ्यावर नारायणने प्रथम आपले पान-विडीचे दुकान मांडले. या मधल्या काळांत धाकटा भाऊ शंकर, नारायणच्या मदतीला आला होता. विस्तारलेल्या जागेतील आजचे होजियरीचे विश्व जनरल स्टोर्स, हेच नारायणाचे त्याकाळातील पान-विडीचे दुकान.

पान-विड्याचा व्यवसाय वाढत होता. साधारण १९४२ साली धाकटा भाऊ शंकर मदतीला आल्यानंतर नारायणने त्याच्या व्यवसायाचा विस्तार सुरु केला. नेहरू रोडच्या पुढे असलेल्या गोखले रस्त्यावरील एका ईमारतील, नारायणने एक गाळा भाड्याने घेतला. याच बरोबर तत्कालीन कांबळे वाडीत, आजच्या जीवन हॉटेलच्या बाजूला, एक दुकान भाड्याने घेऊन भावाला, सुवर्णा जनरल स्टोर्स या नावाने वेगळा व्यवसाय सुरु करून दिला. गोखले रोडवरील जागेत दोन पाळयात काम करणाऱ्या साधारण पन्नास कामगारांच्यासह विडी वळण्याचा कारखाना सुरु करणे आणि

धाकटा भाऊ शंकरला मदतीला घेऊन कांबळे वाडीतिल दुकानांत, सिगारेट आणि आपणच बनवलेल्या विडीचा घाऊक विक्रीचा व्यापार सुरु करणे असा नारायणचा दुहिरी प्रयत्न होता. दोन्ही प्रयत्न यशस्वी झाले आणि पुढच्या पंधरा वर्षांच्या काळांत नारायण सुवर्णाचा नारूशेठ आणि शंकर सुवर्णाचा चक्कूशेठ असा आदर आणि सन्मान, दोघाना प्राप्त झाला.

व्यवसायातील यश, मागोमाग लक्ष्मी आणि संपन्नता घेऊनच येते. नारू शेठ यांनी १९६० सालांत प्रार्थना समाज रस्त्यावर जमीन विकत घेतली आणि शांतीकुंज बंगला बांधला. व्यवसायातले यश असे सहजासहजी मिळत नसते. देवावर श्रद्धा, आत्मविश्वास, नियमितपण आणि वक्तशीर दैनंदिन व्यवहार ही नारूशेठ यांच्या यशाची गुरुकिल्ली होती. कांजी केलेला पांढरा शुभ्र सदरा, तसेच शुभ्र धोतर आणि खांद्यावर पांढरे शुभ्र उपरणे, कपाळावर गंधाचा टिळा अश्या रुबाबात मितभाषी नारूशेठ बरोब्बर नऊ वाजता घराबाहेर पडत. प्रथम पार्लेश्वराचे दर्शन आणि मग आपल्या दुकानासमोरच्या श्रीरामाचे दर्शन असा दुकानात पोहोचण्या आधीचा त्यांचा नित्यक्रम असे. पान–विडीचे दुकान होते तोपर्यंत त्यांच्या परीधानात होणारा विशिष्ट बदल, आजही त्यांच्या

बंगल्याच्या परिसरात रहाणाऱ्या माझ्या मित्रांच्या आणि माझ्याही स्मरणात आहे. पानाच्या दुकानात विडे बनवून दुपारी साधारण दोन वाजता, नारूशेठ जेवायला घरी जायला निघायचे. तोपयंत छातीपासून पोटापर्यंत, त्यांचा पांढरा शुभ्र सदरा, काथ-चुन्यात रंगवल्यासारखा लालेलाल होत असे.

साधारण सन १९४० ते १९६५ पर्यंत नारुशेठ यांनी पान-विडीचे दुकान चालवले. याच १९६५ सालांत त्यांनी विडीचा कारखाना, घाऊक व्यापार आणि पान-विडीचा व्यवसाय बंद करायचा निर्णय घेतला आणि दोन्ही दुकानांचा कायापालट झाला. कुलूप-टूथब्रश-नेलकटर, दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या विजेऱ्या, सर्व प्रकारच्या बॅटरी, दाढीचा ब्रश-साबण-बॉडी स्प्रे असे पुरुषांच्या प्रसाधनाचे सामान, घरांत आणि प्रवासात लागणारे सर्व सामान अशा अनेक वस्तू दुकानात विक्रीला ठेवल्या गेल्या. १९६८ सालांत अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झालेला मोठा मुलगा रवी, दुकानात मदतीला आला होता आणि बदललेल्या व्यवसायाची सुद्धा भरभराट झाली होती.

शेट्टी कुटुंबात जन्म झालेल्या नारुशेठ यांना हॉटेलचा व्यवसाय करावासा वाटणे हे अगदी साहजिक होते. १९७० सालात त्यांनी मालाड पश्चिमेकडील एक हॉटेल विकत घेतले. त्यांचा हॉटेल व्यवसाय सुरूही झाला. मात्र पारल्यातील दुकान सोडून हॉटेलच्या दैनंदिन कामात लक्ष घालणे त्यांना शक्य झाले नाही त्यामुळे ते हॉटेल त्यांनी विकून टाकले.

अगदी तरुण वयात कुटुंब आणि गाव सोडून पारल्यात स्थायिक झालेल्या नारुशेठना गावाची ओढ कायम राहिली. दरवर्षी दोन आठवडे आपल्या गावातील कुटुंबाला भेटायला जायचा त्यांचा शिरस्ता कधीच चुकला नाही. मोठा मुलगा रवी याने समर्थपणे दुकानाची जबाबदारी घेतल्याचे लक्षात आल्यावर नारुशेठ यांनी आपल्या जन्मगावात नवे घर बांधायचा निर्णय घेतला. दुकानाच्या जबाबदारीतून मोकळे झाल्यावर वर्षातून तीन महिने गावाकडील नव्या घरांत जाऊन राहण्याचा शिरस्ताही त्यांनी नेमाने पाळला.

तिकडे चक्कूशेठ आपल्या सिगारेट – विडीच्या घाऊक विक्री व्यवसायांत यशस्वी झाले होते. १९६६/६७ च्या सुमारास गोखले रोडवरील विडी वळण्याचा व्यवसाय बंद केला होता आणि

चक्कूशेठनी त्यांचा व्यवसाय बदलला होता. नारुशेठ आणि चक्कुशेठ दोघेही दुकानांत बसून व्यवहार करत असले तरी मितभाषी होते. आण्णासाहेब साठे यांचे विजय स्टोअर्स अगदी शेजारीच होते आणि दोघांचाही साठे यांच्याशी मात्र स्नेह होता. दुर्दैवाने चक्कुशेठ अल्पायुषी ठरले, १९७६ साली त्यांना देवाज्ञा झाली. बहुतांशी पारलेकर नागरिकाना नारूशेठ आणि चक्कूशेठ यांचा यशस्वी व्यवसाय आणि त्यातून झालेली कुटुंबाची प्रगती याचा परिचय बहुधा नसावा असे मला वाटते.

आज, नारुशेठ आणि चक्कुशेठ यांच्या पुढील पिढीतील तरुणांनी व्यवसाय वृद्धींगत केला आहे. व्यवसायातिल कौशल्य आणि जाणकारीमुळे, काळानुरूप बदल करत, नारुशेठ यांचा मोठा मुलगा रवी याने आणि चक्कुशेठ यांच्या मुलाने आता होजियरी आणि तयार कपडे या व्यवसायाचा विस्तार केला आहे. २००६ सालांत, वयाच्या ८९ व्या वर्षी नारुशेठ यांनी जगाचा निरोप घेतला आणि विलेपारल्याच्या संस्कृतीचे DNA विकसित करणाऱ्या एका बालुतेदाराच्या फक्त आठवणी उरल्या...!!

--oo--

विलेपारल्यातील बलुत १ / ३

# प्रायमस आणि छत्रीचा डॉक्टर मुसाभाई.

कुलाब्याहून निघालेली एखादी गाडी १९०६ सालांत स्थापन झालेल्या विलेपारले रेल्वे स्थानकावरून पुढे गेली की पुन्हा किमान दोन तास लाल आणि हिरव्या रंगाचे बावटे घेऊन फलाटाच्या दोन कोपऱ्यात उभ्या असलेल्या ईशारेबाजाना (Signal men) विश्रांती मिळत असे. विलेपारले रेल्वे स्थानकाच्या स्थापनेनंतर साधरण २५ वर्षांनंतर, १९३०/३२ या दोन वर्षात, विलेपारल्यासह पश्चिम रेल्वेच्या उपनगर सेवेचे विद्युतीकरण झाले आणि उपनगर रेल्वे विजेवर धावू लागली. त्याबरोबर अर्थातच अगदी प्राथमिक ब्लॉक सिग्नल सिस्टीम बसवली गेली आणि या ईशारेबाजांचे काम कमी झाले. आता हे हिरवे आणि लाल बावटे गार्ड आणि मोटरमन यांच्या हातात आले होते.

गाड्यांची खूप रहदारी नसल्यामुळे, ब्लॉक सिग्नल सिस्टीम बरोबरच लाल किंवा हिरवे बावटे दाखवून रेल्वे गाडीच्या दोन टोकांना असलेले गार्ड आणि मोटरमन यांचे, गाडी सुरु न करण्याचे किंवा सुरु करण्याचे ईशारे देणे सुरु झाले. मात्र हे बावटे फक्त दिवसा

कामाला येत असत. साधारण १९५० ते ५५ या काळात पश्चिम रेल्वेच्या सेवेत असलेल्या माझ्या  काकांची, उपनगर विभागात गार्ड म्हणून नेमणूक झाली होती. एकदा अंधार पडला की मग बावटे बाजूला ठेवून लाल किंवा हिरव्या रंगाच्या काचा लावलेले केरोसिनचे दिवे ईशारे अर्थात सिग्नल देण्यासाठी वापरले जात असत. काकांच्या घरी असलेले लाल-हिरवे बावटे आणि तशाच रंगीत काचा लावलेले पितळी दिवे हे बालवयात कायम माझ्या कुतुहलाचे विषय होते. चार-सहा वर्षांसाठीच काकांची नेमणूक मुंबईत झाली होती त्यामुळे ते त्याकाळात विलेपारल्यातच रहात असत. माझे काका खरेतर बडोद्यात जन्म झाल्याने, निवृत्तीनंतर तिथेच स्थायिक झालेले होते, त्यामुळे त्यांच्या बोलण्यात गुजराती भाषेचा वापरही अगदी सहज होत असे.

गुजरातेतील अमरेलीवरून त्याकाळात नुकतेच मुंबईत आलेले मुसाभाई बिलखीच, गुजराती बोलणारे माझे काका, केरोसिनवर चालणारे रेल्वेच्या सिग्नलचे दिवे, आणि सांताक्रूझ एअरपोर्टच्या तत्कालीन रनवे वरील केरोसीनवर चालणारे दिवे या सर्वांच्या फार मजेशीर आणि रंजक आठवणी आजही माझ्या स्मरणात आहेत.

आत्याच्या सल्ल्यावर भरोसा ठेऊन वयाच्या पंचविशीतला हा तरुण मुसाभाई १९४८/४९ च्या दरम्यान मुंबईत आला. मुसाभाईची आत्या त्याकाळात माहीम बझार जवळ रहात असे. त्याकाळात मुंबईत व्यवसायाच्या भरपूर संधी होत्या, गरज होती ती पडेल ते काम करायची तयारी असलेल्या मेहनती आणि जिद्दी तरुणांची. फार शिकलेला नसला तरी तरुण मुसाभाईकडे या दोन्ही गोष्टी उपजत होत्याच. त्याकाळातही विलेपारले या उपनगराचे नांव मुंबईत सर्वपरिचित होते. मुसाभाई कामाच्या शोधात प्रथम विलेपारल्यातच आला आणि स्टेशन जवळच्या सेठिया निवासमधेच त्यांना दुकानाची छोटीशी जागा सहज उपलब्ध झाली. नंतरच्या काळांत ही छोटीशी जागा फार मोक्याची ठरणार होती. मुसाभाईच्या दुकानाकडे तोंड करून उभे राहिलो की उजवीकडे गोहिल केमिस्ट आणि डावीकडे जवाहर स्टोर्स आणि विजय स्टोअर्स असे व्यवसाय हळूहळू आपला जम बसवत होते. या सर्वांबरोबरच मुसाभाईच्या छोट्याशा व्यवसायाची भरभराट कशी झाली तो इतिहास आज **स्टार्टअप** चा विचार करणाऱ्या तरुण उद्योजकांना निश्चितच मार्गदर्शक ठरावा.

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीला वसलेल्या विलेपारले उपनगरातिल नागरिक आता आर्थिक स्थैर्याकडे प्रवास करत होते. विसाव्या शतकाच्या मध्यावर, १९५० च्या आसपासच्या काळात, विलेपारल्याच्या घराघरातिल कोळश्याच्या चुलींची जागा केरोसिनवर चालणाऱ्या प्रायमस स्टोवने घेतली होती. बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन स्वयंपाकघरातिल जमिनीवर बसून स्वयंपाकाचे काम करण्याच्या जागेवर आता उभ्याने काम करता येईल असे ओटे बनवले जाऊ लागले होते. प्रयामस स्टोवसाठी लागणारे केरोसीन आता शिधापत्रिकेवर सर्वांना उपलब्ध झाले होते. नेमकी हीच परिस्थिती मुसाभाईला प्रगतीच्या मार्गावर घेऊन गेली. प्रायमस स्टोवच्या दैनंदिन वापरामुळे त्याची छोटी-मोठी दुरुस्ती करणे आवश्यक झाले होते. मुसाभाईने अशा प्रायमस स्टोवच्या दुरुस्तीचे कौशल्य स्वतःच्या प्रयत्नाने मोठ्या हिमतीने एव्हाना आत्मसात केले होते.

पावसाळी दिवसात, फोल्डिंग छत्र्या वापरात आलेल्या नव्हत्या आणि रेनकोट फार प्रचलित नव्हते त्या काळांत, लांब दांड्याच्या छत्र्या ही सर्वांचीच गरजेची वस्तू होती. कालपरत्वे पावासाळ्या आधी आणि भर पावसाळ्यात काड्या किंवा मूठ

तुटणे आणि कपडा फाटणे अशा कारणाने या छत्रीची दुरुस्ती करणे आवश्यक झाले होते. एकंदरीतच तत्कालीन समाजमनाचा आणि जीवनमानाचा विचार करता, नवी छत्री न घेता जुनीच छत्री मुसाभाईच्या दुकानात दुरुस्तीला देणे हा पारलेकरांचा शिरस्ता बनला होता. काळजीपूर्वक पाहिल्यास **प्रायमस आणि छत्रीचे डॉक्टर** असे व्यवसायाचे नांव धारण केलेली मुसाभाईच्या दुकानावरची पाटी आजही आपले लक्ष वेधून घेते. नूर मोहंमद आणि जमाल या दोन्ही मुलांनी आपल्या व्यवसायाची केलेली वृद्धी आणि कुटुंबाने केलेल्या प्रगतीची नोंद घेत ९८ वर्षांचे मुसाभाई बिलखिच, निवृत्तीनंतर आता खूप समाधानी आहेत.

मी रहात होतो त्या इमारतीच्या अगदी प्रवेशद्वारातच **प्रायमस आणि छत्रीचे डॉक्टर** हे मुसाभाईचे दुकान होते. दुरुस्तीची कामे वाढल्यामुळे मुसाभाईंचा आतेभाऊ गनी आता दुकान सांभाळायला त्यांच्या मदतीला आला होता. मुसाभाई मितभाषी होते त्या उलट गनीभाई मात्र खूप गप्पिष्ट होते. घरातल्या प्रायमसच्या दुरुस्तीसाठी, माझे काका बऱ्याचवेळा, मुसाभाईंच्या दुकानात येत असत. काकांचा हात धरून कधीमधी मी ही या

दुकानात येत असे. काका, मुसाभाई आणि गनीभाईच्या गुजरातीतील ऐसपैस गप्पा मी बऱ्याचवेळा ऐकल्या आहेत.

रेल्वे गार्ड असलेले काका कधीतरी केरोसीनवर चालणारा त्यांचा रेल्वे सिग्नलचा दिवा मुसाभाईकडे दुरुस्तीला आणत असत. ही गोष्ट आहे साधारण १९५० ते ६० या काळातली. कालांतराने काकांची बदली सुरतेला झाली तरी महिन्यातून दोन वेळा काकांची मुंबईला फेरी होत असे. काकांच्या प्रत्येक फेरीत या दोघांशी आवर्जून गप्पा होत असत. शाळेच्या प्रत्येक उन्हाळी सुट्टीत, काकांबरोबर त्यांच्या गाडीच्या शेवटच्या डब्यातील गार्डच्या केबिन मधून मी अनेकदा सुरत आणि बडोद्यापर्यंत प्रवास केला आहे. या दरम्यान गुजरातेतील अनेक शहारातील वास्तव्यामुळे खूप लहान वयातच मला गुजराती भाषा सहज आत्मसात झाली होती. लहान वयांत ऐकलेल्या मुसाभाई आणि गनीभाई बरोबरच्या काकांच्या गप्पा म्हणूनच आजही स्मरणात आहेत.

सान्ताक्रुज एअरपोर्ट १९३० सालांत स्थापन झाला होता. साधारण १५०० एकर परिसरात पसरलेल्या या एअरपोर्टचा वापर, रॉयल एअर फोर्स या ब्रिटीश वायूसेनेसाठीच होत असे. प्रत्यक्षात

विलेपारल्याला जवळ असलेला हा एअरपोर्ट, १९४७ या वर्षी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय सरकारच्या ताब्यात आला होता. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरु झाली होती. या नंतर एअरपोर्टचे नूतनीकरण आणि विद्युतीकरण करायला सुरुवात झाली होती. १९४७ नंतरच्या या ५ – ७ वर्षांच्या काळात दिवस मावळल्यानंतर धावपट्टीवर उतरणाऱ्या विमानांना मार्गदर्शक म्हणून केरोसिनचे दिवे लावले जात. लांब अंतराच्या धावपट्टीवरिल या दिव्यांची मशागत आणि दुरुस्ती नियमित केली जात असे. एअरपोर्टच्या जवळ विलेपारल्यात दुकान मांडून बसलेल्या मुसाभाईना या दुरुस्ती कामासाठी बोलावणे आले. धावपट्टीचे विद्युतीकरण होईपर्यंतच्या ५-७ वर्षांच्या काळांत, मुसाभाईनी हे काम यशस्वीपणे पूर्ण केले.

तरुणांनी स्वतःच्या हिमतीवर व्यवसाय करावा म्हणून स्टार्टअपचि संकल्पना आपल्या माननिय पंतप्रधानांनी, गेल्या चार-पांच वर्षांत नव्याने मांडली आहे. नूर मोहंमद या मुसाभाईंच्या मोठ्या मुलाशी गप्पा मारताना मात्र, १९६० सालातील मुसाभाईंच्या स्टार्टअपचि आणि त्यात मिळालेल्या यशाची निश्चित माहिती मिळाली. घरगुती एल पी जी सिलेंडरचे आगमन

स्वयंपाकघरांत व्हायचे होते त्या आधीचा हा साधारण १९६० – ६५ चा काळ आहे. १९४९ – ५० मधे स्थापन केलेला प्रायामस आणि छत्री दुरुस्तीचा व्यवसाय आणि दुकान याचा आता जम बसला होता. प्रायमस स्टोव विकणारी एक – दोन दुकाने विलेपारल्यात होती, मात्र कोळशाच्या शेगड्यांचा वापर बंद झाल्याने नव्या स्टोवचि मागणी वाढतच होती. मोठ्या चातुर्याने आणि धाडसाने मुसाभाईनी स्वतःचा प्रायमस स्टोव बनवला. १९२५ सालांत, पार्ले ग्लुकोज या नांवाने विलेपारल्यात प्रथम बनेल्या बिस्कीटांचे **पार्लेजी** हे नांव आज जगभरांत गाजते आहे. **मेड इन पार्ला** या नावाने १९६० सालांत मुसाभाईनी बनवलेल्या प्रायमस स्टोवचा, पुढच्या पंधरा वर्षांत खूप बोलबाला झाला आणि विक्रीचि गणितं मोठी झाली. १९७५ – ८० मधे एल पी जी सिलेंडरचे घराघरांत आगमन झाले आणि मुसाभाईनी स्टोवचे उत्पादन बंद केले. वडिलांनी बनवलेले जुने स्टोव अजूनही दुकानात दुरुस्तीसाठी येतात असा नूर मोहंमद आणि जमाल या दोघांचा अनुभव आहे.

मुसाभाईचे दुकान आजही त्याच जागी आहे मात्र मूर्ती छोटी पण कीर्ती मोठी या लोकश्रुतीप्रमाणे आजही हे दुकान लोकांना

योग्य त्या सेवा देत असते. मुसाभाईचा साठी पार केलेला मुलगा नूर मोहंमद आणि त्याचा धाकटा भाऊ जमाल, आज हा व्यवसाय सांभाळतात. आता दुरुस्तीला येणारे स्टोव कमी झाले असले तरी प्रेशर कुकर, एल पी जी गॅसच्या शेगड्या, धुलाई यंत्र, फ्रीज, एअर कंडीशनर आणि घरातल्या अन्य साधनांची दुरुस्ती आता केली जाते. मुसाभाईचा आतेभाऊ गनीभाई यांनी, मधल्या काळांत, भिडे बंगल्याच्या छोट्या जागेत आपले दुकान सुरु केले होते. गनीभाईचे दोन्ही मुलगे स्वतःचा व्यवसाय याच दुकानात करत आहेत. अगदी तरुण वयांत मुंबईत आलेल्या त्या तरुण मुसाभाईची नातवंडे, आज भरपूर शिकून मोठ्या पदावर काम करत आहेत. आज नव्वदी पार केलेल्या एका यशस्वी स्टार्टअपची ७० वर्षांपूर्वीची ही रंजक कहाणी आहे.

--००--

विलेपारल्यातील बलुत १ / ४

## कलिंगड - आंबेवाला गोविंद तेली.

लग्न समारंभात अथवा एखाद्या नाटकाच्या प्रयोगाचे वेळी एखाद्या कुटुंबाचा नव्याने परिचय झाल्यावर 'तुम्ही कुठे रहाता', अशा प्रश्नावर पार्लेकरांचे उत्तर ठरलेले असते... "आम्ही पारल्याला रहातो"...!!..मग कांदिवली-बोरीवली-दहिसर अशा मुंबईच्या उत्तरेकडे रहाणाऱ्या आणि नोकरी-व्यवसायासाठी दररोज दक्षिण मुंबई गाठणाऱ्या चाकरमान्या गृहिणीचे साप्ताहिक अनुभव सांगता सांगता, आपल्या विलेपारल्याचं कौतुक सुरु होतं. "अहो... नशीबवान आहात तुम्ही, विलेपारल्याला रहाता... ऑफिसातून निघून ट्रेन पकडली की मी, आठवड्यातून दोनदा आधी पारल्याला उतरते...निदान तीन-चार दिवसाच्या भाज्या आणि फळे घेते, पुन्हा ट्रेन पकडून मग कांदिवलीला उतरते. तुमच्या पारल्याचा भाजीबाजार किती छान आहे हो...आमच्या इथे तशा भाज्या नाही मिळत".

अशा कौतुकाचे वेळी, पारलेकर कुटुंबाची कॉलर ताठ होते. त्यांना अभिमानाचे स्फुरण सुद्धा चढते. मात्र ते कुटुंब निव्वळ

विलेपारल्यात रहात असते, पारल्याच्या भाजी आणि फळ बाजाराशी त्यांचाही एक ग्राहक इतकाच संबंध असतो. विलेपारले रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडे १९७० सालापासून टप्प्याटप्प्यान विकसित झालेल्या विलेपारल्यातील त्या समृध्द बाजाराप्रति, अशा कुटुंबाचे कर्तुत्व शून्य असते.

उत्तर प्रदेशातील आझमगडचा, साधारण अठरा-एकोणीस वर्षाचा एक तरुण, गोविंद तेली, नशीब काढण्यासाठी मुंबईची वाट धरतो. गावातला कोणी परिचित आधी मुंबईत आलेला असतो त्याचा आधार घेऊन साधारण १९५३ – ५४ सालांत कॉटनग्रीन या मुंबईच्या गजबजलेल्या मराठी वस्तीत आपला गोविंद तेली दाखल होतो. रात्री पाठ टेकण्यासाठी एक ओसरी शोधतो. पत्र्याच्या ट्रंकेत दोन-चार कपडे – पांघरायला एक चादर - एक चंबू यासह संधी शोधणारी चौकस नजर आणि अगणित उत्साह एवढ्या भांडवलावर, आपण कुरमुरे-चणे-दाणे विकायचे एवढेच छोटे दिवास्वप्न त्याला दिसत असते.

आपल्या एखाद्या कुटुंबात, मुलगा-मुलगी जेंव्हा स्वतःचा व्यवसाय सुरु करायचा विचार मांडत असतात, तेंव्हा बऱ्याचवेळा,

“तुम्हाला ते जमणार नाही...मग काय चणे – दाणे विकणार का...!!” असा त्या संकल्पनेचा उपहास केला जातो. आपल्या गोविंद तेलीने मात्र खरोखरच गळ्यात अडकवलेल्या छोट्या टोपलीत चणे – दाणे भरून कॉटनग्रीनच्या रस्त्यांवर फिरत आपल्या पहिल्या व्यवसायाची सुरुवात केली. साधारण याच काळांत गोविंदने पायी फिरत मुंबईचा परिचय करून घेतला होता. आणि आपल्या सगळ्याच बलुतेदरांप्रमाणे, गोविंदकडे सुद्धा निसर्गदत्त बुद्धीमत्ता आणि उपजत चाणाक्ष नजर होतीच. पहिली दोन वर्षे चणे – दाणे विकणाऱ्या गोविंदने हळूहळू केळी विकण्यास सुरुवात केली होती, त्यातच गोविंदचे लग्न झाले होते आणि तो जागेच्या शोधात असताना त्याला विलेपारल्यातील परिसर आणि वस्ती पसंत पडली होती. १९५८ सालांत त्याने सुभाष रोडवर एक छोटीशी जागा, रहाण्यासाठी भाड्याने घेतली.

विलेपारल्याच्या संदर्भात नेहमी ज्याचा उल्लेख न चुकता होतो तो विस्तीर्ण जागेत पसरलेला रेल्वे स्थानकाच्या समोरचा मोरबंगला, त्याकाळात विलेपारल्याची खास ओळख होता. त्या बंगल्याला पूर्वेकडे छोटेसे प्रवेशद्वार होते. जाण्यायेण्याची वाट मोकळी ठेऊन, दरवाजाच्या अर्ध्या भागात एका बैठकीवर,

मालकाच्या परवानगीने, गोविंदने आपला केळी विक्रीचा व्यवसाय सुरु केला. आज, महात्मा गांधी रोडवर बँक ऑफ बरोडाचि शाखा जिथे आहे, त्याच्या बरोबर समोर त्या काळात, गोविंदचा ठेला होता. पुढच्या चारच वर्षांत गोविंदला ठेल्याची ती जागा अपुरी वाटायला लागली कारण आता केळ्यांबरोबर कलिंगडांची विक्री सुरु झाली होती.

कलिंगडाचा व्यवसाय, रथसप्तमी ते वटपोर्णिमा या छोट्या हंगामातच केला जातो, मात्र यासाठी मोठ्या जागेची आवश्यकता असते. स्वतःची प्रगती होत असतानाच, परिसरातील अनेक अन्य व्यावसायिकाना नेहमीच सहकार्याचा हात पुढे करणारे विजय स्टोअर्सचे मालक, माननिय श्री आण्णासाहेब साठे त्यांच्या उत्तम आर्थिक व्यवहारांसाठी लोकप्रिय होते. विजय स्टोअर्सचि जागा आता भाऊसाहेब आणि अण्णासाहेब साठे यांनी गोखले कुटुंबाकडून विकत घेतली होती. गोविंदने अण्णासाहेबांची भेट घेतली आणि त्यांच्या मालकीच्या जागेतिल प्रवेशद्वारावर कलिंगडाची वखार लावता येईल का त्याची चौकशी केली. छोट्या हंगामासाठीच जागा हवी असल्याने, अण्णासाहेब साठे यांनी त्वरित संमती दिली आणि १९६२ मधे गोविंदने, कलिंगडाची

आपली मोठी वखार श्रद्धानंद रोडवरील सहजीवन इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या अर्ध्या भागांत स्थापन केली. केळयांचा व्यवसाय सुरु होताच, त्यात खंड पडू नये यासाठी गोविंदने नवी हात गाडी घेतली आणि आता मोरबंगल्यातील जागा सोडून त्याने आपला व्यवसाय, श्रद्धानंद रोडवर नव्या जागेत सुरु केला.

१९६२ सालांत सुरु झालेली केळयांची हातगाडी आजही गोहिल केमिस्टच्या समोर उभी आहे. महापालिकेचा नियमित परवाना असलेल्या या हातगाडीवर हंगामानुसार विक्रीच्या वस्तूंमधे बदल होत गेले. कधी होळीचे रंग, कधी राखीपौर्णिमेच्या राख्या, कधी दिवाळीतील पणत्या आणि रांगोळीचे रंग, कधी खजूर, कधी मुख्य मोसमानंतर येणारा केसर आंबा...असा हंगामानुसार बदल गेली चाळीस वर्षे अव्याहत चालू आहे. याच प्रगतीच्या काळांत, १९६४ मधे, एक मुलगी आणि एक मुलगा या गोविंदच्या जुळया मुलांचा जन्म झाला. आता गोविंदचा उल्लेख, गोविंदभैय्या अशा आदरार्थी संबोधनाने होऊ लागला होता. १९७० सालापासून हळूहळू विस्तार होत गेलेल्या विलेपारल्याच्या भाजी आणि फळ बाजारातिल, गोविंदभैय्या हा एक प्रातिनिधिक व्यवसायिक आहे. गोविंदभैय्या नंतर आलेले बहुतांश भाजी आणि

फळ विक्रेते उत्तर प्रदेशातून आलेले नागरिक आहेत. हे सर्व उत्तर भारतीय मेहनती होते, दैनंदिन जीवनाच्या त्यांच्या गरजा फार मापक आणि मर्यादित होत्या. स्थानिक मराठी भाषेचा अजिबात परीचय नसताना, इथे आल्यावर स्थानिक भाषा शिकण्याचीही त्यांची तयारी होती. विलेपारल्याच्या संपन्न भाजी बाजाराचे हेच इंगित आहे.

गोविंदभैय्यांचि दोन्ही मुले यथावकाश महंत रोडवरच्या रुईया शाळेत दाखल झाली. मुंबईत जन्माला आलेली गोविंदभैयाची ही पुढची पिढी. त्यातला प्यारेलाल हा जात्याच हुशार होता. आपली दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, प्यारेलाल त्याकाळात लोकप्रिय असलेल्या रेडीओ आणि टीव्ही दुरुस्तीच्या अभ्यासक्रमात दाखल झाला. नंतरच्या काळांत, **नेटवर्क टेलीव्हिजन** या प्रगत झालेल्या व्यवसायातिल चातुर्यामुळे यशस्वी झालेल्या एका जिज्ञासू तरुणाच्या कारकिर्दीची ही सुरुवात होती.

सहजीवन ईमारतीत १९६२ पासून सुरु केलेला व्यवसाय आता खूप वेगाने वाढत होता. धुळे – जळगावातून मोठ्या ट्रक

भरून, कलिंगडे आणि टरबूजे दर चार दिवसाआड वखारीत यायला लागली होती. आंब्याच्या मुख्य हंगामात सर्वात शेवटी येणाऱ्या बलसाड आंब्यांची विक्री साधारण १९८० पासून सुरु झाली होती. शाळेत असताना कलिंगडाच्या वखारीत वडिलांना मदत करायला येणारा प्यारेलाल, आपला अभ्यासक्रम संपल्यानंतर १९८४ मधे कलिंगडाच्या वखारीत, वडिलांच्या मदतीसाठी दाखल झाला होता. दिवसभर विलेपारले पश्चिमेला असलेल्या एका व्हिडीओ कॅसेट लायब्ररीत मदतनीस म्हणून नोकरी आणि संध्याकाळी वाखारीतील कलिंगड-टरबूज-बलसाड आंब्याची विक्री असा त्याचा दिनक्रम सुरु झाला.

विजय स्टोअर्सचे आण्णासाहेब साठे यांच्या श्री गणेशमूर्ति विक्री केंद्राच्या पुढ्यातच गोविंदभय्यांची हंगामी वाखर लावलेली असे त्यामुळे गणेश चतुर्थीच्या आधी साधारण वटपौर्णिमेचे आसपास, वखारीचा कारभार आवरलेला असे. व्यवहार कौशल्य उपजत असल्याने, जिज्ञासू तरुण प्यारेलालने वडिलांसमोर थोडासा वेगळा प्रस्ताव ठेवला. बलसाड आंब्यांच्या आधी मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच, येणाऱ्या रत्नागिरी आणि देवगड आंब्यांचा व्यापार प्यारेलालने नव्या दमाने सुरु केला आणि

अल्पावधीतच त्याला ग्राहकांची पसंती मिळाली. साधारण १९८४-८५ मधे छोट्या प्रमाणावर सुरु केलेल्या आंब्याच्या व्यवसायाचि वेगाने प्रगती झाली. केळी-कलिंगड आणि टरबुजापेक्षा वखारीचे आर्थिक व्यवहार कित्येक पटींनी वाढले. १९५८ सालात विलेपारल्यात सुरु गोविंदभय्यांच्या व्यवसायाला, मुलगा प्यारेलाल मुळे स्थैर्य प्राप्त झाले. वाशीच्या घाऊक मंडईतिल आंब्याचे नामवंत व्यापारी श्री अशोक हांडे यांच्याकडील देवगड आणि रत्नागिरीचा आंबाच मी विक्रीसाठी आणतो असे प्यारेलाल आग्रहाने सांगतो.

आजच्या लेखातील ही गोष्ट गोविंदभय्यापुरती मर्यादित ठेवता येणार नाही. विलेपारल्यातील आपल्या सर्वच बलुतेदारांच्या दुसऱ्या - तिसऱ्या पिढीतिल तरुणांनी केलेली व्यवसायातील प्रगती लक्षणीय आहेच. मात्र गोविंदभय्याच्या प्यारेलालने, स्वतःच्या हिमतीवर उभे केलेले विविध व्यवसायांचे जाळे फार कौतुकास्पद आहे. एका व्हिडीओ कॅसेट लायब्ररीमधे अनुभव घेतल्यानंतर, या व्यवसायाची भविष्यात, वेगळ्या पद्धतीने वाढ होऊ शकते हे प्यारेलालाच्या चाणाक्ष नजरेने नेमके हेरले असावे.

१९८४ ते १९८९ अशा चार वर्षांत आंब्याच्या व्यापाराची घडी बसल्यानंतर, १९८९ साली त्याने आपल्या सुभाष रोडवरच्या घराशेजारी व्हिडीओ लायब्ररी सुरु केली. रोज संध्याकाळी ६ ते ९ या वेळात एक सिनेमा व्हिडीओ कॅसेटच्या माध्यमातून लोकांना बघण्यासाठी लावणे असा हा व्यवसाय होता. जानेवारी १९९१ मधे संयुक्त राष्ट्रांच्या सेनेने इराकवर हल्ला केला आणि इराकी सेनेचा पराभव होईपर्यंत ती लढाई चव्वेचाळीस दिवस चालली. या लढाईत बॉम्बफेक करणाऱ्या विमानांना CNN या नामवंत अमेरिकन चॅनलने खास कॅमेरे लावले होते आणि प्रत्यक्ष युद्धाचे क्षण टेलीव्हिजन वर पहाता येत होते. सर्वांच्या घरी हे पाहण्याची सोय नव्हती आणि नेमके त्यामुळे प्यारेलालच्या व्हिडीओ लायब्ररीला उत्तम ग्राहक प्रतिसाद मिळाला. याच काळात अनेक खाजगी दूरदर्शन चॅनलचे प्रसारण मोठ्या प्रमाणात सुरु झाले होते. आता टेलीव्हिजन माध्यमातील झपाट्याने होणारे बदल लक्षात घेऊन, १९९३ सालांत प्यारेलालने केबल प्रसारणाचा सरकारी परवाना मिळवला. प्रथम "इन मुंबई" आणि आता "Hathway" या प्रमुख केबल प्रसारकाकडून विलेपारले पूर्व परिसरात प्रसारणाचे हक्क मिळवले. आज प्यारेलाल त्याच्या अठराशे ग्राहकांना नियमित केबल आणि इंटरनेट सेवा पुरवतो आहे.

तरुण वयांत अनेक उपक्रमांमधे यशस्वी झालेला, केबल व्यवसायात होणारी स्थित्यंतरे जवळून पहाणारा प्यारेलाल आता खूप मोठी स्वप्ने पहातो आहे. केबल नेटवर्क संदर्भात बदललेले कायदे, फार मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे या क्षेत्रांत होणारे आक्रमण या सगळ्या मधून तो मार्ग काढतो आहे. ग्राहकांना फायबर ऑप्टिक केबल द्यायची आखणी करावी...असा मनसुबा प्यारेलालने केला आहे...!!...रस्त्याच्या खालून जाणारी अशी फायबर ऑप्टिक केबल, रस्ते खणूनच ग्राहकांच्या घरापर्यंत पोहोचते. हे फार मोठे धाडस आहे याची प्यारेलाललाही कल्पना आहे...!!..मग त्याची स्पर्धा फक्त मोठ्या नेट प्रोव्हायडर कंपन्यांबरोबर असेल...!!..

उतार वयांत गोविंदभय्या, व्यवसायातून निवृत्त झाले होते आणि २००४ सालात सुभाष रोड वरच्या लहान घरातून प्रशस्त घरात राहायला गेले होते. रिकाम्या झालेल्या रहात्या घरांत प्यारेलालने २००६ मधे भेळपुरी, पाणीपुरी आणि चाटचे छोटेसे दुकान सुरु केले. या व्यवसायाचा विस्तार वाढतच गेला आणि २०१० मधे त्याचे शेजारी, डोसा – सॅंडविच सेंटर सुरु झाले. प्यारेलालचे दोन मुलगे आता त्याच्या सर्व व्यवसायात लक्ष घालू

लागले आहेत. १९९३ सालांत प्यारेलालने, कांदिवलीच्या ठाकूर कॉम्प्लेक्स मधे एक सदनिका आणि एक दुकान घेतले होते. त्याचा एक मुलगा आज ठाकूर कॉम्प्लेक्स मधील भेळपुरी, पाणीपुरी आणि चाटच्या दुकानाची जबाबदारी सांभाळतो आहे.

याच दरम्यान १९९२ सालांत, प्यारेलाल युथ कॉंग्रेस मधे दाखल झाला. क्रमाक्रमाने जबाबदाऱ्या घेत आज तो महापालिका विभाग क्रमांक ८४ चा कॉंग्रेस पक्षाचा ब्लॉक अध्यक्ष झाला आहे. महत्वाचे म्हणजे २०१७ सालांत झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत त्याने कॉंग्रेस पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती.

समाजाभिमुख असलेला प्यारेलाल एक अजब रसायन आहे. चाळीस वर्षावरील नागरिकांचा क्रिकेटचा संघ आता त्याने स्वतःच्या ब्रँड नांवाने निर्माण केला आहे. पूर्व आणि पश्चिम विलेपारल्यातील मैदानांवर होणाऱ्या सर्व क्रिकेट स्पर्धांमधे हा संघ भाग घेतो आणि पारितोषिके जिंकतो.

गोविंदभय्या – प्यारेलाल या जोडीच्या या प्रगतीचा मी साक्षीदार आहे. गोविंदभय्या तसे मितभाषी होते आणि जगन्मित्र असलेला प्यारेलाल पक्का गप्पिष्ट आहे. सतत कामात मग्न राहिलेल्या या जोडीने, व्यवसायासाठी केलेले श्रम, मी कित्येक वर्षे अनुभवले आहेत. कलिंगडाची वखार लागली की तिची राखण करण्यासाठी, मध्यरात्री येणाऱ्या ट्रकमधील माल उतरवून घेण्यासाठी दोघांनीही दिवस – रात्र मेहनत घेतली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीला लावलेली वखार, गणपतीच्या आधी आवरण्याचा, १९६२ मधे आण्णासाहेब साठे यांना दिलेला शब्द, २०१९ मधे तितक्याच नेमाने पाळला जात आहे. सत्शील– समाधानी वृत्ती, ग्राहकांशी उत्तम संभाषण कौशल्य, व्यवसायाची उत्तम जाण, विकल्या जाणाऱ्या मालाची उत्तम परीक्षा, अफाट जिद्द आणि निर्व्यसनी जीवनक्रम या गुणवात्तांचा…विलेपारल्याच्या भाजी आणि फळ बाजाराची प्राथमिक उभारणी करणाऱ्या पारल्यातील या बलुतेदराचा परिचय, आपल्याला निश्चितच आवडेल याची खात्री आहे…!!

**--००--**

विलेपारल्यातील बलुत १ / ५

# गोहिल ब्रदर्स, केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट

त्या दिवशी मनोजने दुकान दहा मिनिटे उशिराने उघडले होते. सकाळी ८ वाजता दुकान उघडायची वेळ हा शिरस्ता म्हणजे कडक शिस्तीचा होता. याला विलंब झाला की कांतीभाई, नरेन्द्रभाई हे दोन मामा आणि वडील चंपकभाई, मनोजवर थोडे नाराज होत असत. हे दुकान म्हणजे, विलेपारले रेल्वे स्थानकाच्या पूर्वेला असलेल्या श्रद्धानंद रस्त्यावरील, गजबजलेल्या बाजाराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले **गोहिल ब्रदर्स, केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट**.

मनोज शहाने १९७४ मधे अकरावीची परीक्षा देऊन, पारले पश्चिमेला असलेल्या नरसी मोनजी महाविद्यालयात संध्याकाळच्या वर्गात प्रवेश घेतला. शालेय शिक्षण संपल्यानंतर, **गोहिल ब्रदर्स केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट** या कुटुंबाच्या मालकीच्या दुकानात वडीलधार्यांना मदत करण्यासाठी आता मनोज दाखल झाला होता. त्या दिवशी दुकान दहा मिनिटे उशिरा उघडल्याचे, वडिलांच्या लक्षात आलंय, याची जाणीव मनोजला झाली होती. हा विलंब

नोंद करणारे, दुकानाच्या समोरच्या ईमारतीत रहाणारे चंपकभाई शहा हे मनोजचे वडील.

दुकान उघडायला झालेला विलंब याची चिंता करतांनाच, आपल्यात अजून एक उणीव आहे याची जाणीव त्याच सकाळी घडलेल्या प्रसंगामुळे मनोजला झाली. याला कारणीभूत झाली, एक सुंदर तरुण मराठी मुलगी. स्वतः मनोज याप्रसंगाचे मीठ-मसाला पेरून फार छान वर्णन करतो. उशिराने उघडलेल्या दुकानांत साफसफाई झाली आणि रोजची छोटीशी प्रार्थान म्हणून मनोजने काउंटरचा ताबा घेतला. नरेन्द्रभाई आणि कांतिभाई येतच असावे अशावेळी एक सुंदर तरुण मुलगी लगबगीने दुकानात आली. घाईने पैशासाठी पर्स उघडत म्हणाली... **फक्त एक सुट्टे - किरकोळ ब्लेड द्या, अख्खा पॅक नकोय** ...!!...पारल्यात राहूनही मराठी भाषेचा गंध नसलेल्या मनोजने उत्तर दिले.... **वो ब्रॅन्ड नही है**...मनोजच्या या उत्तरावर ती मुलगी खळखळून हसली आणि म्हणाली... **तुम्हाला मराठी समजत नसावे बहुतेक**... **I want single or you can say one blade, any brand is okey**...!!...मनोज खजील झाला, त्याने आठ आणे किमतीचे एक ब्लेड काढून त्या मुलीला दिले...ती मुलगी लगबगीने ट्रेन

पकडायला निघून गेली...!!..या प्रसंगाचे इतके सविस्तर वर्णन करण्यामागचे कारण असे की पारल्यातले साधारण ऐंशी टक्के नागरिक मराठी होते आणि आजही दुकानात आले की आग्रहाने मराठीच बोलतात. गुजराती भाषिक असूनही मनोजचे वडील, दुकान सांभाळणारे दोन्ही मामा आणि सर्व कर्मचारी उत्तम मराठी बोलत असत. जिद्दी मनोजने काहीच दिवसात आपली मराठी भाषेची उणीव दूर केली...आज **गोहिल ब्रदर्स** अर्थात शहा कुटुंबाचा प्रमुख मनोज, दुकानात येणाऱ्या ग्राहकांशी मराठीत सहज गप्पा मारतो. आग्रहाने मराठी बोलणाऱ्या विलेपारल्यातील याच नागरिकांचा विश्वास गोहिल ब्रदर्स या दुकानाच्या सुरुवातीला, संचालकांनी कसा प्राप्त केला ती प्रयत्नवादाची विलक्षण कहाणी आहे, यथावकाश लेखाअंती ती ही सांगणारच आहे. .

**गोहिल ब्रदर्स, केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट**. गेली सत्तर वर्षे, पारल्यातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचे दुकान आणि विश्वासाचे – आदराचे स्थान बनले आहे. दुकानाचे नांव गोहिल आणि मालक शहा कुटुंबीय हा वरकरणी दिसणारा विरोधाभास आहे. या व्यवसायाच्या निर्मितीचा इतिहास अर्थातच खूप रंजक आहे. त्या बरोबरच या दुकानाने आणि शहा कुटुंबियांनी, उत्तम व्यवहार

शुचिता - व्यवसायमूल्य – चातुर्य – जिद्द – सातत्य – नियमितपणा – चिकाटी - माणुसकी आणि प्रगती अशा अनेक गुणवत्तांचा आदर्श आपल्यासाठी निश्चितपणे निर्माण केला आहे. मात्र या दुकानाच्या निर्मितीची सुरुवात १९५० सालात, विलेपारले पश्चिमेला असलेल्या नानावटी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून झाली. डॉ बालाभाई नानावटी आणि डॉ सेठ यांच्या, चार रुग्णांची व्यवस्था असलेल्या प्रसुतीगृहाचे उद्घाटन, याच वर्षी पंडित नेहरू यांच्या हस्ते झाले होते. घडीचे एक टेबल, त्यावर पंढरी स्वच्छ चादर आणि सहा प्रकारची औषधे यासह दिलीप ड्रग हाऊसची सुरुवात, १९५० मधे डॉ नानावटी यांच्या प्रसूतीगृहामधे झाली होती. आज मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून नावाजलेले, विलेपारले पश्चिमेला असलेले हेच ते नानावटी हॉस्पिटल. मात्र या दिलीप ड्रग हाउसच्या स्थापनेमागे सुद्धा एक निश्चित घटनाक्रम होता.

भोगीलाल, रसिकलाल, नवनीतलाल आणि चंपकलाल. गुजरातेतील सिद्धपुर या छोट्याशा गावातील शहा कुटुंबातले हे चार भाऊ. १९४७ / ४८ मधे, दोन मोठ्या भावांचे गावात छोटेसे दुकान होते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वच नागरिकांमधे

उत्साहा होता आणि परदेशी कंपन्यांच्या नव्याने मागणी वाढलेल्या अगदी निवडक औषधाच्या विक्रीची सुरुवात या दुकानात झाली होती. अशा औषधांचा अगदी जुजबी परिचय असलेले नवनीतभाई आणि चंपकभाई याच वर्षी पुढील शिक्षणासाठी मुंबईत दाखल झाले होते. विल्सन कॉलेज आणि खालसा कॉलेजात शिक्षण घेतानाच या दोन्ही भावांना रेशनिंग ऑफिसात नोकरीही लागली होती.

गावाकडे रहात असलेल्या दोन वडील बंधूंची, स्वतःचा औषधांचा व्यवसाय सुरु करण्याचा आग्रह करणारी पत्र नेमाने येत होती. त्याच उत्साहात नवनीतभाई आणि चंपकभाई दोघांनी धाडस करून पार्ला पश्चिमेला असलेल्या सरला सर्जन शाळेच्या बाजूला, एक जागा भाड्याने घेऊन, औषधे आणि फोटोग्राफी सामानाची विक्री अशी आपल्या स्वतंत्र व्यवसायाची सुरुवात केली. या घटनेचे साल होते १९४८ / ४९...!!..आपल्या बंगल्याचा अगदी जवळ असल्याने, याच दुकानात डॉ बालाभाई नानावटी आणि डॉ सेठ काही औषधांच्या खरेदीसाठी येऊ लागले होते. याच संपर्कातून डॉ नानावटी याच्या प्रोत्साहनामुळे १९५० सालात, तत्कालीन डॉ नानावटी यांच्या प्रसूतीगृहात, **दिलीप ड्रग हाऊस**

या औषधाच्या दुकानाची स्थापना, हिम्मतभाई गोहिल आणि त्यांच्या बंधूंच्या सहकार्याने झाली. नानावटी हॉस्पिटलच्या प्रगतीबरोबरच १९५० ते २०१४ अशी चौसष्ट वर्षे, औषध विक्रीचे हे एकच दुकान नानावटी हॉस्पिटल मधे व्यवसाय करीत होते.

याच दरम्यान, १९४८ / ४९ सालांत, श्रद्धानंद रस्त्यावरील सेठ निवासमधे दहा बाय सात आकाराच्या दुकानाच्या गाळयात, हिम्मतभाई गोहिल आणि त्यांच्या बंधूनी औषधाचे छोटेखानी दुकान सुरु केले होते. भारतातील अलोपथी औषधांच्या निर्मितीचा तो सुरुवातिचा काळ होती. औषधी गोळया, पावडरी आणि सिरप अशी फक्त बारा ते पंधरा उत्पादने दुकानात विक्रीसाठी ठेवली गेली होती. **आज ज्याला क्लिनिक किंवा कन्सलटिंग रूम असे संबोधित केले जाते त्या डॉक्टरांच्या दवाखान्यांना त्या काळात डीस्पेन्सरी असे संबोधित केले जात असे.** या डीस्पेन्सरीमधे आपण आपल्या घरून नेलेल्या वेगळया चौकोनी आकाराच्या काचेच्या बाटलीत डॉक्टरांचा कंपाऊंडर औषध भरून देत असे आणि छानशी हस्तकला वापरून पांढऱ्या कागदाची एक पट्टी या बाटलीवर चिकटवत असे. एका वेळी किती औषध घ्यायचे त्याचे नेमके माप ही कागदी पट्टी दाखवत असे.

डीस्पेन्सरी पद्धत आज पूर्ण बंद झाली आहे. या पद्धतीमुळेच त्या काळात औषधी सिरप, मोठ्या बाटल्यात भरून दुकानात ठेवले जात असे. सुट्या गोळया आणि पावडरी, कागदाच्या पुड्यात बांधून विकल्या जात असत. औषधांच्या विक्री व्यवसायातील या सर्व स्थित्यंतराचे, गोहिल ब्रदर्स हे दुकान साक्षीदार आहे.

या लेखाच्या निमित्ताने मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मनोजची भेट होणे अपेक्षित होते मात्र तो व्यस्त असल्याने ती भेट होऊ शकली नव्हत. स्थापनेपासून दुकान सांभाळणारे मनोजचे दोन मामा, कांतिभाई आणि नरेंद्रभाई यांनी वयाची ऐंशी पार केली आहे हे त्यावेळी लक्षात आले. वयाने मोठे असले तरी यातल्या नरेंद्रभाईंशी, तरुण वयातच माझा छान स्नेह झाला होता. या दोघांना नक्की भेटायचे ठरवलेच होते. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात दोघांची भेट ठरली आणि त्याआधी मनाला चटका लावणारी एक घटना घडली. माझी भेट होण्याआधीच, मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात, वयाच्या ८४ व्या वर्षी नरेंद्रभाईनी या जगाचा निरोप घेतला. १९५१ ते अखेरपर्यंत नरेंद्रभाई गोहिल ब्रदर्ससाठी सतत व्यस्त राहिले. या घटनेनंतर, लेखाची तयारी करताना मनोजच्या सल्ल्यानुसार, कांतीभाईंना

भेटायचे ठरले. ठरलेल्या दिवशी ८८ वर्षांचे कांतिभाई हळूहळू चालत "हेल्थ केअर" च्या दुकानात आले. "हेल्थ केअर" हे गोहिल ब्रदरचे दुसरे दुकान, श्रद्धानंद रस्त्यावरील पॅटन या दुकानाच्या अगदी बाजूला आहे. दिलीप ड्रग हाऊस आणि गोहिल ब्रदर्स या दोन्ही दुकानांच्या अगदी पहिल्या दिवसापासूनचा बिनचूक घटनाक्रम, कांतीभाईं आणि मनोज शहा यांनी सविस्तर वर्णन केला.

श्रद्धानंद रस्त्यावरील सेठ निवास मधील छोट्या गाळ्यात सुरु झालेले हिम्मतभाई गोहिल यांचे दुकान आता आर्थिक अडचणींतून मार्ग काढत होते. अडचणी काही संपत नव्हत्या. १९४९ / ५० सालात औषधांच्या व्यवसायात अगदी प्राथमिक अनुभव घेतलेले नवनीतभाई आणि चंपकभाई शहा या दोन बंधूनी, अशा अडचणींच्या वेळी गोहिल बंधूना मदतीचा हात पुढे केला. मात्र या आर्थिक अडचणींना कंटाळून औषधाच्या दुकानाचा व्यवसाय बंद करण्याचा निर्णय गोहिल बंधूनी घेतला होता. नवनीतभाई आणि चंपकभाई या दोन शहा बंधूंनी दुकानाची जागा आणि "गोहिल ब्रदर्स" हे नांव याची योग्य ती किंमत देऊन हा व्यवसाय विकत घेतला.

जवळच्या नात्यातला कांतीभाई शहा हा तरुण, नेमक्या याचवेळी मॅट्रीकची परीक्षा देऊन पुढील शिक्षणासाठी १९४९ साली मुंबईत आला होता. कांतीभाईचे मोठे बंधू त्यावेळी मुंबईत नोकरी करत असत. तुटपुंज्या पगारात तुझे शिक्षण आणि आपल्या तिघांचा निर्वाह होऊ शकणार नाही, तू नोकरीच बघ अशी इच्छा वडील बंधूनी व्यक्त केली आणि ती प्रमाण मानून कांतीभाईने, शहा कुटुंबाच्या मालकीच्या झालेल्या “गोहिल ब्रदर्स” मधे नोकरीची सुरुवात केली. १९५० ते १९८३ या काळातील दुकानाचे सर्व खरेदी – विक्री व्यवहार कांतीभाई स्वतःच करत असत. १९५० मधे दुकान सुरु झाले त्यावेळी विलेपार्ल्यातील नागरिक आर्थिक दृष्ट्या स्थिरावले होते. मात्र हात राखून खर्च करणे आणि पैशाची बचत हे दोन गुणधर्म सगळयांमधे सारखेच होते. दैनंदिन लागणारा भाजीपाला असो, गणपती – दिवाळीतली कपड्यांची खरेदी असो, औषधे असोत पारल्याचा चाकरमान्या, ट्रेनने येताना दादरला उतरून सगळी खरेदी करीत असे. असा त्याकाळातील सगळयांचा शिरस्ताच होता.

गोहिल ब्रदर्स चे दुकान सुरु झाले असले तरी दुकानात ग्राहकांची वर्दळ फार नसे. १९५२ सालांत विलेपार्ल्यात कॉलरा सदृश संसर्गजन्य तापाची एक साथ आली, अनेक नागरिक या तापाने आजारी पडले. यावेळी विलेपारल्यातील तत्कालीन समाज सेवक माननीय श्री गुलाब जोशी यांनी गोहिल ब्रदर्स दुकानाला एक विनंती केली. शक्य झाल्यास या साथीवर उपचाराची औषधे सर्वांना विनामूल्य द्यावी. कांतीभाईंनी पुढचा एक महिना अविश्रांत मेहनत करून APC Tablet आणि प्रोकेन पेनिसिलीन २० lakh इंजेक्शन अशी मोठ्या आकाराच्या वेष्टनातील औषधे, प्रिन्सेस स्ट्रीट या औषधांच्या घाऊक बाजारातून स्वतः रोज दुकानात आणली. एका रुग्णाला आवश्यक इतक्या गोळया मोठ्या वेष्टनातून छोट्या कागदी वेष्टनात भरल्या आणि इंजेक्शन छोट्या बल्ब मधे भरून नागरिकांना उपलब्ध करून दिली. गोहिल ब्रदर्स आणि कांतीभाईंच्या निरपेक्ष सेवेमुळे या साथीवर वेळेवर योग्य उपचार झाले. विलेपारल्यातील नागरिकांचा विश्वास प्राप्त झाला. या नंतर मात्र गोहिल ब्रदर्सच्या दुकानात ग्राहकांची वर्दळ वाढतच गेली.

कांतीभाई आणि नरेंद्रभाई या दोघांच्या निरपेक्ष आणि विश्वस्तवृत्ती मुळेच ‘‘गोहिल ब्रदर्स’’ हा व्यवसाय आजची उंची गाठू

शकला आहे. या दोघांचे वर्णन करण्यासाठी "भोगशून्य स्वामी" हेच संबोधन मला योग्य वाटते. या लेखाच्या निमित्ताने कांतीभाईशी संवाद झाल्यानंतर, ते दोघे गोहिल ब्रदर्स मधे नोकरी करत होते याचा उलगडा मला प्रथमच झाला. दुकान सुरु झाल्यानंतर, या दोघांनी होमिओपॅथी आणि आयुर्वेदाची औषधे आणि त्याची उपचार पद्धतीचा अभ्यास केला. याला अलोपथीची पर्यायी औषधे काय आहेत त्याचे अनुभवसिद्ध मार्गदर्शन हे दोघे करीत असत. आता व्यवसाय वाढला आणि दुकानाला जागा कमी पडू लागली. १९६२ साली दुकानाच्या उजव्या आणि डाव्या बाजूला असलेले दोन गाळे विकत घेऊन दुकानाची जागा आता प्रशस्त झाली.

१९५० पासून १९६४ या चवदा वर्षात गोहिल ब्रदर्सची प्रगती झपाट्याने झाली. १९५० ते १९८३ या काळात, प्रिन्सेस स्ट्रीट वरील दवा बाजारात, सर्वात जास्त अनुभवी औषध विक्रेते अशी कांतीभाई आणि नरेंद्रभाई या दोघांची ख्याती होती.१९६४ सालात, मुंबईतील सर्वात जास्त उलाढाल असलेले औषधाचे दुकान असा बहुमान या दुकानाला प्राप्त झाला. व्यवसायातील या यशामुळे हेक्स्ट फार्मासुटीकल लिमिटेड या औषधे बनविणाऱ्या

परदेशी कंपनीचा लोगो असलेली मोठ्ठी निओन साईन १९६४ सालात दुकानाच्या शीर्षस्थानी झळकली. याचे दर्शन, मी रहात असे त्या घराच्या खिडकीतून मला नित्यनेमाने होत असे.

१९७४ सालात चंपकभाईंचा थोरला मुलगा मनोज याने दुकानाचे व्यवहार जाणून घेण्यासाठी उमेदवारी सुरु केली होती. उमेदवारीच्या प्रारंभीच्या दिवसात घडलेले प्रसंग, मनोजला खूप काही शिकवून गेले. आता नानावटी हॉस्पिटल मधल्या दिलीप ड्रग हाऊसचा व्याप वाढला होता. राजाभाऊ आणि पुरोहित या दोन विश्वासू कर्मचाऱ्यांचा दुकानाच्या यशात फार मोठा सहभाग आहे.

मनोज – अक्षय – अजीत – हर्षद – दिलीप आता गोहिल ब्रदर्स आणि अन्य व्यवसायाचे व्यवस्थापन बघतात. मनोजचा भाऊ हर्षद याने बी एस्ससी फार्मसीची पदवी प्राप्त करून प्रथम काही आंतरराष्ट्रीय औषध निर्मात्या उद्योगांमधे अनुभव घेतला आणि आता “सायंटिफिक फार्मसी” या शहा कुटुंबाच्या उद्योगाचे व्यवस्थापन तो पहातो. स्वतःचे काही प्रोप्रायटरी फॉर्म्युले आणि अन्य उत्पादकांसाठी गोळ्या – सिरप – पावडर – क्रीम अशा सर्व प्रकारच्या औषध निर्मितीचे काम, सायंटिफिक फार्मसी मार्फत केले

जाते. औषधी कॅप्सूल बनवण्यासाठी लागणाऱ्या रिकाम्या जिलेटीन काप्सूलची निर्मिती, अन्य औषध उत्पादकांसाठी केली जाते. औषध निर्मितीमधील या प्रकारचा मुंबईतील सर्वात मोठा उद्योग, असा बहुमान सायंटिफिक फार्मसीला प्राप्त झाला.

श्रद्धानंद रस्त्यावर असलेल्या शहा कुटुंबाच्या मालकीचे "हेल्थ केअर" हे दुकान, अनेक प्रकारची आरोग्य साधने आणि रुग्णाला आवश्यक विविध प्रकारचे साहित्य अशा उत्पादनांची शोरूम आहे आणि या सर्व उत्पादनांच्या विक्रीची मोठी उलाढाल या व्यवसायात होत असते. या बरोबरच औषध निर्मितीसाठी लागणारी साधने आणि उपकरणे काही देशात निर्यात केली जातात.

नरेंद्रभाईंच्या पश्चात आता कांतिभाई निवृत्त झाले आहेत आणि नवनीतभाई आणि चंपकभाई यांच्या पुढच्या पिढीने गोहिल ब्रदर्स च्या विस्तारित उद्योगांची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. पार्ल्यातल्या आजारी रुग्णांना विनामुल्य औषधे देताना कांतीभाई आणि नरेंद्रभाईनी स्वीकारलेली माणुसकीची वृत्ती आजही अबाधित आहे. दर आठवड्याला कोणीतरी मित्र नानावटी हॉस्पिटल मधे उपचारासाठी दाखल होतो आणि पहिला फोन

मनोज किंवा अजितला येतो. अशावेळी रात्रीच्या कुठल्याही प्रहरी, विनाविलंब नानावटी हॉस्पिटलमधे पोहोचून रुग्णाला धीर देण्याचे आणि आवश्यक ते मार्गदर्शन करण्याचे काम कर्तव्यबुद्धीने आजही केले जाते.

गेल्या सत्तर वर्षापासून, विलेपारल्याचा DNA घडवणाऱ्या बलुतेदारांपैकी हा एक अत्यंत यशस्वी बलुतेदार... **गोहिल ब्रदर्स, केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट** हे दुकान आणि त्यांचे विस्तारित व्यवसाय...!!..

--oo--

विलेपार्ल्यातील बलुतं ६

# वर्मा क्लॉथ स्टोर्स – टेलर्स.

विलेपारल्यातील भरपूर वर्दळीचा रस्ता...सुभाष रोड. सकाळी सहा – साडेसहा पासून जी एम ई एस आणि टिळक विद्यालयातील विद्यार्थी आणि पालकांची वर्दळ सुरु होते. साधारण तीस वर्षांच्या काळात एक पिढी बदलते असे गणित आपण नेहेमी मांडत असतो. या सुभाष रोड नावावरून लक्षात येते, हे गणित किती बरोबर आहे. टिळक विद्यालयापासून सुरु होऊन थेट गरवारे सेंटर पर्यंत जाणारा हा सुभाष रोड, साधारण १९८०/८५ सालापर्यंत सोनारी रोड या नावाने पारलेकरांना परिचित होता.

१९३८ साली राजस्थानातील झुनझुन जिल्ह्यात जन्माला आलेल्या या राधेशाम बलदेव वर्मा याचा संपूर्ण जीवनकाल, आपल्या पारल्यातील सोनारी रोड अर्थात आजच्या सुभाष रोडशी जोडलेला आहे असे भाकीत त्याच्या जन्माच्यावेळी कोणी केले असेल असे मला वाटत नाही. राजस्थान राज्य, संगमरवराच्या आणि ग्रेनाईट दगडांच्या खाणींसाठी प्राचीनकाळा पासून सुपरिचित आहे. साधारण विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत,

राजस्थानातील कारागीर इमारत बांधकामातील कडीया कामाच्या कौशल्यसाठी  ओळखले जात होते. मार्बल मेसनरी, स्टोन मेसनरी, ब्रिक मेसनरी, प्लास्टर मेसनरी अशा पारंपरिक कौशल्यांमध्ये हे कारागीर पारंगत होते. राधेशामचे वडील बलदेवजी वर्मा असेच एक कडीया काम करणारे कुशल कारागीर होते. आपल्या मुलाने, राधेशामने वेगळा व्यवसाय करावा असे बालादेवजीना वाटत असे. तू दर्जी काम शीक असा त्यांचा राधेशामला नेहमी आग्रह असे.

राधेशाम आणि त्याच्या भावंडांच्या दुर्दैवाने, बलदेवजीना फार तरुण वयात देवाज्ञा झाली आणि कुटुंबाला मोठा धक्का बसला. त्यावेळी सर्वात मोठा मुलगा राधेशाम फक्त दहा वर्षांचा होता. कुटुंबाचे पालन-पोषण ही जबाबदारी आता साहजिकपणे त्याच्यावरच आली होती. सुभाष रोडवरच्या ब्रिज भुवन मधे त्याकाळात, वर्मा कुटुंबियांचे कोणी परिचित रहात असत. उपजीविकेचे काम शोधत, राधेशाम मुंबईच्या, पारल्यातील सुभाष रोड वरच्या ब्रिज भुवन मधे दाखल झाला. मित्रांबरोबर खेळत - गप्पा मारत शाळेला जाण्याच्या वयांत, त्याच्यावर कुटुंबाची जबाबदारी आली होती. फक्त तिसरी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या या किशोराकडे कुठलेही कसब – कौशल्य नव्हते,ज्या योगे त्याला

काही काम मिळेल. लहानपणी वडिलांनी सांगितलेली एक गोष्ट मात्र आठवणीत ताजी होती. **तू दर्जी काम शीक. माझ्यासारखे फार अंग मेहेनतिचे काम, तुला करावे लागता कामा नये.**

दर्जी काम- शिलाई काम शिकावे म्हणून राधेशाम जवळपासच्या परिसरातल्या दर्जी-शिंपी काम करणाऱ्या लहान-मोठ्या कारागिरांना भेटला. यातल्या कोणाचीही शिलाई काम शिकवण्याची तयारी नव्हती. न जाणो हा शिलाई काम शिकला तर उद्या आपल्याला त्याच्याशीच स्पर्धा करावी लागेल असा साधा आत्मकेंद्री विचार प्रत्येकजण करत असावा. आता राधेशामचा धीर सुटू लागला होता. त्या काळात सोनारी रोडवर, आत्ताच्या तेजपाल स्कीम एक नंबरच्या गल्लीच्या कोपऱ्यावर, बटण फॅक्टरी नावाचा एका कारखाना होता. या कारखान्याच्या समोर, आत्ताच्या कांचन डेअरी असलेल्या दुकानाच्या जागी, वाण्याचे छोटेसे दुकान होते. राधेशामच्या सततच्या पाठपुराव्यामुळे, तू दुकानाबाहेर बसून बटणे लावायचे काम करायला हरकत नाही अशी संमती वाण्याने एक दिवस दिली. साधारण १९५०/५१ सालातली ही गोष्ट आहे, यावेळी राधेशाम निव्वळ बारा वर्षांचा कुमार होता.

मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग करून राधेशामने शर्ट-कुडता-ब्लाउज यांना बटणे लावायचे काम वाण्याच्या दुकानं बाहेर बसून सुरु केले. शिलाई काम शीक हे वडिलांचे शब्द स्वस्थ बसू देत नव्हते. त्याने एक शिलाई मशीन भाड्याने घेतले. बटणे लावता लावता हळूहळू शिलाई मशीनवर काम करण्याची संधी त्याला मिळाली. पुढच्या दहा वर्षात, वयाच्या वीस- बाविसाव्या वर्षी, शिलाई मशीनवर काम करण्यात तो पारंगत झाला होता. मात्र कपडे शिलाई व्यवसायातील मुख्य कसब शिकायचे ही जिद्द बाळगून त्याने स्वतःच प्रयत्न करायचे ठरवले. एखादा कुडता – ब्लाउज शिलाईसाठी आल्यावर ग्राहकाच्या मापांची नोंद करून त्याबर हुकुम अपेक्षित डिझाईन नुसार एका फर्म्यामध्ये कापड कापून त्याची शिलाई हे खरे कौशल्याचे काम. अजूनही हे काम शिकण्याची संधी राधेशामला मिळाली नव्हती

१९६०/६१ च्या सुमारास परांजपे बालमंदिरासमोच्या जोशांच्या इमारतीत तळमजल्यावर पत्र्याची एक छोटीशी रिकामी शेड होती. एक शिलाई मशीन आणि बसायला एक खुर्ची इतकी जागा त्या शेडमधे निश्चितपणे होती. जोशीकाकांच्या संमतीने

राधेशामने ही शेड भाड्याने घेतली, आपला स्वतंत्र व्यवसाय सुरु केला. जुजबी शिलाई मारून देणे, आल्टरेशन साठी आलेले कपडे दुरुस्त करणे आणि बटणे लाऊन देणे अशी कामे सुरु झाली. एव्हाना राधेशामचे लग्न झाले होते आणि कुटुंब पोषणाची जबाबदारी दुपटीने वाढली होती.

कल्पक राधेशामजींनी एक धाडस करायाचे ठरवले. आल्टरेशन साठी आलेले ब्लाउज किंवा कुडते – शर्ट यांची शिवण उसवल्याशिवाय त्याची दुरुस्ती शक्य नसते. राधेशामजींनी दोन पावले पुढे जाऊन असा प्रत्येक कपडा पूर्ण उसवला, त्याची मापे कागदावर आखून स्वतःचे फर्मे बनवले. असा उसवलेला कपडा दुरुस्तीसह पुन्हा पूर्ववत शिऊन तयार केला. हे सगळे काम एका रात्रीत करणे आवश्यक असे कारण दुरुस्त केलेला कपडा दुसऱ्या दिवशी देण्याची खात्री ग्राहकाला दिलेली असायची. राधेशामजींनी केलेले एक धाडस असे म्हणावेसे वाटते कारण या अभ्यासात काही जोखीम होती. आलेल्या कपड्याचे आल्टरेशन नक्की कसे करायचे आहे हे स्मरणासाठी नोंद करणे. उसवलेला कपडा पुन्हा शिवताना काही गफलत होऊ न देणे. दिलेली वेळ सांभाळणे. हे सगळे जोखमिचे काम होते म्हणून हे धाडस होते.

काही चूक झालीच तर ग्राहकाचा रोष होणे शक्य होते, नुकसानही होण्याची शक्यता होती. कपडा मापात कापून शिलाई करण्याचे काम कोणी शिकवले नव्हते. कल्पक आणि धाडसी राधेशामजींनी ते ज्ञान आत्मसात केले होते. आता नवीन कपडे शिवण्याचे काम यायला सुरुवात झाली होती. वर्मा टेलर्स या आजच्या विस्तारित व्यवसायाची छोटीशी सुरुवात १९६१ सालांत अशी झाली होती.

पत्र्याच्या छोट्या शेड मधून सुरु झालेला व्यवसाय हळूहळू वाढत गेला. जोशीकाकांच्या इमारतीतील एक दुकान आता राधेशाम वर्मा यांनी विकत घेतले होते. आता प्रश्न होता हाताखाली काम करणाऱ्या कसबी कारागिरांचा. माणुसकी हा पहिला धर्म मानणाऱ्या वर्मा यांनी यावर योग्य तो मार्ग काढला. घरकामाला येणाऱ्या मुलांना त्यांनी शिंपीकाम शिकण्यासाठी उत्तेजन दिले. आपल्या सोबत बसवून या कामातली बारकाई समजावून सांगितली. अशी शिकून तयार झालेली चार मुले वर्माजींच्या दुकानात कामाला लागली. मास्टर टेलर बनली. वर्माजीनी शिकवून तयार केलेल्या अशा चार कसबी मास्टर टेलर्सनी स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय स्थापन केला आहे.

सतत काम करण्याची ऊर्जा, ग्राहकांचा विश्वास, नवीन संकल्पनांचा स्वीकार आणि पुढच्या पिढीला शिकवून तयार करण्याची बांधिलकी या भांडवलावर, १९६१ मधील व्यवसायाच्या सुरुवातीपासून पुढच्या तीस वर्षात टेलरिंग व्यवसाय स्थिरावला होता. विविध पोताची आणि डिझाईनची कापडे, विक्रीसाठी आता दुकानात उपलब्ध झाली होती. परिसरातील शाळांतील विद्यार्थ्यांचे गणवेश शिवण्याचे काम नव्याने सुरु झाले होते.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून वर्माजींचा मुलगा महेश, आता वडिलांच्या बरोबर दुकानाचे व्यवहार बघू लागला होता. व्यवसायाच्या तिसाव्या वर्षाच्या अखेरीला, १९८८ आणि १९८९ या दोन वर्षात घडलेल्या दोन घटना महत्वाच्या ठरल्या. यामुळे व्यवसायाच्या प्रगतीचे पुढचे टप्पे वेगाने गाठता आले होते. १९८८ सालात श्री राजीव गांधी पंतप्रधान असताना, कमी उत्पन्न गटातील पन्नास हजार शालेय विद्यार्थ्यांना विनामुल्य गणवेष देण्याची योजना केंद्र सरकारने आखली होती. शालेय गणवेष शिवण्याच्या अनुभवामुळे हे काम वर्माजीना मिळाले होते. शंभर दोनशे मुलांचे गणवेष शिवण्याचा अनुभव होता मात्र ठराविक कालमर्यादेत

पन्नास हजार गणवेश हे फार मोठे आव्हान होते. मुलगा महेश, दुकानातील कारागीर आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने वर्माजीचे हे आव्हान नियोजित कालावधीत सफल पूर्ण झाले. दुकानात उमेदवारी करत असलेल्या महेश वर्मा याला या एकाच कामाने अनुभव संपन्न बनवले.

दर वर्षी दशहरा – दिवाळी या दरम्यान होणारी, लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेची ग्राहकपेठ, हा उपक्रम यशस्वी झाला होता. १९८९ या वर्षी या उपक्रमात सहभागी होण्याचे ठरले. या साठी जयपूरहून खास राजस्थानी पद्धतीच्या तऱ्हेतऱ्हेच्या कापडाची आणि तयार कापडी वस्तूंची खरेदी केली गेली. ग्राहक पेठेच्या पहिल्या चारच दिवसात हा सर्व माल विकला गेला. गेली तीस वर्षे, या ग्राहक पेठेतील जयपूर हंड्लूम हा वर्मा टेलर्सचा यशस्वी उपक्रम खूप लोकप्रिय झाला आहे. राधेशाम वर्मांच्या पश्चात आज या व्यवसायाचा सूत्रधार वर्माजींचा मुलगा महेश याच्या अनुभवाप्रमाणे, या दोन घटना, व्यवसायाच्या प्रगतीचा टर्निंग पॉईंट होत्या. १९८९-९० पासून वर्मा क्लॉथ स्टोर्स – टेलर्स चा व्यवसाय वेगाने वृधिंगत झाला.

गप्पांच्या ओघात वर्मा कुटुंबाचे प्रमुख महेश वर्मा, त्याच्या व्यवसायाच्या काही वैशिष्ट्यांबद्दल अभिमानाने वर्णन करतात. शालेय विद्यार्थ्यांच्या सर्व वयोगटातील गणवेषाचे पुरवठादार ही वर्मा टेलर्सची प्राथमिक ओळख आहेच. आज बारा नामवंत शाळांसाठी विविध रंगसंगतीचे गणवेष शिवले जातात. गणवेष शिलाई व्यवसायाची प्रगती फार वेगाने झाली. अनेक आंतरराष्ट्रीय आस्थापनातील कर्मचाऱ्यांचे गणवेष पुरवठादार असलेला हा व्यवसाय, मुंबईसह महाराष्ट्रात दुसऱ्या नंबरावर आहे. यांच्या ग्राहक आस्थापनांची सूची खूप मोठी आणि अभिमानास्पद आहे. मुंबईतील अनेक शॉपिंग माल, अनेक हॉस्पिटल, लार्सन ऍन्ड टुब्रो, जी व्ही के एअरपोर्ट, महिंद्रा ऍन्ड महिंद्रा, गोदरेज, सीप्झ, मर्सिडिस आणि होंडाच्या मोटारींचे सर्व शो रूम, सर्व एच पी पेट्रोल पंप, जळगावातील मोठे कारखाने आणि दुबईतील काही हॉटेल अशी या यादीतील नेमाने वाढत जाणारी ग्राहकांची नावे. राधेशाम वर्मांच्या तिसऱ्या पिढीतील युवा वारसदार, महेश वर्मांचा उच्च शिक्षित मुलगा यथार्थ वर्मा, याच्याशी झालेली भेट फारच प्रभावी होती. इंजिनीअरींग आणि एमबीए परीक्षा देऊन यथार्थ वर्मा आता गणवेष शिलाई हा व्यवसाय सांभाळतो आहे आणि त्यात वृद्धी करतो आहे. गणवेष शिलाई पुरवठादार म्हणून, भारतातील प्रथम क्रमांकाचा व्यवसाय बनवण्याचे स्वप्न पहातो आहे.

वर्मा क्लॉथ स्टोर्स – टेलर्स यांनी गणवेष शिलाई व्यवसायात स्वतःची वेगळी ओळख एका वेगळ्या क्षेत्रात करून दिली आहे. मुंबईतील अनेक नृत्यशाळांतील विद्यार्थिनींचे पारंपरिक नृत्यशैलीतील विशेष परिधान शिवणाऱ्या मुंबईतील फक्त दोन व्यावसायिक टेलर्सपैकी एक, असा हा वर्मा टेलर्सचा वेगळा परिचय. पारंपरिक भारतीय नृत्य शिकवणाऱ्या काही परदेशातील नृत्यशाळांसाठी अशी परिधाने निर्यात केली जातात.

एकट्या राधेशाम वर्मांनी सुरु केलेल्या व्यवसायात आता दोन कारखान्यात आणि दुकानात मिळून एकूण चाळीस शिलाई कारागीर-कर्मचारी काम करतात. या सर्व विस्तार आणि वृद्धीमध्ये, वर्मा टेलर्सची दुसरी शाखा, २०१५ मधे गिरगावात सुरु झाली. विलेपारल्यातिल दुसरे दुकान आणि बोरिवलीची शाखा नजीकच्या भविष्यात सुरु होतील.

वडिलांच्या सल्ल्याचा सतत ध्यास आणि पाठपुराव, नैसर्गिक ऊर्जा, चिकाटी, सातत्य, प्रतिकूल परिस्थितीत दीर्घकाळ टिकून रहाण्याची क्षमता, कुठल्याही मार्गदर्शनाशिवाय स्वतःच अभ्यास

करून हुन्नर शिकण्याची जिद्द या सर्व गुणवात्तांचा धनी असलेल्या राधेशाम वर्मा, या तिसऱ्या इयत्तेत शाळासोडून, रोजीरोटीच्या शोधांत वयाच्या बाराव्या वर्षी विलेपारल्यात आलेल्या कुमाराच्या स्वप्नांची पूर्तता, त्यांच्या हयातीत झालेली त्यांना पहाता आली. हे त्यांचे आणि कुटुंबियांचे सौभाग्य. महेश वर्मांचा अनुभव आणि तरुण, उच्चशिक्षित यथार्थ वर्मांचे व्यवस्थापन कौशल्य यामुळे वर्मा टेलर्स या व्यवसायाची व्याप्ती देश आणि विदेशातसुद्धा होणार आहे हे निश्चित. या दोघांसह वर्मा कुटुंबाला अनेकानेक शुभेच्छा...!!..

--००--

विलेपारल्यातील बलुत १ / ७

# गोपाळ स्वीट आणि शर्मा भेळपुरी हाऊस.

**सकाळची शाळा** या आठवणी जेंव्हा जेंव्हा डोके वर काढतात त्या त्या वेळी उगवत्या सकाळचा माझ्या घराच्या आसपासचा शांत परिसर झरझर डोळ्यापुढून सरकू लागतो आणि ताज्या तळलेल्या गाठ्या-पापड्या-कचोऱ्या-जिलेबीच्या हव्याहव्याशा सुगंधाची अनुभूती आजही मिळते. पहाटे लवकर उठून शाळेची तयारी झालेली असे आणि त्याचवेळी दर शनिवारी सकळी माझे वडील माझ्या आधी तयार झालेले असत. तसे पहायला गेले तर घरापासून माझी शाळा फार लांब नव्हती. मात्र प्राथमिक शाळेच्या दिवसातली ती प्रत्येक शनिवार सकाळ इतकी आनंदाची असे कारण त्या दिवशी बाबा मला सायकल वरून शाळेत सोडत असत. तिथून त्यांना टिळक मंदिराच्या व्यायामशाळेत जायचे असे. दर शनिवारी व्यायामशाळेतल्या मातीच्या आखाड्यावरच्या श्री हनुमानाच्या मूर्तीची पूजा आणि आरती होत असे आणि बरीच वर्षे बाबा न चुकता त्यावेळी हजर रहात.

आमचे बिऱ्हाड पहिल्या मजल्यावर असल्याने सायकल पहिल्या मजल्यावरच्या बालकनीत ठेवलेली असे. नियमित व्यायाम करणरे बाबा ती सायकल लीलया रोज खाली घेऊन येत असत. बाबांच्या सायकलवर पुढच्या दांडीला लावलेल्या छोट्याशा सीटवर मी बसायच्या आधी, बाबा मनापासून सायकल साफ करायचे. ते त्यांचे आवडते काम असे. त्यावेळी समोरच्या रस्त्यावर नियमित दिसणारे एक दृश्य माझ्या स्मृतीत कायमचे नोंदवलेले आहे. हा लेख लिहिताना आज ते दृश्य तसेच डोळ्यासमोर उलगडते आहे. माझ्या घरा समोरच्या वखारिया हाऊस मधून बाहेर पडून गाठ्या-पापड्या-कचोऱ्या-जिलेबीने शिगेने भरलेल्या टोपल्या डोक्यावर घेऊन, एक किंवा दोन माणसे नेहेमी नेमक्या त्याचवेळी गोपाळ स्वीट आणि फरसाण मार्टकडे जाताना दिसत असत. टोपल्या कागदाने झाकलेल्या असत तरीही रोजच्या सवयीने कावळे त्याला न चुकता चोचां मारत असत. गोपाळ फरसाण हे दुकान सुद्धा घराच्या अगदी बाजूलाच कारिया यांच्या छोट्याशा घराच्या तळमजल्यावर  होते. आज मागे वळून पाहताना, या त्याच वेळी नियमित घडणाऱ्या घटनाक्रमाचा छान आणि स्पष्ट उलगडा होतो. घराच्या सहज सोप्या शिस्तीमुळे शाळेत वेळेवर जाणे हे लहान वयातच माझ्या अंगवळणी पडले होते. दररोज माझ्या शाळेत जाण्याच्या वेळीच फरसाण आणि

जिलबीच्या टोपल्या दुकानात घेऊन जाणे हा निव्वळ योगायोग होता. मात्र त्या टोपल्या नेमक्या ठरलेल्या वेळीच दुकानात पोहोचल्या पाहिजेत ही सुद्धा जगन्नाथ शर्मा आणि त्यांचा मुलगा रामेश्वर शर्मा यांची कडक शिस्त होती याची आज जाणीव होते.

ही कहाणी आहे विलेपारल्यातील सर्वात जुने बलुतेदार श्री जगन्नाथ शर्मा आणि त्यांच्या **गोपाळ स्वीट आणि फरसाण मार्टची**. विलेपारले बाजारातील गावडे हॉस्पिटल समोर, फळे आणि भाज्यांनी भरलेल्या ठेल्यांच्या मागे आज तुम्हाला गोपाळ स्वीट आणि गोपाळ फरसाण अशी दोन दुकाने शेजारी शेजारी दिसतील. ही त्यांचीच कहाणी आहे.

आजपासून नव्वद वर्षांपूर्वी, साधारण १९२८ / ३० या वर्षात कधीतरी राजस्थान मधील लालसोट जिल्ह्यातील दोसा तालुक्यातल्या छावा या छोट्याशा गावातून आलेले श्री जगन्नाथ शर्मा, वयाच्या चाळीसाव्या वर्षी विलेपारल्यात दाखल झाले होते. आपल्या लेखमालेतील आत्तापर्यंत भेटलेल्या सर्वच बलुतेदारांकडे असलेली गुणवत्ता, जगन्नाथ शर्मा यांनासुद्धा प्राप्त झालेली होती. उद्यमशीलता, परिश्रमाची तयारी, चाणाक्ष नजर, नियमितता आणि

वक्तशीरपणा आणि जिभेवर जिलबीचा गोडवा अशा नैसर्गिक गुणवत्तेने जगन्नाथ शर्मा वयाच्या चाळीसाव्या वर्षी समृध्द झाले होते. त्या काळात, विजय कारीयाचे आजोबा या छोट्याशा बंगल्याचे मालक होते. हा बंगला रेल्वे स्टेशनच्या अगदी जवळ होता तरी शेवटची गाडी गेली आणि संध्याकाळी अंधार झाला की रस्त्यावरचे केरोसिनचे दिवे विझून जात आणि परिसर किर्रर अंधारात बुडून जात असे. काही संधीच्या शोधांत असताना जगन्नाथ शर्मांची, बंगल्याचे मालक कारीया यांचेशी भेट झाली. शर्मांच्या मनात दुधाची डेअरी सुरु करायचा विचार होता. पहाटे पासून कोणाचीतरी सोबत होईल असा विचार करून कारियानी बंगल्याच्या तळ मजल्यावरची एक खोली मासिक भाड्यावर, जगन्नाथ शर्मांना वापरण्यासाठी उपलब्ध करून दिली. साधारण नव्वद वर्षांपूर्वी १९३० सालांत या जागेत शर्मा डेअरी फार्म सुरु झाले.

रोज भल्या पहाटे तीन वाजता जोगेश्वरीतील गोठ्यांमध्ये जाऊन, अल्युमिनियमच्या मोठ्या बरण्यांमधे दूध भरून सायकल वरून ते पारल्यात घेऊन यायचे आणि त्याचा रतीब घालायचा असे डेअरीचे काम सुरु झाले. हळूहळू ताज्या दुधाबरोबर दही आणि

पनीर विक्रीची सुरुवात झाली. डेअरीच्या कामात शिस्त आली आणि व्यापार वाढू लागला. जगन्नाथ शर्मा यांचा दरवर्षी राजस्थान मधील गावाला आठ-दहा दिवस जाऊन यायचा शिरस्ता होताच. अशाच एका वर्षी जयपुर मधील दोन तरुण कारागिरांना बरोबर घेऊन जगन्नाथ शर्मा मुंबईला परतले. या दोन तरुणांकडे खास राजस्थानी नमकीन पदार्थ बनवण्याचे कसब होते. आपल्या डेअरी समोरच्या वखारिया हाऊस मधे शर्मांनी एक जागा भाड्याने घेतली आणि तिथे हळूहळू गाठ्या-पापड्या-कचोऱ्या-जिलेबी बनवायला सुरुवात झाली. ही घटना साधारण १९४० या सालातली. आता दूध आणि दुधाच्या अन्य पदार्थांच्या बरोबर स्वतः बनवलेले हे फरसाण विक्रीला ठेवले गेले. फरसाण विक्रीची सुरुवात करणारे जगन्नाथ शर्मा हे पारल्यातले पहिले बलुतेदार. आजही वखारिया हाऊसच्या नव्या इमारतीत हा कारखाना चालू आहे. त्यानंतर कित्येक वर्षे फरसाण विक्री करणारे हे एकमेव दुकान होते. दुर्दैवाने जगन्नाथ शर्मा यांचे १९५५ मधे वयाच्या पासष्टाव्या वर्षी निधन झाले. यावेळी त्यांचा मुलगा रामेश्वर शर्मा पंधरा वर्षांचा होता.

श्री बाबुराव सहानी हे माझ्या वडिलांचे समवयस्क स्नेही होते. ब्रह्मचारी वृत्तीचे हे गृहस्थ नियमित व्यायाम करत असत. सोहोनी

आणि गोपाळ फरसाण या दुकानाचे एक अनोखे नाते होते. रोज सकळी चालण्याचा भरपूर व्यायाम झाला की सातच्या सुमारास सहानी गोपाळ फरसाणच्या दुकानात येत असत. दुकानाच्या काचेखाली ठेवलेली ताजी ताजी एक कचोरी खायची असा शिरस्ता बाबुराव सहानी याने कित्येक वर्षे नियमितपणे पाळला होता. मी सुद्धा त्यांना काही वेळा दुकानात उभे राहून फक्त एका कचोरीचा स्वाद घेताना पाहिले आहे. गोपाळ स्वीट आणि फरसाण मार्टच्या व्यवसायाची व्यवस्था वडिलांच्या नंतर रामेश्वर शर्मा यांनी पाहायला सुरुवात केली. आता मिठाई आणि फरसाणचा व्यवसाय वाढला होता. यथावकाश दुधाची डेअरी बंद करून फरसाण बरोबरच माखनिया, दुधाची बर्फी, पेढे, कलाकंद असे नवे मिठाईचे पदार्थ विक्रीला ठेवले गेले. या नंतर १९६० सालात, वयाच्या विसाव्या वर्षी रामेश्वर शर्मा यांनी आत्ताच्या केसकर बागेसमोरचं पत्र्याच एक दुकान भाड्याने घेतले. आता फरसाण आणि मिठाईच्या व्यापारात जम बसला होता आणि त्यांच्या मनात व्यवसाय वृद्धीचा विचार सुरु झाला होता.

उद्यमशीलता आणि आव्हाने स्वीकारणे ही आपल्या तत्कालीन सर्वच बलुतेदरांची गुणवत्ता समान आहे. रामेश्वर शर्मा

यांचे त्यावेळचे धाडस म्हणजे आजचे शर्मा भेळपुरी हाऊस. १९६२ सालांत या व्यवसायाची सुरुवात झाली. गेटवे ऑफ इंडिया – गिरगाव चौपाटी – विलेपारले जुहू अशा ठिकाणी त्या काळात, उत्तर भारतातून आलेल्या नागरिकांची भेळपुरीची दुकाने मोठा व्यवसाय करत होती. रामेश्वर शर्मा यांनी अशा अनेक दुकानातील भेळपुरी – शेवपुरी – पाणीपुरी या सर्व पदार्थांच्या चवींचा अभ्यास केला आणि तीन - चार प्रकारच्या चटण्या आणि पाणीपुरीच्या पाण्याची स्वतःची खास चवीची कृती बनवली.

शाळेच्या दिवसातील गोपाळ स्वीट आणि फरसाण मार्टच्या आठवणी आणि स्मृती ताज्या आहेतच. कॉलेजातील दिवस संपून सगळी मित्रमंडळी पोटापाण्याच्या कामाला लागली. कालांतराने हळूहळू त्याकाळात जमलेल्या मित्र-मैत्रिणीच्या जोड्यांनी लग्नाच्या गाठी बांधल्या. नंतरच्या काळात यांच्या लग्नाआधीच्या प्रेमालापाच्या दिवसातील शर्मा भेळपुरी हाऊसचे महत्त्व लक्षात आले. प्रेमप्रकरण सुरु झालंय हे कॉलेजात कोणाला समजू नये हा पहिला उद्देश. कुठल्याही हॉटेलमधे अशा प्रेमिकांना खूप वेळ बसू दिले जात नसे अशी परिस्थिती. मग यावर अशा प्रेमिकांनी शोधलेला उपाय म्हणजे दुपारी साडे तीन – चार या वेळेत शर्मा

भेळपुरी हाऊसमधे भेटणे. या वेळी फार गर्दी नसे आणि चार आण्याची भेळ खात तिथे तासभर बसता येत असे. पारल्यातली कॉलेज १९५८ / ६० मधे सुरु झाली. शर्मा भेळपुरी हाऊस १९६२ मधे सुरु झाले. गेल्या साठ वर्षात अशी किती प्रेमी युगुलं इथे भेटली असतील याचा इतिहास मात्र उपलब्ध नाही...!!

भेळपुरी – शेवपुरी – पाणीपुरी याची सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीला १९६२ / ७२ पर्यंत रोजचा गल्ला आठ ते दहा रुपयांचा असे. याचे कारण भेळपुरी पंधरा पैसे आणि चार आण्याला मिळत असे. हळूहळू वाढत १९७५ पर्यंत हा गल्ला शंभर रुपयांचा झाला. रामेश्वर शर्मा यांना सत्यनारायण आणि रामगोपाल हे दोन मुलगे. धाकटा रामगोपाल चार्टर्ड अकाऊंटंट झाला आणि आज तो स्वतंत्र व्यवसाय करतो. मोठा मुलगा सत्यनारायण शाळा संपवून लगेच वडिलांबरोबर दुकानात कामाला लागला. गोपाळ स्वीट आणि भेळपुरी हाउसच्या प्रगतीमधे त्यांचा मोठा सहभाग आहे. याच्याच आमदानीत १९९६ / ९७ सालात गोपाळ स्वीट आणि फरसाण मार्टचे विभाजन झाले. संस्थापक जगन्नाथ शर्मा याच्या रामेश्वर आणि छोटेलाल या दोन मुलांना त्यांनी समान वाटा देऊन कुटुंबात सामंजस्य अबाधित ठेवले.

सत्यनारायण यांचा मुलगा संदीप दोन्ही दुकानांचा व्यवहार आज समर्थपणे सांभाळतो आहे. या उद्यमी तरुणाने, शर्मा भेळपुरी हाऊसची खास चव आणि दिल्ली चाट याच्या चवीतील फरक बारकाईने मला समजून सांगितला. प्रामुख्याने सर्व चटण्या आणि पाणीपुरीचे पाणी यातील खास चवीचे मर्म काय आहे त्याचेही विस्ताराने वर्णन केलेन. विशेषकरून त्यांच्या पाणीपुरीतील उकडलेले मूंग – उकडलेला बटाटा – रगडा याचे योग्य प्रमाण आणि चवीतील महत्त्व काय तेही विषद केले.

विलेपारल्यातील नागरिकांप्रती त्याने व्यक्त केलेली भावना आणि त्याचे अनुभव फारच बोलके आहेत. इथले नागरिक किती समंजस आणि निष्ठावान आहेत, त्याचे वडील आणि आजोबांचे अनेक अनुभव संदीपकडे स्मरणबद्ध झाले आहेत. आजही विलेपारल्यातील आणि बाहेरील अनेक नामवंत नागरिक, यशस्वी कलावंत, गायक त्याचे नियमित ग्राहक आहेत. परदेशात स्थाईक झालेले पारल्यातील अनेक नागरिक खास जुन्या आठवणीना उजाळा देण्यासाठी, त्यांच्या मुला - नातवंडाना घेऊन स्मरणरंजन करण्यासाठी नेहमी दुकानात येत असतात.

जगन्नाथ शर्मा याचे गोपाळ स्वीट आणि फरसाण  मार्ट. संदीपचे आजोबा रामेश्वर शर्मा यांनी धाडसाने सुरु कलेले शर्मा भेळपुरी हाऊस व्यवसाय सुरु केला. वडील सत्यनारायण शर्मा यांनी व्यवसायाची वृद्धी केली. जगन्नाथ शर्मांच्या चवथ्या पिढीतील संदीप शर्मा याने आधीचे दोन्ही व्यवसाय सांभाळताना, भेळपुरी – शेवपुरी – पाणीपुरी आणि अन्य पदार्थांची केटरिंग सेवा सुरु केली. आपले आवडते खेळाडू भारतरत्न श्री सचिन तेंडूलकर यांच्या घरच्या प्रत्येक कार्यक्रमात, या सर्व पदार्थांची केटरिंग सेवा आणि व्यवस्था आता संदीप शर्माकडे असते...!!

जगन्नाथ शर्मांनी प्रत्यक्ष काम करून स्थापन केलेल्या मुल्यांवर आणि आखून दिलेल्या मार्गावर प्रगतीच्या दिशेने गोपाळ स्वीट आणि शर्मा भेळपुरी हाऊसची वाटचाल वेगाने होते आहे. भेळपुरी – शेवपुरी – पाणीपुरीचा व्यवसाय परदेशात नेण्यासाठी बोलणी चालू आहेत. विलेपारल्याचे DNA घटक असलेल्या या सर्वात जुन्या बलुतेदाराची आणि त्याच्या पुढच्या पिढ्यांची ही वास्तव कहाणी सर्वांना निश्चितच प्रेरणादायी आहे. संदीप शर्मा आणि त्याच्या कुटुंबाला अनेकानेक शुभेच्छा...!!

--००--

विलेपारल्यातील बलुत १ / ८

# शिवसहायसिंग बघेल: विलेपारल्यातिल पहिला मंडप डेकोरेटर.

नेहरू रोड वरून विलेपारले रेल्वे स्टेशनपर्यंत येऊन आपण डावीकडे वळलो की आपण मिलन सबवेच्या दिशेने जायला निघतो. नेहरू रोडच्या दक्षिणेला समांतर असलेल्या गोखले रोडच्या कोपऱ्यावर एक बैठी चाळ आहे. तीच जुनं नांव दगडी चाळ आणि आता बदललेलं नाव सवानी निवास. शिवसहायसिंग बघेल म्हणजेच आपले बलुतेदार शिवाभाई यांच्या मामांच्या व्यवसायाचे गोडाऊन होते त्याच जागेत आपल्याला इस्टर्न ग्रेनाईट या नावाने एक मोठी वखार दिसते. याच रस्त्याने पुढे गेले की आपल्याला मिलन सबवेतून, रेल्वे लाईनच्या खालून पारला पश्चिमेला जाता येते. सबवेच्या त्याच वळणावर उजवीकडे, आपल्याला पार्ले मार्बल ही मार्बल – ग्रेनाईटची या नावाची वखार लागते. शिवाभाई बघेल यांच्या कुटुंबातील पुढच्या पिढीचे, हे विस्तारित व्यवसाय आहेत.

मध्यप्रदेशातील जबलपूर शहरात १९२४ मधे, एका राजपूत कुटुंबात शिवाभाईचा जन्म झाला. १९४४-४५ सालात शिवाभाई तत्कालीन ब्रिटीश रॉयल नेव्ही मधे मुंबईत भरती झाले आणि पारल्यात आपल्या एका दूरच्या मामांच्या घरी रहायला आले. पारल्याच्या सौजन्य संस्कृतीचा अनुभव मला नेहमीच मिळत आलाय. साधारण १९२८-३० पासून या मामानी मंडप डेकोरेटरचा छोटासा व्यवसाय सुरु केला होता. विलेपारल्यातील हे पहिले मंडप डेकोरेटर. नव्याने वस्ती झालेल्या पारल्यात, लग्न-मुंज अशा छोट्या – छोट्या खाजगी समारंभासाठी आठवडा - दहा दिवस मंडप बांधून द्यायचा इतकाच या व्यवसायाचा विस्तार होता.

१९४४-४५ ही वर्षे म्हणजे नागरिकांना भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे वेध लागले होते, तो हा काळ. या वर्षी ब्रिटीश रॉयल नेव्हीमधे दाखल झालेल्या शिवाभाई आणि त्याच्या बरोबरच्या तरुण मित्रमंडळींच्या अंगातही स्वातंत्र्याचे वारं शिरले होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या महिनाभर आधी शिवाभाईसह बारा-पंधरा मित्रांनी एके रात्री, ब्रिटीश रॉयल नेव्हीच्या ताब्यातील गोदिवर फडकणारा युनियन जॅक हा ब्रिटीश ध्वज खाली उतरवून तिरंगा फाडकवला. सकाळी ही गोष्ट उघडकीला आली आणि

शिवाभाईसह सर्व मित्राना अटक करण्यात आले आणि त्यांची रवानगी येरवडा तुरुंगात झाली. पुढच्या एका महिन्यात देश स्वतंत्र झाला आणि शिवाभाई आणि मित्रमंडळीचि सुटका झाली. शिवाभाईने ब्रिटीश रॉयल नेव्हीचा निरोप घेतला आणि तो आपल्या मामांच्या मंडप डेकोरेटर वखारीत १९४७ साली त्यांच्या मदतीला दाखल झाला. आज या घटनेला सत्तर वर्षांचा काळ उलटला आहे.

१९४७ ते १९६० या काळांत तरुण शिवाभाईने आपल्या मामांकडून मिळणारा सल्ला आणि स्वत: घेतलेल्या अनुभवातून व्यवसायाचे गणित नव्याने मांडायचे ठरवले. वाढत्या वयामुळे मामांना कामे उरकत नव्हती आणि मंडप व्यवसायातील पारलेकरांच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे आवश्यक होते. मंडपाची मागणी वाढत होती आणि आता पारल्यात मोठे सार्वजनिक उत्सव, नाट्यमहोत्सव सुरु झाले होते. यामुळे मंडपाबरोबरच प्रकाशयोजना – दिवे – रोषणाई आणि ध्वनी व्यवस्थेची अर्थात माईक आणि स्पीकर या व्यवस्थेची मागणी वाढत होती.

त्यावेळी श्री नंदू कुलकर्णी यांचा इस्टर्न रेडीओ हा व्यवसाय भरभराटीला आला होता. महात्मा गांधी रोडवर, गावडे हॉस्पिटलच्या बाजूला इस्टर्न रेडीओची पाटी, आजही दिमाखात झळकताना दिसते. १९४० नंतर विलेपारल्यातील घराघरात रेडीओ पोहोचला होता. लांब-रुंद असा देखणा रेडीओ प्रत्येक दिवाणखान्याचे भूषण ठरला होता. अशा रेडीओचि दुरुस्ती हा नंदू काकांचा प्रमुख व्यवसाय होता आणि सभा – समारंभात ध्वनीक्षेपणाची व्यवस्थ करणे सुरु झाले होते. चतुर शिवाभांईनी मामांचा मंडप डेकोरेटरचा व्यवसाय विकत घेतला आणि प्रथम श्री नंदू कुलकर्णी यांचेशी भागीदारी केली. आता इस्टर्न डेकोरेटर तर्फे मंडपासह ध्वनीक्षेपकाची व्यवस्था देण्याची सुरुवात झाली होती.

१९६० ते १९७९ या काळात इस्टर्न डेकोरेटरच्या व्यवसायाची वृद्धी वेगाने झाली. प्रवीणसिंग म्हणजे मुन्नाभाई हा सर्वात मोठा मुलगा आता वडिलांच्या मदतीला आला होता. त्या मागोमाग प्रमोदसिंग, प्रदीपसिंग, दिनेशसिंग आणि तरुणसिंग हे शिवाभाईंचे पाच मुलगे आता वडिलांच्या बरोबर काम करायला उत्सुक होते. १९७२ या वर्षी डहाणूकर महाविद्यालयाच्या वार्षिकोत्सवातील रंगमंचावरील प्रकाश योजना आणि ध्वनी

व्यवस्थेची जबाबदारी प्राध्यापक भागवत मॅडम यांनी आमच्या आर्ट सर्कल कडे सोपवली होती. त्यावेळी इस्टर्न डेकोरेटर तर्फे, मुन्नाभाईनी ती व्यवस्था केली होती याचे स्मरण आजही होते आहे. १९७९ मधे शिवाभाईनी मंडप डेकोरेटरचा व्यवसाय बंद केला. आता मंडप डेकोरेटरच्या वखारीत ऑटोरिक्षा दुरुस्तीचे काम सुरु झाले. आजपासून चाळीस वर्षांपूर्वीच्या त्या काळात मुंबईच्या उपनगर विभागात रस्त्यावरून ऑटोरिक्षाचा वापर सुरु झाला होता. इस्टर्न ऑटोमोबाईल हे ऑटोरिक्षा दुरुस्तीचे बोरीवली ते वांद्रा या परिसरातील सर्व प्रथम केंद्र बनले. त्याच बरोबरीने विलेपारले येथे एक आणि अंधेरी पश्चिमेला डी एन नगर परिसरात एक अशी ऑटोरिक्षा स्पेअर पार्टची दोन दुकाने, शिवाभाईनी सुरु केली होती. या व्यवसायाचा विस्तार सुद्धा वेगाने झाला होता.

मोठा मुलगा मुन्नाभाई याने याचवेळी १९७९ मधे, मिलन सबवे जवळ पार्ले मार्बलचा व्यवसाय सुरु केला होता. १९५० च्या आसपासच्या काळात, विलेपारल्याच्या घराघरातिल कोळश्याच्या चुलींची जागा केरोसिनवर चालणाऱ्या प्रायमस स्टोवने घेतली होती. बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन स्वयंपाकघरातिल जमिनीवर बसून स्वयंपाकाचे काम करण्याच्या

जागेवर आता उभ्याने काम करता येईल असे ओटे बनवले जाऊ लागले होते. असे ओटे बनवण्यासाठी ग्राहकांच्या पसंतीच्या देखण्या मार्बल-ग्रेनाईट-कडप्पा अशा दगडांचा वापर केला जाऊ लागला होता. जुन्या इमारतींच्या जागी नव्याने इमारती बांधण्याच्या कामाला याच काळांत वेग आला होता. अशा इमारतींमध्ये अशा दगडांचा वापर नियमितपणे सुरु झाला होता. पार्ले मार्बलच्या व्यवसायाला हे वातावरण पूरक ठरले होते. सुरुवातीच्या काळांत छिन्नी – हातोड्याचा वापर करून कसबी कारागीर असे दगड हाताने कापत असत. आता दगडांच्या मोठ्या लाद्या, मापाप्रमाणे कटिंग करून त्याला पॉलिश आणि कोपऱ्याना गोलाई देण्याचे मोठे यंत्र पार्ले मार्बलच्या कारखान्यात बसवले गेले. काही वर्षातच हा व्यवसाय भरभराटीला आला होता.

विलेपारल्याच्या DNA चे घटक असलेल्या आपल्या बलुतेदारांच्या प्रगतीचा आणि कारकीर्दीचा अभ्यास करताना त्या प्रत्येकामधे उद्यमशीलता-मेहनतीची तयारी-नियमितपणा असे अनेक समान गुणधर्म मला जाणवले होतेच. मात्र या सर्वांमध्ये शिवाभाई बघेल खूप चतुर उद्योजक होते. त्या त्या काळातील समाजाच्या बदलत्या गरजांचा योग्य अभ्यास त्यांनी सातत्याने

केला असावा. साधारण पस्तीस वर्षे मंडप डेकोरेटरचा व्यवसाय केल्यानंतर तो बंद करून रिक्षा दुरुस्तीचा व्यवसाय सुरु करणे. तो व्यवसाय वाढीला लागल्यानंतर तो बंद करून त्या मागोमाग मार्बल – ग्रेनाईट चा व्यवसाय सुरु करणे या सर्व मांडणीमधे, शिवाभाईंचे एक निश्चित धोरण असावे. बरकत असलेल्या प्रत्येक व्यवसायात प्रतिस्पर्धी निर्माण होतच असतात. नीट घडी बसलेले व्यावसाय पूर्ण बंद करून, बदलत्या परिस्थितीचा, भविष्यातिल समाजाच्या गरजांचा योग्य अभ्यास करून नवे व्यवसाय उभे करणे यातील शिवाभाईंची दूरदृष्टी आणि त्यांचे चातुर्य आणि कर्तुत्व फार वेगळे आणि नेमके आहे याची जाणीव होते.

१९७९ या वर्षी सुरु केलेला ऑटोरिक्षादुरुस्ती आणि स्पेअर पार्ट याचा व्यवसाय, १९९५ मधे शिवाभाईंच्या सल्ल्याने बंद केला गेला. याला कारणही तसेच होते. मुन्नाभाई आणि त्यांच्या बंधूनी आता मार्बल –ग्रेनाईट या व्यवसायावर लक्ष केंद्रित केले होते. १९८८ मधे राजस्थानातील मकराना मधे मार्बलच्या एका क्वारिचे म्हणजे खाणीचे हक्क बघेल कुटुंबाने विकत घेतले. सर्वात धाकटा भाऊ तरुणसिंग म्हणजे मधुभाई यांनी मकरानामधे राहून, १९८८ ते ९२ या क्वारीच्या उत्पादनाचा व्यवसाय कौशल्याने सांभाळला

आणि यशस्वी केला. अशा मार्बल क्वारिचे एक वैशिष्ट्य असते. यातून काढला जाणारा मार्बल अथवा ग्रेनाईट दगड चार ते सहा वर्षेच काढला जातो. एकदा अपेक्षित प्रतीचा दगड मिळणे थांबले की ही क्वारी बंद केली जाते कारण त्यातून काही उत्पन्न मिळणार नसते.

वडील म्हणजे शिवाभाईंच्या तालमीत तयार झालेल्या सर्व भावंडानी आता ऑटोरिक्षा दुरुस्ती बंद करून दगडी चाळीच्या त्याच जागी इस्टर्न ग्रेनाईट या नावाने वेगळा व्यासाय सुरु केला. अनेक प्रतीचे ग्रेनाईट दगड आज या दुकानात उपलब्ध आहेत. २००० या वर्षी, मोठाभाऊ मुनाभाई यांनी जबलपूर जवळ नर्मदा नदीच्या खोऱ्यात पांढऱ्या मार्बलचि एक मोठी खाणच विकत घेतली. पार्ले मार्बलच्या दुकानात आता स्वतःच्या खाणीतला मार्बल उपलब्ध झाला होता. या बरोबरच या सर्व भवानी भोपाळ शहरात आपला मार्बल डेपो सुरु केला.

माझ्या व्यवसायामुळे, पार्ले मार्बल हे दुकान आणि मुन्नाभाईचा आणि माझा संपर्क नियमितपणे १९९० सालापासूनचा. साप्ताहिक विवेक च्या १९९९ ते २००३ या चार

वर्षातील, गुढीपाडव्याच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या घरकुल विशेषांकासाठी मी संपादन सहाय्य केले होते. त्यावेळी मार्बल-ग्रेनाईट-कडप्पा या प्रत्येक घरात वापरल्या जाणाऱ्या सर्व दगडांवर, त्याच्या गुणवत्तेवर – टिकाऊपणावर काही लेख लिहिले होते. त्यावेळी मुन्नाभाइंशी नियमित गप्पा होत असत. अगदी अलीकडे मुन्नाभाईना देवाज्ञा झाली. त्यांचा MBA झालेला उच्चशिक्षित मुलगा विक्रम, आता पार्ले मार्बलचा व्यवहार समर्थपणे सांभाळतो आहे. मार्बल-ग्रेनाईट-कडप्पा या दगडाच्या बरोबरीने आता अनेक प्रकारच्या आणि डिझाईनच्या टाईल उपलब्ध आहेत.

प्रदीपसिंग आणि तरुणसिंग या दोन भावांची भेट, या लेखासाठीच्या मुलाखती निमित्ताने झाली. बघेल कुटुंबाने काही वर्षापासून इमारत बांधकामाचा व्यवसाय सुरु केला आहे. पार्ल्यातिल पाच-सहा इमारती बांधण्याचे काम पूर्ण झाले आणि नवीन बांधकामे सुरु आहेत.

वयाच्या विसाव्या वर्षी विलेपारल्यात दखल झालेल्या शिवसहायसिंग बघेल म्हणजेच शिवाभाईनी नंतरच्या काळात महाराणा प्रताप सेवा मंडल आणि राजपूत महासभा या दोन

संस्थांची स्थापना केली. आजही या संस्थांमार्फत अनेक लोकोपयोगी कामे सादर होत आहेत. शिवाभाईनी सुरु केलेल्या छोट्या व्यवसायाचि अशी चौफेर प्रगती झाली आहे. त्यांच्या तिसऱ्या पिढीतील तरुण सिव्हील इन्जिनिअरिंग आणि आर्किटेक्चर मधे मास्टर्स पदवीचा अभ्यास करून बघेल कुटुंबाचा व्यवसाय वृद्धिंगत करत आहेत.

विलेपारल्याच्या DNA चा घटक असलेला हा आपला आठवा बलुतेदार, शिवसहायसिंग बघेल...!!

**--oo--**

विलेपारल्यातील बलुत १ / ९

# नारायण स्टोर्सचे नारायणभाई

अभूतपूर्व मासिकात, जानेवारी २०१९ पासून सादर होत असलेली **विलेपारल्यातील बलुतं** ही लेखमाला, विलेपारल्यातील बलुतेदारांच्या निव्वळ परिचयासाठी लिहिलेली नाही. गेल्या शंभर – सव्वाशे वर्षात विलेपारल्याची एक खास ओळख निर्माण झाली. अशी ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्ती – घटना – कालानुरूप बदलणाऱ्या व्यवसायाच्या संकल्पना – पुढील पिढ्यांनी केलेला व्यवसाय विस्तार आणि या सर्वातून कणाकणाने आकार घेतलेली विलेपारल्याच्या सामाजाची आणि समाजमनाची वैविध्यपूर्ण ओळख  करून द्यावी असा या लेखमालेचा व्यापक हेतू आहे. विलेपारल्यातिल प्रत्येक पिढीतील तरुणाईने विविध व्यवसायांत केलेल्या प्रगतीचा मला नव्याने झालेला परिचय आणि त्याचा आलेख मांडणारी शृंखला मला या लेखमालेतून मांडता येते आहे. पारल्याचे ग्रामदैवत श्री पार्लेश्वर आणि माझे श्रद्धास्थान, लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेच्या टिळक मंदिरात गेले शतकभर गणेशोत्सवात स्थापन होणारा श्री गणेश यांचा हा आशीर्वाद आहे.

**थोड्याच दिवसांत होईल आता हे सगळ...आणि लहान मुलं इतकी खुश होतील की मला त्यांच्या चेहेऱ्यावरचा अपार आनंद आत्ताच दिसायला लागलाय...!!..**भेटीच्या अखेरीला अगदी सौम्य उत्साहात, शांतपणे सहज बोललेले महेशभाईंचे हे शब्द, मला त्यांचा छान परिचय देऊन गेले. महेश नारायण छाटबार म्हणजेच ...नारायण रतिलाल छाटबार यांचे सुपुत्र...!

विलेपारल्यातील नेहरू रोड वरील महापालिकेच्या कार्यालयावरून फिरोजशाह मेहता रोडवर वळलो की जरासे पुढे गेल्यावर उजव्या हाताला हनुमान मंदिर दिसते. तिथून जरासे पुढे गेले की आपल्या डाव्या हाताला नारायण स्टोअर्सची पाटी दिसते. नारायण स्टोअर्स हे नांव गेली चाळीस वर्षे पारलेकरांच्या परिचयाचे आहे. एक उल्लेखनीय गोष्ट अशी की समस्त पारलेकर नागरिकांच्या बद्दल महेशभाईंच्या बोलण्यात व्यक्त झालेल्या भावना, पारलेकराना अभिमान वाटेल अशाच आहेत.

गुजरातेतील बाबरा गावात जन्माला आलेल्या नारायण रतिलाल छाटबार यांनी आफ्रिकेतील दार ए सलाम या शहरातील केम्ब्रिज युनिव्हर्सीटीत प्रवेश घेतला. रसायन विज्ञान शाखेतील शिक्षण पूर्ण करून भारतात परत आल्यावर मुंबईत सी पी टँक परिसरात घर घेऊन, काही वर्षे त्यांनी पिडीलाईट इंडस्ट्री मधे नोकरी केली. साधारण चाळीस वर्षांपूर्वी १९८१ मधे, नारायण स्टोर्स या आपल्या दुकानाची विलेपारल्यात स्थापना केली. घरगुती वापरासाठी कपडे धुण्याची साबण पावडर, लिक्वीड साबण, फिनाईल ही तीन उत्पादने नारायणभाईंनी प्रथम दुकानात विक्रीसाठी उपलब्ध केली होती. मात्र या उत्पादनांशी किंचितही साम्य नसलेले पोटॅटो स्टार्च हे एक वेगळेच रसायन त्यांनी बनवायला सुरुवात केली होती. या विषयी विस्ताराने पुढे लिहिलेच आहे.

आपल्या सर्व बलुतेदारांप्रमाणेच नारायणभाईंकडे सुद्धा निसर्गदत्त गुणवत्ता होतीच. त्यांना वाचनाची आवड होती आणि निवडलेल्या व्यवसायाला पूरक अशा पुस्तकांचा संग्रह आणि नियमित वाचन हा छंद त्यांनी कायमच जोपासला होता. रसायनशास्त्राचे विद्यार्थी असल्याने त्या संदर्भातील विषय त्यांच्या

वाचनात नेहेमी असत. काही स्नेही – सुर्हुदांशी या विषयी त्यांच्या नियमित गप्पा होत असत. नियमितपणा – वक्तशीरपणा – विश्वास हे नारायणभाईंच्या व्यक्तिमत्वाचे अन्य महत्वाचे पैलू होते. पहिल्या भेटीतच अपरिचित व्यक्तीचा विश्वास प्राप्त करण्याची, स्नेहभाव निर्माण करण्याची हातोटी नारायणभाईंकडे होती. आज दुकान ज्या इमारतीत आहे त्या इमारतीचे विकासक श्री सेठना यांचे बरोबर आपल्या वडिलांची झालेली पहिली भेट आणि त्या दोघांत निर्माण झालेला परस्पर विश्वास याचे सविस्तर वर्णन महेशभाईंकडूनच ऐकावे इतके खास आहे. श्री सेठना यांनी  मालकी तत्वावर दुकान विकताना जागेची किंमत नारायणभाईंकडून हप्त्याने स्वीकारण्यासाठी दिलेली संमती हे एक विश्वासाचे अनोखे उदाहरण. व्यवसाय यशस्वी करतानाच साधलेला असा स्नेह – विश्वास हीच माणुसकीची नाती  विलेपारल्याचा DNA घडवत असतात. समाजातील दैनंदिन गरजा ओळखून त्या गरजांचा पुरवठा करण्याचा व्यवसाय उभा करताना आवश्यक चाणाक्ष दृष्टी, धाडस करण्याची तयारी, अथक प्रयत्न या सर्व गुणवत्ता आणि उत्तम लोकसंग्रह असे होते नारायणभाई छाटबार यांचे व्यक्तिमत्व.

विलेपारले उपनगर नेहेमीच चळवळया मंडळींचे गाव म्हणून सर्वदूर परिचित आहे. सहकारी गृह निर्माण चळवळ – ग्राहक सहकार चळवळ – उत्तम संगीताचे वार्षिक कार्यक्रम – प्रायोगिक नाटक – स्वच्छ पारले अभियान – प्लास्टिक मुक्त पारले अशा अनेक चळवळींचे हे माहेरघर. **Make it Yourself** नावाची अशीच एक चळवळ एकेकाळी पारल्यात सुरु झाली होती. कपडे धुण्यासाठी लागणारी साबण पावडर – फिनाईल – शाम्पू अशा दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या गोष्टी स्वतःच्या हाताने घरीच बनवा अशी चळवळ माननीय श्रीमती राजवाडे यांनी साधारण १९९० पासून विलेपारल्यात सुरु केली होती. एक – दोन दिवसांच्या शिबिरात, त्या महिलांना अशा घरगुती गरजेच्या गोष्टी स्वतः बनवण्यासाठी मार्गदर्शन करत असत. नारायणजीनी नेमके या चळवळीचे महत्त्व ओळखले. श्रीमती राजवाडे यांचा परिचय झाला होता आणि या चळवळीला पूरक अशी साबण, फिनाईलचि **Make it Yourself** कीट बनवण्याचे काम नारायणभाईनी सुरु केले. महेशभाई आणि जयशीलभाई या नारायणभाईंच्या दोन सुपुत्रांनी नेमक्या याच छोट्याशा संकल्पनेचे, विस्तारित व्यवसायात परिवर्तन केले आहे. त्याचा श्रीगणेशा नजीकच्या भविष्यकाळात निश्चितपणे झालेला दिसेल. एका गोष्टीची नोंद इथे करणे आवश्यक आहे. ज्या उत्पादनाने आपल्या व्यवसायाची

स्थापना नारायणभाईंनी १९८० मधे केली ती सर्वच उत्पादने खूप मोठ्या परदेशी व्यवसायांची मक्तेदारी होती. अशा तगड्या उत्पादकांच्या स्पर्धात्मक किमतीची बरोबरी करायची, किंबहुना त्याच्यापेक्षा थोड्या कमी किमतीत उत्तम माल विकायचा, त्याच्या दर्जात सातत्य ठेवायचे हे कौशल्य त्यांना अनुभवानेच साध्य झाले होते. दुसरी नोंद घेण्यासारखी गोष्ट अशी की सुरुवातीच्या काळांत ही सर्व उत्पादने हाताने बनवली जात असत. त्याचे नेमके माप हे अनुभव आणि कौशल्याचे काम होते.

आपल्या सर्वच बलुतेदारांचे अन्य समान वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या दुसऱ्या पिढीतील युवकांनी त्याच व्यवसायात बदलत्या साधनांसह केलेली प्रगती आणि विस्तार. नारायणभाईंनी आपल्या मुलाना, त्यांच्या तरुण वयातच, नियमितपणा – वक्तशीरपणा – परस्पर विश्वास – आपल्या उत्पादनांच्या उत्तम दर्जाचे सातत्य – जनसंपर्क – लोकसंग्रह आणि स्वावलंबन या व्यवसायाच्या सगळ्या पैलूंचा परिचय करून दिला होता.

यथावकाश नारायणभाईंनी स्टेन रिमूव्हर, हर्बल शाम्पू, कन्डीशनर शाम्पू, फ्लोअर क्लीनर आणि हँड वॉश अशा घरगुती

वापराच्या उत्पादनांचि निर्मिती करून त्याच्या विक्रीची सुरुवात केली होती. फ्लोअर क्लीनर आणि लिक्वीड डीसइन्फेक्टंट याची **Make it yourself** ही कीट अजूनही दुकानात उपलब्ध आहेत. याच वेळी पोटॅटो स्टार्च हे अगदीच वेगळे रसायन बनवायला सुरुवात केली होती. घरगुती वापरासाठी आणि खाद्यपदार्थांच्या निर्मितीमधे या स्टार्चचा वापर मोठ्याप्रमाणावर केला जातो. इलेक्ट्रोनिक इंजिनीअर झालेला नारायणभाईंचा मोठा मुलगा महेशभाई आणि धाकटा मुलगा जयशीलभाई दोघेही आपले शिक्षण संपवून वडिलांच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी सज्ज झाले होते. घरगुती वापराच्या उत्पादनांबरोबरच पोटॅटो स्टार्च या नारायणभाईंच्या अगदी वेगळ्या उत्पादनावर दोन्ही भावांनी लक्ष केंद्रित केले होते. या दोघांमुळे दुकानाची सजावट आणि घरगुती उत्पादनाच्या पॅकींगमधे सुधारणा झाल्या होत्या. आज दुकानात गेलात तर आकर्षक पॅकींग तुमचे लक्ष वेधून घेतीलच.

नारायणभाईनी सर्व उत्पादने दुकानाच्या मागच्या खोलीत आणि घरी तयार केली होती. महेशभाई आणि जयशीलभाई यांनी अंधेरीमधे २००२ सालात पहिली फॅक्टरी स्थापन केली. सर्वच उत्पादने त्या फॅक्टरीतून बनवायला सुरुवात झाली. जागा अपुरी पडू

लागली होती आणि २००५ मधे दहिसर मधील इंडस्ट्रीअल इस्टेट मधे एकामागोमाग पाच गाळ्यात उत्पादाने बनवायला सुरुवात झाली होती. हाताने मिश्रण करून बनवली जाणारी सर्व घरगुती वापराची उत्पादने आता मशीनमधे बनवली जाऊ लागली होती.

पोटॅटो स्टार्च बरोबरच आता सोल्यूबल स्टार्चचे उत्पादन सुरु झाले होते. या पुढची प्रगती फारच महत्वाची होती. कुठल्याही उत्पादनाच्या क्वालिटी टेस्टिंगचि काही आंतरराष्ट्रीय मानके आहेत. या टेस्टिंग प्रक्रियेत अवश्यक अशा रसायनाची निर्मिती आणि त्याची निर्यात हा या दोन भावांच्या प्रगतीचा पुढचा टप्पा होता. अमेरिका आणि युरोपमधे पोटॅटो स्टार्च बरोबरच आता सोल्यूबल स्टार्च आणि क्वालिटी टेस्टिंग केमिकलचि मागणी वाढतच गेली आहे. परिणामी नारायण स्टोर्सचा निर्यात व्यापार खूपच वाढला आहे.

चाळीस वर्षापूर्वी सुरु केलेल्या दुकानाची काही हजारात होणारी उलाढाल आता काही कोटींचा पल्ला गाठून पुढे गेली आहे. दुकानातून होणारी उलाढाल ५ टक्के तर निर्यात व्यवसाय ९५ टक्के असे उलाढालीचे गणित आता बदलले आहे. इथे एक महत्वाची नोंद करणे आवश्यक आहे. सॉफ्ट वेअर आणि हार्ड

वेअर या दोन्हीमधे पारंगत असलेल्या इलेक्ट्रोनिक इंजिनिअर महेशभाईनी आपल्या वापरासाठी आवश्यक सर्व मशीन स्वतः बनवली आहेत. आता त्यांचा मुलगा मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतो आहे आणि वडिलांच्या मशीन निर्मितीला हातभार लावतो आहे.

आजही नारायणभाईंचे सर्व कुटुंब एकत्र रहाते. दोन्ही भावांनी कामाची विभागणी करून घेतली आहे. जयशीलभाई फॅक्टरीचे व्यवस्थापन पहातात आणि महेशभाई दैनंदिन हिशेब आणि निर्यात व्यवहार सांभाळतात. या कुटुंबाची या पुढची प्रगती खूप महत्वाची असेल आणि त्याची नांदी सुद्धा झाली आहे. नारायणभाईंची Make it yourself ही मूळ संकल्पना आता आधुनिक पद्धतीने साकार होणार आहे. लहान मुलांसाठी खास अंघोळीचा साबण अर्थात बेदिंग बार बनवणारे यंत्र आता तयार झाले आहे. याची खासियत अशी की आपल्या आवडत्या रंगाचे – आवडत्या स्वादाचे – आवडत्या आकाराचे साबण, दुकानात ठेवलेल्या या मशीनमधे मुले स्वतः बनवू शकणार आहेत. नव्या संकल्पनेची ही मांडणी खूप आकर्षक असणार आहे. “थोड्याच दिवसांत होईल आता हे सगळ...आणि लहान मुलं इतकी खुश होतील की मला

त्यांच्या चेहेऱ्यावरचा अपार आनंद आत्ताच दिसायला लागलाय"...!!.. महेशभाईंच्या या सुरुवातीला उल्लेख केलेल्या उद्गाराचा संदर्भ असा आहे, हे आपल्या लक्षात येईल.

विलेपारल्यात पर्यावरणस्नेही उत्पादनांच्या चळवळीने अलीकडे काही वर्षात निश्चित आकार घेतला आहे. याला अगदी संयुक्तिक अशी महेशभाईंची दुसरी संकल्पना आणि त्यासाठी खास बनवलेले मशीन आता तयार झाले आहे. लिक्वीड साबण - कन्डीशनर शाम्पू - फ्लोअर क्लीनर - हँड वॉश अशी निवडक उत्पादनांची डीस्पेनिंग मशीन थोड्याच काळात दुकानात बसवली जाणार आहेत. आपली रिकामी झालेली बाटली दुकानात घेऊन यायची आणि हवे ते उत्पादन रिफील करून घ्यायचे अशी ही साधी – सोपी संकल्पना आहे. यामुळे पर्यावरण रक्षण – आर्थिक बचत असे वैयक्तिक आणि सामाजिक फायदे निश्चित होणार आहेत.

व्यवसायाच्या अगदी सुरुवातीपासून सामाजिक बांधिलकी जपणारे नारायण रतिलाल छाटबार आणि त्यांचे दोन सुविद्य सुपुत्र. आपल्या विलेपारल्यातील नागरिकांप्रती कृतज्ञता भावना असलेले उल्लेखनीय आणि प्रगतिशील बलुतेदार...!!

--००--

विलेपारल्यातील बलुत १ / १०

# प्रेमजी लालजी व्होरा - पी एल पार्ला - सुका मेव्याचे व्यापारी.

परांजपे ए स्कीम – परांजपे बी स्कीम – तेजपाल स्कीम अशा विलेपारल्यातील साधारण ऐंशी – शंभर वर्षांपूर्वीच्या मूळ नकाशात आखले गेलेले रस्ते आणि गल्ल्या आता चिंचोळया वाटू लागल्या आहेत. साधारण सत्तर – बहात्तर सालापर्यंत रुंद वाटणाऱ्या मुख्य रस्ते आणि छोट्या गल्ल्यांमधे आता दुतर्फा रहिवाश्यांच्या मोटारी पार्क केल्या जातात. परिणामी हनुमान रोड – नेहरू रोड – प्रार्थनासमाज रोड – महंत रोड असे मुख्य रस्ते सुद्धा चिंचोळे वाटू लागतात. श्री रमेशभाई नानजीभाई सावला या कच्छविजय ट्रान्सपोर्टच्या माल वाहतूकदार पारलेकराचे १९४५ सालापासून असे अनुभव ऐकणे फार रंजक असते. मुंबईच्या आणि नवी मुंबईच्या घाऊक बाजारातून दादर ते पारला या दरम्यान वाण सामांनाची किरकोळ विक्री करणाऱ्या व्यापार्यांना त्यांच्या खरेदी केलेल्या मालाची घरपोच डिलिव्हरी करण्याचे कच्छविजय ट्रान्सपोर्टच्या ट्रकचे काम आजही अव्याहतपणे सुरु आहे. आता

मात्र प्रत्येक रस्ता आणि गल्ल्यांमधे झालेल्या वाहनांच्या गर्दीमुळे डिलिव्हरी ट्रकचा दैनंदिन प्रवास जिकिरीचा झाला आहे.

विलेपारल्याचे DNA घडवणाऱ्या बालूतेदारांचा परिचय, कच्छी व्यापारी बांधवांच्या परिचयाविना नक्कीच अपूर्ण राहील. वाणसामान, स्टील, प्लास्टिक आणि काचेच्या स्वयंपाकघरातील प्रत्येक वस्तू, कापड आणि तयार कपडे, ड्रायफ्रूट, बिस्किटे आणि तयार खाऊचे सामान असे विलेपारल्यातील निवडक व्यवसाय आणि व्यापार, ही बहुतांशी कच्छी व्यापारी बांधवांची मक्तेदारी आहे. हनुमान रोडवरील जुने जेठालाल वाणी, त्यांच्यासमोर पारले प्रोव्हीजन स्टोर्स हे औषधाचे दुकान, श्रद्धानंद रोडवरचे महावीर ट्रेडिंग, करमसी वेलजी, स्टीलच्या भांड्यांचे व्यापारी मिठूभाई, विलेपारले स्टेशन समोरील प्रेमसन्स, महात्मा गांधी रोडवरचे चॅम्पियन ड्रायफ्रुट, नेहरू रोडवरचे पार्ला बुक डेपो असे सगळेच विलेपारल्यातले कच्छी व्यापारी किमान पन्नास ते ऐंशी वर्षे जुने पारलेकर आहेत.

श्री रमेशभाई सावला यांचे वडील श्री लालजीभाई सावला हे यातील सर्वात जुने व्यवसायिक. यांनी मुंबईच्या घाऊक

बाजारातील सामान वाण्याच्या दुकानात घरपोच देण्यासाठी कच्छविजय ट्रान्सपोर्ट या माल वाहतूक व्यवसायाची सुरुवात १९४५/४६ या वर्षात केली. १९४७ या वर्षात देश स्वतंत्र झाला आणि त्याकाळात मुंबईहून कच्छ आणि कच्छ हून मुंबई असा माल वाहतुकीचा व्यवसाय लालजीभाईनी सुरु केला. मुंबई-कच्छ मार्गावर, माल वाहतूक ट्रकच्या प्रवासासाठी सोयीचा आणि जवळचा रस्ता शोधण्याचे श्रेय लालजीभाई सावळा यांचे आहे. त्याकाळात त्यांनी त्या रस्त्याची डागडुजी सुद्धा स्थानिक संस्थांकडून करून घेतली होती. त्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी दिलेले प्रशस्ती पत्र सावला कुटुंबीयांनी आजही जपून ठेवले आहे. विलेपारल्यातील श्री अण्णासाहेब साठे यांचे विजय स्टोर्स, श्री गोखले यांचे विष्णू स्टोर्स, श्री सप्रे यांचे सप्रे आणि मंडळी, पारले बाजारातील प्रभू जनरल स्टोर्स असे वाण समान विकणारे व्यापारी अगदी प्रथमपासून त्यांचे ग्राहक होते आणि आजही आहेत. आपले ट्रक उभे करण्यासाठी लालजीभाईनी तेजपाल रोडवर पारले बिस्कीट फॅक्टरी जवळ १९५० च्या दरम्यान मोठी जागा विकत घेतली. कालांतराने तिथे मोठ्या इमारती बांधून, १९७५ मधे लालजींचे कुटुंब नव्या जागेत राहायला गेले.

उद्यमशीलता – अंग मेहनतीची तयारी – दूरदृष्टी – धाडस – नियमित चोख आर्थिक व्यवहार – वक्तशीरपणा – काही व्यवसायांची मक्तेदारी -- कच्छी समाज बांधवांची संघटन आणि सहकार शक्ती, ही कच्छी व्यापारी बांधवांची आणि कच्छी समाजाची बलस्थाने आहेत. समाजाची एकजूट हेच नेमके त्यांच्या यशाचे मर्म आहे.

प्रेमजी लालजी व्होरा हा किशोर, १९५३/५४ या वर्षात, वयाच्या चौदाव्या वर्षी कच्छ मधील आपल्या गावातून मुंबईत दखल झाला. जेमतेम चवथी इयत्ता शिकलेल्या प्रेमजी भाईनी, अन्य कच्छी बांधवांच्या सल्ल्याने आणि मदतीने, मस्जिद बंदर या मुंबईच्या घाऊक बाजारपेठेत छोटीशी जागा भाड्याने घेऊन सुका मेवा विकण्याचा व्यापार सुरु केला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरच्या त्या काळांत अफगाणिस्तान – इराण मधून येणाऱ्या सुका मेव्याचा व्यापार पाकिस्तानमार्गे सुरु झाला होता. किसमिस म्हणजे बेदाणे – काळया मनुका – बदाम – अक्रोड – जर्दाळू – पिस्ता – अंजीर असे अफगाणिस्तानातून येणारे सुका मेव्यातील सर्वच जिन्नस आणि भारतीय काजू याच्या व्यापारात तरुण प्रेमजीभाईनी लवकरच जम बसवला होता.

१९६५ सालात, कच्छविजय ट्रान्सपोर्टचे मालक लालजीभाई सावला यांच्या मुलीशी प्रेमाजीभाईंचा विवाह झाला. लालजीभाई सावला यांच्यासारख्या यशस्वी व्यावसायिकाचा जावई प्रेमजी लालजी व्होरा, १९७५ मधे पारल्यात राहायला आले आणि तेजपाल रोडवरील वीरेश्वर महाल या लालजीभाई सावला यांच्या नव्याने बांधलेल्या इमारतीत मस्जिद बंदरचा व्यापार स्थलांतरित केला.

वीस वर्षांच्या सुका मेव्याच्या व्यापाराच्या अनुभवातून त्यांनी मसाल्याच्या जीन्नसांचाही घाऊक व्यापार सुरु केला होता. इलाईची – बडी इलाईची – मिरी – जायफळ – लवंग असे मसाल्याचे सर्वच जिन्नस प्रेमजीभाईंच्या दुकानात घाऊक विक्रीसाठी उपलब्ध झाले. यात विशेष उल्लेख करायचा तर सुपारीच्या व्यापाराचा. चाळीस – पन्नास वर्षांपूर्वीच्या त्या काळात सुपारीचे किमान पंधरा प्रकार उपलब्ध होते. आज प्रेमजीभाईंच्या कडे फक्त सहा प्रकारच्या सुपाऱ्या उपलब्ध आहेत. या त्रुटीं मागची कारणेही प्रेमजीभाई विस्ताराने वर्णन करून सांगतात.

प्रेमजीभाईनी १९५३/५५ मधे सुका मेव्याचा व्यापार सुरु केले तेंव्हा ममरी बदाम सोडले तर इतर सर्वच मेवा किलोला दहा रुपयांपेक्षा कमी किमतीला विकला जात असे. मात्र त्यावेळी ममरी बदामाची किंमत २० रुपये होती. अलीकडे १९७० पासून कॅलिफोर्निया बदामाची आयात अमेरिकेहून सुरु झाली आणि ममरी बादामाची मागणी कमी झाली. ममरी बदाम मूळ अफगाणिस्तानातून आजही आयात होतो मात्र त्यावरील आयात कर जास्त असल्याने आज त्याची एका किलोची किंमत ५००० रुपये आहे. ममरी बदाम ओळखायला अगदी सोपा. कॅलिफोर्निया बदमापेक्षा ममरी बदाम आकाराने किंचितसा लहान. आपण ओल्या बदामावर अंगठा दाबला तर त्याला जसा खड्डा पडेल तसा हा ममरी बदाम दिसतो.

साधारण तीस वर्षांपूर्वी १९८८ मधे माझी सौभाग्यवती अनुराधाने दिवाळीत भेट दिल्या जाणाऱ्या ड्रायफ्रुट गिफ्ट हॅम्परच्या व्यवसायाचि सुरुवात केली होती. सुरुवातीला मस्जिद बंदरच्या घाऊक बाजारातून सुका मेवा खरेदी करायची सुरुवात झाली होती. त्याच दरम्यान प्रेमजीभाई आणि त्यांच्या पंकज आणि किरण या दोन मुलांचा परीचय झाला. त्यानंतर गेली तीस वर्षे प्रेमजी लालजी

अर्थात पी एल पार्ला आणि त्यांच्या सर्व कुटुंबाचा स्नेह प्राप्त झाला आहे. १९८८/९० च्या काळात ज्या कॅलिफोर्निया बदामाचा एका किलोचा दर साधारण २५० ते ३०० रुपये होता त्याचा आजचा दर साधारण ८०० रुपये झाला आहे. स्वातंत्र्या नंतरच्या गेल्या सत्तर वर्षात, सुका मेव्याच्या किमतीत झालेला फरक, प्रेमजीभाईंचा मोठा मुलगा पंकज याचेकडून समजून घेणे मोठे रंजक होते. मात्र एका वास्तवाची नोंद इथे घेणे आवश्यक आहे. इतकी दर वाढ झाली तरी सुका मेव्यावरचे आपले प्रेम किंचितही कमी झालेले नाही. दसरा दिवाळीसह प्रत्येक सणाला केल्या जाणाऱ्या गोडाच्या पदार्थाची रंगत याच सुक्या मेव्याने वाढत असते.

आज प्रेमजीभाई ऐंशी वर्षांचे आहेत. पारले बिस्कीट फॅक्टरीजवळच्या वीरेश्वर महाल या सोसायटीतील छोटेसे दुकान रोज स्वतःच्या हाताने उघडण्याचा त्यांचा शिरस्ता ते आजही पाळतात. त्यांच्या अनुभव समृध्द व्यवसाय कौशल्याचा फायदा, पंकज – किरण – कीर्ती या तीन मुलांसह मुलगी अशालाही झाला आहे. मोठा मुलगा पंकज आता सुका मेवा आणि मसाल्याच्या जिन्नसांचा व्यापार समर्थपणे सांभाळतो आहे. सॉल्टेड अर्थात खारवलेले बदाम – पिस्ते – काजू अशा सुका मेव्याच्या अन्य

प्रकारांचा घाऊक पुरवठा हे त्याच्या विस्तारित व्यवसायाचे वैशिष्ट्य आहे. प्रेमजीभाईंची मुलगी आशा, तिच्या लग्नानंतर पुण्यात स्थाईक झाली. पुण्याच्या लक्ष्मीरोडवरच्या बाजारपेठेतिल शांती ड्रायफ्रुट या तिच्या कुटुंबाच्या मोठ्या दुकानाचे व्यवस्थापन आशाबेन बघते.

प्रेमजीभाईनी वयाच्या चौदाव्या वर्षी सुरु केलेला सुका मेव्याचा व्यवसाय, आज व्यापारी जगात पी एल पार्ला या नावाने एक ब्रॅंड बनला आहे. किरण आणि कीर्ती या प्रेमजीभाईंच्या दोन धाकट्या मुलांनी पी एल एंटरप्राइझ या नावाने व्यवसाय विस्तार केला असून विलेपारले पश्चिमेतील स्वामी विवेकानंद रोड या मुख्य रस्त्यावर सोनी मोनी दुकानाच्या समोर ‘गो नट्स’ या नावाने ड्रायफ्रुटचे दुकान सुरु केले आहे. ड्रायफ्रुटसह खाऊचे तयार पदार्थ आणि चॉकॉलेटचे असंख्य प्रकार हे त्यांच्या दुकानाचे वैशिष्ट्य आहे.

सुका मेव्याच्या छोट्याशा दुकानात कधी गेले की प्रेमजीभाईंचे स्वागत आपण अनुभवायलाच हवे. सौम्य आवाजात आणि अगदी सौम्य प्रेमळ शब्दात प्रेमजीभाई आपले स्वागत

करतात. गेल्या तीस वर्षांच्या माझ्या अनुभवात यात काहीही फरक झालेला नाही. आता मात्र आपला व्यवसाय पुढच्या पिढीकडे सोपवून दुकानाच्या बाहेरील कट्ट्यावर बसून, ते मुलांची प्रगती कौतुकाने आपल्याला सांगतात. प्रेमजीभाईंची नातवंडे आज शिकत आहेत. थोड्याच काळांत त्यांची तिसरी पिढी उमेदवार म्हणून त्यांच्या हाताखाली व्यवसायाचे धडे गिरवतील. समृद्धी आणि संपन्नतेचे प्रतीक असलेल्या सुका मेव्यासारखेच संपन्न व्यक्तिमत्व लाभलेल्या आणि पारलेकरांची रसना संस्कृती समृद्ध करणाऱ्या प्रेमजीभाई लालजी व्होरा आणि त्यांच्या सर्व कुटुंबियाना दसरा – दीपावलीच्या अनेकानेक शुभेच्छा...!!

--oo--

विलेपारल्यातील बलुत १ / ११

# शिलाई यंत्रांचे व्यापारी सोनिग्रा

काही नांवे ... म्हणजे खरे सांगायचे तर काही उद्यमशील कुटुंबांची आडनावे विश्विख्यात ब्रँड बनतात. किर्लोस्कर आणि गरवारे अशी मराठी आडनावे असोत किंवा टाटा आणि गोदरेज अशी पारशी कुटुंबाची नावे असोत...आपल्यासाठी हे जगद्विख्यात उत्पादनांचे ब्रँड आहेत. अगदी विलेपारल्यापुरते बोलायचे झाले तरी हाच नियम लागू होतो. गेल्या दहा महिन्यातील, विलेपारल्यातील बलुतेदारांच्या परिचयानंतर वाचकाना माझे म्हणणे नक्कीच स्वीकृत असेल. गोहिल केमिस्ट – नारायण स्टोर्स – छत्रीचे डॉक्टर – वर्मा टेलर्स यांच्यासह शशिकांत हेअर कटिंग – विजय स्टोर्स असे बलुतेदार त्या त्या नावानी आणि आडनावांनी पारलेकराना सुपरिचित झाले, जणू पारलेकरांसाठी ब्रँड बनले त्यातलेच एक सुपरिचित नाव आणि **ब्रँड सोनिग्रा**...!!..

विलेपारले रेल्वे स्टेशन पूर्वेला असलेल्या बाजारा जवळच्या राम मंदिराच्या परिसरातले असे अनेक व्यापारी म्हणजे आपले बलुतेदार, पारलेकर नागरिकांसाठी परिचित आणि स्वीकृत यशस्वी

ब्रँड बनले. त्यामागे सातत्य – चिकाटी – दूरदृष्टी – वैविध्य – दीर्घकाळ केलेले प्रयत्न – चातुर्य आणि उद्यमशीलता अशा गुणवत्ता यातील प्रत्येक बलुतेदाराकडे उपजतच होत्या. यातल्या प्रत्येक व्यापारी कुटुंबाची प्रगती झालीच आणि मूळ संस्थापकाची तिसरी आणि चवथी पिढी मूळ व्यवसायासह विस्तारलेल्या अन्य व्यवसायात प्रगती करते आहे. शंभर – सव्वाशे वर्षांपूर्वी वसलेल्या विलेपारल्यात, विसाव्या शतकाच्या मध्यावर १९४० / ५० च्या सुमारास, गुजरात – राजस्थान – बिहार – उत्तर प्रदेश – कर्नाटकातून आलेल्या अमराठी बलुतेदारांच्या प्रगतीचा हा इतिहास खरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय उद्यमशीलतेचा आणि त्याच्या विकासाचा इतिहास आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय उद्यमशीलतेचा आणि त्याच्या विकासाचा इतिहास असा उल्लेख करायचे कारण असे की तत्कालीन विलेपारले उपनगरातील कुटुंब आणि समाजव्यवस्थेत झालेला सुक्ष्म बदल, आपल्या प्रत्येक बलुतेदारांने दूरदृष्टीने अगदी नेमकेपणाने टिपला होता. गेल्या दहा महिन्यातील दहा बलुतेदारांच्या परिचयात, त्यातल्या प्रत्येकाने विलेपारल्याच्या नागरिकांच्या बदलणाऱ्या गरजा नेमक्या कशा ओळखल्या हा

एका स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल. गोहिल ब्रदर्सचा औषध विक्रीतून औषध निर्मिती आणि रुग्णालय उपकरणापर्यंतचा प्रवास, गोविंदभय्याच्या प्यारेलालचा केळी-कलिंगडापासून आंबे विक्री आणि पुढे विस्तार झालेला इंटरनेट सेवा पुरवठा व्यावसाय. प्रायमस स्टोव रिपेअर करताना हात काळे करणाऱ्या मुसाभाईचा प्रायमस स्टोव निर्मितीचा धाडसी निर्णय, साबण बनविणाऱ्या नारायणभाईनी सुरु केलेले आणि आता आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त पोटॅटो स्टार्चचे उत्पादन, हे भारतीय उद्यमशीलतेचे विलेपारले मॉडेल आहे.

स्वातंत्र्याचा झेंडा फडकण्याच्या काही वर्षे आधीच, विलेपारले उपनगराची घडी त्याच्या सामाजिक – सांस्कृतिक – शैक्षणिक शिस्तीच्या धाग्यांमुळे व्यवस्थित बसली होती. गुजरातेतील पोरबंदरचे मूळ रहिवासी श्री पुरुषोत्तमभाई सोनिग्रा, वयाच्या चाळीशीत मुंबईत दखल झाले ते वर्ष होते १९४५. आधी वर्णन केलेल्या उद्यमशीलतेचे हे एक यशस्वी उदाहरण. गेली पंचाहत्तर वर्षे विलेपारल्याचा DNA बनवणारा एक ब्रँड.

कुटुंबाच्या दर्जीकामाच्या व्यवसायामुळे पुरुषोत्तमभाईनी महिलांचे ब्लाऊज शिवण्याचे कौशल्य तरुण वयातच आत्मसात केले होते. विलेपारले बाजारातील राम मंदिरासमोरच्या वखारिया हाऊसमधे त्याना हवी तशी जागा भाड्याने मिळाली आणि त्यांनी आपला शिवणकामाचा व्यवसाय सुरु केला. १९४५ नंतरची पहिली पंचवीस वर्षे, पुरुषोत्तमभाईनी सक्त मेहेनतीने आपल्या शिलाई व्यवसायात प्रगती केली. तत्कालीन विलेपारल्यातील प्रत्येक कुटुंबातील महिला शिक्षित होत्या. विलेपारल्यात १९२५ या वर्षात सुरु झालेल्या वाचनालयामुळे या वाचनप्रिय समाजाने बाहेरच्या जगातल्या अनेक नव्या संकल्पनांचा स्वीकार केला होता. प्रगत होणाऱ्या सिनेमा आणि नाटक संस्कृतीच्या प्रभावाने, महिलांच्या परीधानाच्या अभिरुचीमधे बदल होत होता. याचा अनुभव शिलाई व्यवसायातील पुरुषोत्तमभाईना सातत्याने मिळत होता.

विलेपारल्यात सुरु झालेले शिवणकामाचे प्रशिक्षण वर्ग महिलांना स्वावलंबी बनवत होते. यासाठी महिलांना नव्या शिवणकाम – भरतकाम साहित्याची गरज नव्याने निर्माण होत होती. पुरुषोत्तमभाईंनी शिवणकामाच्या व्यवसायाला जोड देत

अशा शिवण साहित्याचा व्यवसाय १९७० या वर्षी नव्याने सुरु केला. शिवणकाम – भरतकाम – एम्ब्रॉयडरी या साठी आवश्यक विविध प्रकारचे आणि रंगांचे धागे – बटणे – सुया – कात्र्या – गोल लाकडी रिंग – कापड असे सर्व साहित्य आता विलेपारल्यात उपलब्ध झाले. किमतीने कमी तरीही महत्वाच्या साहित्याच्या खरेदीसाठी मुंबईच्या घाऊक बाजारात जाण्याची आता गरज उरली नव्हती. मालाड – बोरीवलीच्या महिलांना सुद्धा आता हे सोयीचे झाले होते.

१९७४ मधे पुरुषोत्तमभाईंचा मुलगा भरत, त्याचे शालेय शिक्षण संपवून दुकानात वडिलांच्या मदतीला दखल झाला होता. दुकानाच्या खरेदी – विक्रीचे व्यवहार वडिलांच्या कडून शिकत असतानाच १९७९ मधे पुरुषोत्तमभाईंना देवाज्ञा झाली. सहवीस वर्षांच्या भरतभाईंवर आता व्यवसायाची पूर्ण जबाबदारी आली होती. याच दरम्यान वखारिया हाऊस इमारतीचे नवीन बांधकाम झाले आणि भरतभाईनी मोठी जागा घेऊन दुकानाची व्याप्ती वाढवली. १९७० ते १९९५ या पुढच्या पंचवीस वर्षात शिलाई साहित्याच्या व्यवसायाची भरभराट झाली. मात्र याच पंचवीस वर्षात सोनिग्रा या शिवण साहित्याच्या व्यवसायाला स्पर्धा निर्माण

झाली होती. याच पंचवीस वर्षात नागरिकांची अभिरुची बदलली होती आणि परिणामी गरजा बदलल्या होत्या.

उत्पादने विकणाऱ्या व्यापाऱ्यानी आणि सेवा पुरवठादार व्यवसायिकांनी आपल्या आसपासच्या समाजाप्रती आणि त्यांच्या बदलणाऱ्या अभिरुची आणि गरजांप्रती किती संवेदनशील असावे त्याचा उत्तम परिपाठ म्हणजे, या लेखाच्या निमित्ताने भरतभाई सोनिग्रा यांच्याबरोबर झालेला माझा संवाद. भरतभाई माझे समवयस्क. त्यांच्या दुकानाच्या परिसरातच रहात असल्याने त्यांच्या दुकानाची आणि व्यवसायाची प्रगती अगदी नकळत नोंदवली जात होती. शाळेच्या दिवसात, नारूशेटच्या पान-विडीच्या दुकानात दिसणारा रवी सुवर्णा, शाळेत न जाता माताधीन शेटच्या सेन्ट्रल स्टोर्समधे वडिलांना मदत करणारा हुशार किशोर आणि पारला पश्चिमेच्या गोकळीबाई शाळेत शिकणारा आणि शाळेतून घरी जाताना वडिलांच्या शिलाईच्या दुकानात रोज डोकावणारा भरत हे सर्व दुरून नेमाने भेटणारे परिसरातील माझे समकालीन आहेत. या सर्वांसह माझ्या त्याकाळातील रहात्या घराच्या परिसरातील आठवणी कायमच्या स्मरणबद्ध झाल्या आहेत.

१९९५ मधे दुकानाला पन्नास वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच्या पंचवीस वर्षांच्या काळांत, चतुर - संवेदनशील भरतभाईनी घेतलेले अनुभव आणि समाजाच्या बदलल्या गरजांची त्यांची उत्तम जाण याच्या आधारावर त्यांनी शिवणकाम साहित्याच्या व्यवसायात बदल करण्याचा धाडसी निर्णय घेतला. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात, सरकारने मुक्त व्यापार धोरण स्वीकारल्यामुळे, अनेक आंतरराष्ट्रीय उत्पादने आणि विशेष करून शिलाई यंत्र भारतात उपलब्ध झाली होती. अशी सर्व शिलाई यंत्रे वेगवेगळया कारणांसाठी वापरली जात होती. घरगुती वापराची शिवण यंत्रे – तयार कपड्यांच्या शिलाईसाठी वापरली जाणारी व्यवसायिक शिलाईयंत्रे - भरतकाम – एम्ब्रॉयडरीचि शिलाई यंत्रे असे शिलाई यंत्रांचे प्रकार उपलब्ध झाले होते.

भरतभाई सोनिग्रा यांनी जुना शिवण साहित्याचा व्यवसाय बंद करून, १९९५ पासून शिलाई यंत्रांच्या विक्री व्यवसायावर लक्ष केंद्रित केले. वजनाला हलकी – वापरायला सोपी – आकाराने छोटी आणि परवडण्यासारख्या किमतीच्या अशा या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिलाई यंत्रांमधे शिवणकामाच्या अनेक सुविधा उपलब्ध

होत्या. १९९५ ते २०१० या निव्वळ पंधरा वर्षांच्या काळात, शिलाई यंत्रांचा प्रमुख व्यापारी अशी सोनिग्रा या व्यवसायाची ओळख निर्माण झाली.

कल्पेश आणि अमित ही भरतभाईंची पुढची पिढी आता या व्यवसायात वडिलांच्या हाताखाली उमेदवारी करत होती. या शिलाई यंत्रांना नियमित निगराणीची आवश्यकता असते आणि प्रसंगी त्यांची दुरुस्ती करावी लागते. आपल्या दुकानात विक्रीला असलेल्या प्रत्येक शिलाई यंत्राची दुरुस्ती करण्याचे कसब असणे आवश्यक आहे हे चतुर भरतभाईनी ओळखले होते. वडिलांच्या सल्ल्यानुसार कल्पेश आणि अमित या दोघांनी सुरुवातीची काही वर्षे, या प्रत्येक यंत्राच्या दुरुस्तीचे पद्धतशीर शिक्षण, प्रत्येक निर्मात्याकडून घेतले.

वडिलांच्या सल्ल्याने कल्पेश आणि अमित यांनी व्यवसाय वृद्धीचे पुढचे पाऊल टाकले. २०१० या वर्षी **सोनिग्रा** या शिलाई यंत्र विक्रेत्या ब्रँडची दुसरी शाखा दादरच्या भवानीशंकर रोड परिसरात सुरु झाली. मागोमाग २०१२/१३ या वर्षी **सोनिग्रा**ची तिसरी शाखा गुजरातेतील अहमदाबाद मधे सुरु झाली. आता या

सर्व दुकानांचे खरेदी – विक्री व्यवहार दोन्ही मुलगे आणि सुनांवर सोपवून भरतभाईनी व्यवसाय वृद्धीचे पुढचे पाऊल टाकले. सोनिग्रा ब्रँडचे शिलाई यंत्र विक्री आणि दुरुस्ती असे दोन्ही व्यवसाय आज तीन शाखांसह भरभराटीला आले आहेत.

चीनमधील शांघाय शहरात दर तीन वर्षांनी यंत्र निर्मितीचे अतिविशाल प्रदर्शन आयोजित केले जाते. भरतभाईनी गेल्या पंधरा वर्षात सहावेळा या प्रदर्शनाला भेट दिली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिलाई यंत्रांशी स्पर्धा करणारी विविध यंत्रे, भरतभाईनी चीनी निर्मात्यांकडून आयात करायला सुरुवात केली. प्रवासात सुद्धा घेऊन जाता येतील अशी अगदी दहा इंच लांबी-रुंदी-उंचीची शिलाई यंत्रे हे **सोनिग्रा**च्या दुकानाचे एक आकर्षण ठरले आहे. चीन नंतर आता भरतभाईंचे लक्ष, दर चार वर्षांनी जपानमधे भरणाऱ्या यंत्रांच्या प्रदर्शनाकडे लागले आहे.

दोन्ही मुलगे आणि सुना जरी तिन्ही दुकानांचे दैनंदिन व्यवस्थापन पाहत असले तरी भरतभाई अजूनही दर आठवड्याला तीन दिवस अहमदाबादला जातात. जाता – येतानाचा रेल्वेचा प्रवास आता त्यांना सवयीचा झाला आहे. पूर्वी, मुंबईच्या घाऊक

बाजारातून दर दिवसाआड खांद्यावर जड थैली घेऊन, लोकल ट्रेनच्या गर्दीतून शिलाई समान आणावे लागत असे. त्यामानाने हा दर आठवड्याचा अहमदाबादचा जाता-येतानाचा प्रवास खूप सुखाचा आहे असे भरतभाई आग्रहाने सांगतात.

शिलाई यंत्रांच्या विक्रेत्या मोठ्या व्यापार व्यवसायाचे नाव **सोनिग्रा**...!!..विलेपारल्याच्या DNA चा घटक असलेला आणि विलेपारल्याने घडवलेला आपला एक यशस्वी बालूतेदार...!

--oo--

विलेपारल्यातील बलुत १ / १२

# जेठालाल लालजी शाह किराणामालाचे दुकान

शंभर – सव्वाशे वर्षांपूर्वी वसलेल्या विलेपारल्यात, विसाव्या शतकाच्या मध्यावर १९३० ते ४० च्या सुमारास, गुजरात – राजस्थान – बिहार – उत्तर प्रदेश – कर्नाटकातून आलेल्या, विलेपारल्यातील समाजाचा DNA घटक असलेल्या, अमराठी बलुतेदारांच्या प्रगतीच्या इतिहासाचा आलेख मांडणाऱ्या लेखमालेतील आजचा हा अंतिम लेख. या सर्व बलुतेदारांच्या सातत्य – चिकाटी – दूरदृष्टी – व्यवसायातील वैविध्य – दीर्घकाळ केलेले प्रयत्न – चातुर्य आणि उद्यमशीलता अशा सर्व गुणवत्तांचा परिचय, या लेखमालेच्या माध्यमातून अभूतपूर्वच्या वाचकांना करून देता आला याचे मला समाधान वाटते आहे.

एक क्षण...एक तास...एक दिवस...कधी कधी इतके रेंगाळतात की सरता सरत नाहीत. अलीकडच्या दीर्घकाळ लांबलेल्या पावसाळ्यात रेंगाळलेले, असे क्षण...असे तास...असे दिवस आपण निश्चित अनुभवले आहेत. आनंद बुक सेंटरच्या वसंतभाईनी हा लेख लिहिण्याच्या अगदी दोनच दिवस आधी,

काही दशकांपूर्वीच्या, विलेपारल्यातील हनुमान रोडचा फोटो पाठवला होता. प्रगत समाज जीवन – संस्कृती – शिक्षण व्यवस्था आणि उद्यमशील विलेपारल्यातील काळ – काम – वेगाचे गणित मात्र किती गतिशील आहे, याचा परिचय त्या फोटोने मला करून दिला.

नेहरू रोड आणि हनुमान रोड या विलेपारले पूर्व रेल्वे स्टेशन पासून पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत पूर्व – पश्चिम विस्तारलेल्या दोन प्रमुख वाहिन्या. बँक स्ट्रीट हे नाव शोभून दिसेल, इतक्या विविध बँकांच्या शाखा, गेल्या तीन-चार दशकांत या दोन रस्त्यांवर स्थापन झालेल्या आहेत. नाक्यानाक्यावरच्या चहा आणि न्याहारीच्या टपऱ्या पहात आणि जागोजागीच्या महागड्या हॉटेलांच्या दर्शनी पाट्या वाचत आपण, एखाद्या निवांत दिवशी या दोन्ही रस्त्यांवर फिरलो तर या दोन्ही रस्त्यांना खाऊ स्ट्रीट का म्हणू नये असा संभ्रमही कदाचित आपल्या मनात निर्माण होईल इतक्या प्रमाणात, पारल्यात याची वृद्धी झालेली आहे. असे बँकांच्या शाखांचे जाळे आणि रसना संस्कृतीचे वैविध्य म्हणजे उद्यमशील विलेपारल्यातील काळ – काम – वेगाच्या गतिशील गणिताला

आणि समृद्ध समाज जीवनाला मिळालेली प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पावती आहे.

आपल्या बलुतेदाराची दूरदृष्टी – व्यवसायातील वैविध्य – चातुर्य आणि उद्यमशीलता याचे उत्तम उदाहरण म्हणजे जेठालाल लालजी शहा यांच्या हनुमान रोडवरील किराणा मालाच्या दुकानाचे, BPL Gallery मधे झालेले रुपांतर. विसावे शतक संपून एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीची चाहूल लागली होती. येणारे नवे तंत्रज्ञान – मोबाईल फोनचा आपल्या दैनंदिन जीवनात झालेला प्रवेश आणि ते स्वीकारण्यासाठी समाजाची उत्सुकता याचा अभ्यास, जेठालाल लालजींच्या पुढच्या पिढीने केला होता, त्याचे फलस्वरूप होते विलेपारल्यातील पहिली मोबाईल गॅलरी - BPL Gallery.

**आनंद बुक सेन्टरच्या** वसंतभाईनी पाठवलेल्या हनुमान रोडच्या फोटोच्या काळात, आता आपण थोडे मागे जाऊया. जेठाभाई लालजी शहा हा पंचवीस वर्षांचा चौथी इयत्ता शिकलेला तरुण, गुजरातेतील कच्छ मधून १९५० मधे विलेपारल्यात दाखल

झाला. शिक्षण आणि पैशाचे पाठबळ या दोन गोष्टींचा अभाव असला तरी अनाज म्हणजे धान्य आणि किराणा माल विक्रीचे पारंपरिक ज्ञान हे जेठाभाईंचे एकमेव भांडवल होते. महिन्याभराच्या उधार – उसनवारिची सोय उपलब्ध झाल्याने, हनुमान रोडवरच्या पूर्वीच्या मंगेश वाडीच्या बाहेर जेठाभाईंनी किराणामालाचे छोटेसे दुकान थाटले आणि व्यवसायाचा श्रीगणेशा केला. हनुमान रोडवरील आनंद बुक सेंटरच्या समोर असलेले नोबल मेडिकल हे दुकान हीच ती जेठाभाईंच्या पहिल्या दुकानाची जागा. जेठाभाई लालजी शहा यांच्यासह त्यांच्या पुढील पिढीतील उद्योजकांनी केलेल्या प्रगतीचा हा आलेख आहे.

दुकानाच्या मागेच रहाते छोटेसे घर असल्याने, जेठाभाईंचे जास्तीत जास्त लक्ष दुकानाकडे असे. रस्त्यांवर वाहनांची वर्दळ कमी असल्याने, रेल्वे स्टेशनवर जाणारे आणि परत येणारे नागरिक चालत घरी जात असत. अशा वेळी दुकानात डोकावून जाणाऱ्या नागरिकांचा जेठाभाईंशी संवाद ठरलेला असे. आपुलकीने अशा प्रत्येकाचि चौकशी जेठाभाईं करीत असत. पुढील पंचवीस वर्षात हनुमान रोडवरील जेठालाल लालजी यांच्या किराणा दुकानाची घडी व्यवस्थित बसली होती. आता, दुकाना समोरच गोडाऊन

साठी एक जागा भाड्याने घेतली होती. बॉम्बे ग्रेन डीलर्स असोसिएशन या मुंबईतील किराणा व्यापाऱ्यांच्या संघटनेचे सभासद असलेले जेठाभाई कालांतराने त्या संघटनेचे विश्वस्त झाले होते.

वसंतभाई हा जेठालाल लालजी यांचा मोठा मुलगा. दुकानाला पंचवीस वर्षे झाल्याच्या सुमारास, शालेय शिक्षण पूर्ण करून वसंतभाई, वडिलांच्या मदतीला दुकानात दाखल झाले होते. या उद्यमशील कच्छी व्यापारी बांधवांचे मला नेहेमीच कौतुक वाटते. जेठालाल लालजी यांच्या पुढील पिढीने व्यवसाय वृद्धी करताना, नेहेमीच अनुभवाला येणारे व्यवसाय वैविध्य हा पारलेकरांसाठी कौतुकाचा विषय आहे. १९७८-७९ च्या सुमारास दुकानासमोरील किराणा माल गोडाऊन असलेल्या जागेत नवी इमारत बांधली गेली होती. या नव्या जागेत तरुण वसंतभाई शहा यांनी १९८१ मधे आनंद बुक सेंटर या नावाने स्टेशनरी व्यवसायाची सुरुवात केली. गेल्या ३८-३९ वर्षात आनंद बुक सेंटर लोकप्रिय झाले आहे.

आनंद बुक सेन्टरच्या बाजूला डनहिल कॅसल ही इमारत १९८९-९० च्या दरम्यान नव्याने बांधली गेली होती. वसंतभाईंचा धाकटा भाऊ दिनेश याने या इमारतीतल्या जागेत १९९२ मधे झेरॉक्स सेंटरचा व्यवसाय सुरु केला. कालांतराने मिलन कलेक्शन हे असंख्य भेट वस्तू आणि शुभेच्छा कार्ड मिळण्याचे ठिकाण तरुणाईमधे लोकप्रिय झाले. जेठाभाईंचा धाकटा मुलगा चंद्रकांत, आज या दुकानाचे व्यवहार सांभाळतो.

DJ म्हणजेच दिनेश जेठालाल या जेठाभाईंच्या मुलाने व्यवसायांत केलेली प्रगती हे पुनश्च चिकाटी – दूरदृष्टी – व्यवसायातील वैविध्य – दीर्घकाळ केलेले प्रयत्न - उद्यमशीलता आणि चातुर्याचे निश्चितच लक्षवेधी उदाहरण आहे. मिलन सेंटरची जबाबदारी धाकट्या भावावर सोपवून २००३ मधे दिनेशभाईने किराणामालाच्या दुकानाच्या जागेवर BPL Gallery ची स्थापना केली होती. नवे तंत्रज्ञान आणि त्याला समाजाची स्वीकृती या दोन्ही वास्तवांचा अभ्यास, या संवेदनशील व्यापार्याने केला होता. कालांतराने या BPL Gallery ची VODAFON Gallery झाली. अगदी अलीकडे नोबल मेडिकल हे दिवस - रात्र सेवा देणारे औषधांचे मोठे दुकान या जागेत सुरु झाले आहे.

सातत्याने नव्या आवाहनांच्या शोधात राहिलेल्या दिनेशभाईनी, २०१३ मधे परांजपे बी स्कीम मधील परमार सोसायटीत आपला पूर्ण नवा व्यवसाय सुरु केला होता. हनुमान रोड वरून महिला संघ शाळेकडे जाणारा हा रस्ता रहदारीने सतत गजबजलेला असतो. पुण्याच्या कॅफे चॉकोलेड या केक – चॉकॉलेटसह अन्य खाद्यपदार्थांच्या विविध कृती बनवणाऱ्या उद्योगाची फ्रांचाइसी, दिनेशभाईनी घेतली होती. नव्या व्यवसायाचा अभ्यास आणि R & D एका बाजूला सुरु होतेच. पुण्याच्या उद्योगाची फ्रांचाइसी २०१७ मधे बंद करून नव्या स्वरूपात DJ Junction या नावाने, नव्या व्यवसायाचा मुहूर्त झाला. पिझ्झा – बर्गर पासून असंख्य भारतीय पदार्थ – बेकरी उत्पादने आणि विशेष करून स्वतःच्या कारखान्यात बनवलेली विविध स्वादाची आईस्क्रीम DJ Junction मधे आता उपलब्ध झाली होती. वर्षभरातच या दुकानाची दुसरी शाखा बोरीवलीमधे सुरु झाली. चंद्रकांतभाईंचा मुलगा भाविन या दुकानाचे व्यवहार सांभाळतो आहे. निव्वळ दोन वर्षात DJ Junction च्या आठ फ्रांचाइसी शाखा सुरु झाल्या आहेत. व्यवसाय वृद्धीचा हा विलक्षण वेग आश्चर्य वाटेल असाच आहे.

चॉकॉलेट शेक – चॉकॉलेट केक - चॉकॉलेट संडे – सँडविच – पिझ्झा – बर्गर - कुल्फी – आईस्क्रीम – इंडियन डेझर्टस असे किमान दोनशे पदार्थ, स्वतःच्या दोन दुकानांसह आठ फ्रांचाइसी शाखांमधे आज उपलब्ध आहेत. या सर्वा पदार्थांच्या कृतींचा अभ्यास करून त्याची प्रत्यक्ष निर्मिती आणि पुरवठा यंत्रणा यासाठी केलेले R & D याचे दिनेशभाईनी विस्ताराने केलेले वर्णन माझ्यासाठी व्यवसाय मार्गदर्शनाचा एक छोटा अभ्यासक्रमच होता. याचे कौतुक वाटण्याचे कारण इतकेच की ताजे पदार्थ बनविण्याचा - बेकरी व्यवसायाचा अथवा आईस्क्रीम निर्मितीचा कुठलाही पूर्वानुभव नसताना एक जिद्दी उद्योजक या विषयाचा अभ्यास चिकाटीने करतो आणि त्यात यशस्वी होतो.


विलेपारल्यातील अशा बारा बलुतेदारांचा परिचय, गेले वर्षभर अभूतपूर्वच्या वाचकाना करून देताना त्याआधी, असा योग्य परिचय मला स्वतःला नव्याने करून घेणे आवश्यक होते. विलेपारल्यातील बालपणापासून तरुणपणीचे घेतलेले सर्व संपन्न जीवन अनुभव स्मरणबद्ध झाले होते. एखाद – दोन अपवाद वगळता यातले सर्वच बलुतेदार बालपणापासून परिचयाचे होते.

त्यांचा नवा परिचय म्हणजे त्यांच्या प्रगतीचे टप्पे होते. गोहिल केमिस्ट – नारायण स्टोर्स – सोनिग्रा या सारखे आपले पारलेकर बलुतेदार, आंतर राष्ट्रीय व्यापारात सुद्धा यशस्वी झाले आहेत. परिचयाच्या प्रत्येक भेटीत या सर्व बलुतेदारांनी दिलेले सहकार्य आणि त्यांचे सौजन्य यासाठी त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद…!

हे सर्व परिचय लेखमालेच्या माध्यमातून अभूतपूर्वच्या सुजाण – सुज्ञ – सजग वाचकांसमोर मांडता आले याचे संपूर्ण श्रेय अभूतपूर्वचे ते दोघे…सौ स्वाती आणि श्री अनिल हर्डीकर या दंपतीला आहे. हा विषय महत्वाचा आहे याची जाणीव आणि तो विषय अरुण फडके मांडू शकेल यावर त्या दोघांचा विश्वास, याचे माझे समाधान चीरकालीन आहे. वैयक्तिक भेटीत मिळालेल्या असंख्य वाचकांच्या प्रोत्साहन देणाऱ्या प्रतिक्रिया आणि श्री शैलेश तेंडोलकर या सौम्य स्वभावाच्या सज्जन उपयोजित कलासंपन्न गृहस्थाचा प्राप्त झालेला स्नेह, हे या लेखमालेचे माझे फलित आहे. एक वर्षभर संपन्न झालेल्या **विलेपाल्र्यातील बलुत** या लेखमालेला इथे विराम देतो…!

**--oo--**

**श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक कव्हरवर क्लिक करताच उघडेल.**



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.
## श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवर हे दुसरे पुस्तक.

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आहेत. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हर्सिटीच्या काळात त्यांचे लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके), डॉ. स्मिता दामले (७ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२६ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४),

मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक(३), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(७), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(६), आनंद देशपांडे(२), डॉ. निलीमा कुलकर्णी(२), अनामिका बोरकर(३), डॉ. अरविंद वैद्य, आनंद देशपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।